नं. ७३

म. ग्रं. सं. ठाणे

विषय नाटक

संग्रहालय क्रमांक ८-७६

लेखक

पुस्तकाचें नांव न्यायविजय

(७६)

सन

७३

नाटक

लेखक - नारायण बापूजी कानिटकर.

सन १८९९

हूं. तो गलास आण. ( आ
भणभणून गेलें आहे!
बाटली व गलास आणतो )
लें औषध गलास

# न्या... टक.

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

**स्थल**—अप्पासाहेबांचा दिवाणखाना.

( अप्पासाहेब दिवाणखान्यांत एका मखमूच्या गादीवर तक्याशीं टेंकून विचार करीत बसले आहेत. )

**अप्पा**—(आपल्याशींच)हे परवां नुकते इतके रुपये कर्ज काढून देवविले, पुन्हा आज आणखी रुपये पाहिजेत म्हणून चिट्टी आपली तयार ! कोठले आणावे बोवा रोजच्या रोज हे पैसे? मारवाड्यांकडे जावें तर ते आतां पैसे देण्याला कचरतात. शिवाय त्यांचें तें व्याज, मनोती, बट्टा वगैरे जाऊन रुपयाचे आठ आणे देखील हातीं येण्याची मारामार ! कोणीकडोन ह्या धबडग्यांत मी पडलों असें मला झालें आहे. बंगल्यांत मीं पाऊल ठेविलें न ठेविलें तों रुपये, कर्ज, व्याज, यांखेरीज दुसरा विषय नाहीं ! मला ती मोठी नोकरी देण्याच्या संबंधानें "करितो, लौकर तजवीज करितों" अशीं भरपूर वचनें मात्र मिळतात पण प्रत्ययाला अजून कांहीं एक येत नाहीं. त्यांणा पुरें मनांत मात्र आणिलें पाहिजे कीं काम काय हां हां म्हणतां होण्यासारखें आहे. पहावें आतां माझें नशीब केव्हां उदयाला येतें तें. मीं तर मनोभावानें रात्रंदिवस चाकरी करितों आहे. त्यांच्या तोंडांतून शब्द निघण्याचा मात्र अवकाश, कीं मी तें काम बजावलेंच. माझ्याजवळ जें कांहीं होतें नव्हतें तें मीं भरीला घातलें आहे, लोकांचे गळे गोंविले आहेत, हें

नारायण बापूजी कानिटकर

सगळें एक मला मोठें ... आशेवर मी केलें आहे. बरें आहे. ... कळलें आहे खरें, आतां डगमगून काय ... मेला आहे खरा, तो आतां कसा तरी पा... लाच पाहिजे. रात्रंदिवस सतत आतां श्रम केले पाहिजेत. ( एक फैल हातांत घेतो व त्यांतील यादीवर पेणसलीच्या खुणा करितो. ) हा गृहस्थ आता पेनशन घेण्याच्या बेतांत आला आहे, याच्याजवळ कर्जाऊ रुपये मागमागून थकलों पण हा कांहीं अजून बधत नाहीं. करावी एकदां याची दोनशें कोसांवर त्या काळ्या पाण्याच्या हवेच्या गावीं बदली, त्याखेरीज हा ताळ्यावर येणार नाहीं. या दुसऱ्याची एकदां भेट घ्यावी, पहावें तर खरें काय ह्मणतो तें. कितीही हा घमेंड्या असला तरी ह्या अप्पासाहेबाचें एकदांकां त्याच्या घरीं धरणें बसलें कीं येईल मऊ, करतो काय ! हा गृहस्थ कांहीं बधत नाहीं, आज एक वर्ष आज आज उद्यां उद्यां अशा याच्या थापा चालल्या आहेत. या गृहस्थाला आतां एक अखेरचें पत्र लिहिलें पाहिजे. या सतरा नंबरच्या गृहस्थाची भेट झाल्याला आज दोन वर्षें झालीं, पुन्हा त्या काकाला याच्याकडे पाठविला पाहिजे. या पंचवीस नंबरच्या गृहस्थाचें नाक दाबल्या खेरीज तोंड आतां उघडावयाचें नाहीं. ही अशी सगळी व्यवस्था लाविली ह्मणजे आपली चंगळ उडणार आहे. आतां आळस करून उपयोग नाहीं. कोण आहेरे, विठ्या? [ रुप्याच्या डबींतली पट्टी व तंबाकू खातो. ] विठ्या, अरे विठ्या, ती रुप्याची थोरली पिकदाणी आण पाहूं इकडे ? (वि- ... )

**विठ्या**—जी साब, ही आनूलीच ...गा. [ पिकदा... ठेवितो. ] साब, खालती बसरीवर लई लई मंडळी बाकांवर ... सल्याती. ह्मनूत्यात सरकारची गाठ व्हाविया. अनशी नुट इष्टाकण्या, आनू डोईवर चक्रया फिरवूनशिनी आल्याती !

**अप्पा**—बसूंदे त्यांनां खालीं त्या कपाटांतली औषधाची

बाटली आण पाहूं. तो गलास आण. ( आपल्याशीं ) आज बोवा माझें डोकें अगदीं भणभणून गेलें आहे!

**विठ्या**—( बाटली व गलास आणतो ) ही घ्यावी साब.

**अप्पा**—( बाटलींतलें औषध गलासांत घालून पितो ) विठ्या, विडी अन् आगपेटी लॉव्. (विठू ती आणून देतो, अप्पासाहेब विडी ओढतो. ) विठ्या, त्या रिकामटवळ्या मंडळीला ह्मणावें अप्पासाहेब आतां भेटत नाहींत कामांत आहेत, उद्यां या. ( आपल्याशीं ) हो तर, असें महाग करून विकल्याखेरीज चांगला बज बसत नाहीं. विठ्या, मैनाजी खालीं आल्या आहेत का रे ?

**विठ्या**—जी, त्या लइ वाढूळच्या त्या खोलीमंदी वाट पघत बसल्याती.

**अप्पा**—बोलावें तिला वर. या शिंच्याला वर कोणाला बोलवावें, खालीं कोणाला बसवून घ्यावें, हें समजतच नाहीं. बुलॉव् ! विठ्या, बुलॉव् तिला वर जलदी ? माम्याला म्हणावें बेझिकचा डाव घेऊन ये.

**विठ्या**—जी साब. ( जातो )

( मैनाजी व मामा येतात. )

**मैनाजी** — गुड ईव्हिनिंग टु यू माय् लव्ह !

**अप्पा**— वेल् किती लेट हा, तुमची आम्हीं किती वेळ वाट पहात बसावें ?

**मैनाजी**—घरून निघालें, वाटेनं रामाचं दर्शन घेतलं अन् त्याच पाईं इकडे आलें.

**अप्पा** — आतां हीं देवाचीं दर्शनें घेऊन त्याच्या जवळ मागायचें काय ? बसा या गादीवर.

**मामा** — काय म्हणजे, या पायांची चाकरी जन्मभर घडावी हें मागायचें, होय कीं नाहीं मैनाजी ?

**मैना**—अलबत्, कसं बोललात्. पण साहेब, या घरीं या मैनेला येवढी मज्जाव नसावी.

**अप्पा**—मैनाजी, तुम्हींच रामाचें दर्शन घ्यावेंत अन् आम्हाला

रामांचीं दर्शनें नको असतील असेंच कीं नाहीं! माम्या, कर पत्यांची चटपट.

**मैनाजी** — अहो आपणांसारख्या भाग्यवानांनां रामांचीं दर्शनंचशीं काय पण स्पर्शनं दिखील— ( हांसते ).

**अप्पा** — वा : मोठ्या चतुर आहांत बोवा! तुम्हाला फिरून मज्जाव व्हायची नाहीं. हें घ्या तुम्हाला बक्षीस. ( पांच रुपये दहा रुपयांच्या नोटेंत ठेवितो अन् त्याची पुडी करून मैनेच्या अंगावर फेंकतो. )

**मैना** — ( रागावलीसें दाखवितें ) हें काय हें, वेडच लागलं आहे अगदीं! ती पुडी लागली नसेल वाटतं आमच्या अंगाला !

**अप्पा**— यं, गुलाबाचें फूलचना अगदीं ! नको असली तर आणा ती आमची पुडी इकडे. ( हात पुढें करितो. )

**मैना**— हो, वाटपहा, देईन तर आतां. ( पुडी चोळींत ठेविते. )

**अप्पा**— मैनाजी, तो आमचा गळपट्टा, झाला कीं नाहीं तयार अजून ?

**मैना**—साहेब, आज दोन दिवस कसं तें फावलंच नाहीं. आपण तो मंदिली खण परवां बसन्पंचमीला दिलात त्याची चोळी शिवण्यांत सगळा वेळ गेला. शिवाय तो आपला अन् माझा फोटोग्राफ फ्रेममध्यें बसाविला. काय पण मापुक दिसतो आहे साहेब!

**अप्पा**—अरे वा:, त्या खणाची चोळी शिवून अंगांत दिखील घालून आलां आहांत आज ! आमची तिकडे नजरच गेली नाहीं. चोळी अगदीं स्वत: शिवलीत अं ! उद्योगापुढें कमाल आहे बोवा !

**मैना**— आपण प्रेमानं दिलेल्या खणाला दुसऱ्याचा हात लागूं द्यायचा मग काय मेलं राहिलं तें ! ती चोळी शिवतांना दोनदां हाताला सुई बोंचली पण तें कांहीं मनांत न आणितां चोळी शिवणं संपलं तेव्हां आज उठलें. या चोळीला आतां एक

तेवढा शालू मिळाला म्हणजे बहार होणार आहे. पण केव्हां आ॰ तां मेहेरबानी होईल ती होवो.

**मामा**— अहो शालू मिळेल. शालू देण्याला आमचे अप्पा॰ साहेब नामर्द आहेत कीं काय ?

**मैना**— हें हो काय तुमचं असं बोलणं! मी पण कुठें तसं म्हणतें आहे. या शिमग्याला आतां शालू पाहिजे सांगतें आहे.

**अप्पा**—देऊं एक तुह्माला शालू मैनाजी, असा दम सो॰ डूं नका.

**मैना**—हें पहा हो. कांहीं तरी बोलायचं झालं!

( फुन्ना मारवाडी येतो. )

**फुन्नाजी**—( सलाम करितो. ) रावषाब, आमचाँ तो काँम् ह्या घडीला झाला पाहिजे. हां !

**अप्पा**—कोणीं रे या मारवाड्याला वर येण्याची परवानगी दिली ?

**फुन्नाजी**—आमाला तो परवाणगी रसाणगी नयी लागते षाब ! अमेतो वर एकदम येणार माणष हाये. तमे असा अ- माला घडीघडी कसाला सतावते. आँमचा रुपिया देयेल तो अमी तुमचा घराकडे कदीबी पहाणार नयी समजले षाब !

**मामा**-शेटजी, असा रागाऊं नकोस. बैस तर खरा.

**अप्पा**—माम्या तुं आपलं काम कर. पत्यांची चटपट कर चल. त्याच्या नादीं लागून काय उपयोग.

**फुन्नाजी**—अप्पाषाब मे तो हा तमचा विचार बडा- षाबाच्या कानावर घालेल षमजला. आमचा रुपिया टाका आज- चा आज. आमचा पैका या घडीला तमे गिणला पाहिजे. अमे इथूनशी हलणार नयी.

**अप्पा**—कां मारवाड्या, फारसें तोंड सोडलें आहेस, बैस तिथें उगीच, वटवट किती करितोस ? कर माम्या डावाला आरंभ. मैनाजी हं चालूंद्या. ( विडी ओढतो. ) माम्या पत्ते वांट.

सगळें एक मला मोठें [illegible] आशेवर मीं केलें आहे. बरें आहे. [illegible] कललें आहे खरें, आतां डगमगून काय [illegible] भेला आहे खरा, तो आतां कसा तरी पा[illegible]लाच पाहिजे. रात्रंदिवस सतत आतां श्रम केले पाहिजेत. ( एक फैल हातांत घेतो व त्यांतील यादीवर पेणसलीच्या खुणा करितो. ) हा गृहस्थ आतां पेनशन घेण्याच्या बेतांत आला आहे, याच्याजवळ कर्जाऊ रुपये मागमागून थकलों पण हा कांहीं अजून बधत नाहीं. करावी एकदां याची दोनशें कोसांवर त्या काळ्या पाण्याच्या हवेच्या गावीं बदली, त्याखेरीज हा ताळ्यावर येणार नाहीं. या दुसऱ्याची एकदां भेट घ्यावी, पहावें तर खरें काय ह्मणतो तें. कितीही हा घमंड्या असला तरी ह्या अप्पासाहेबाचें एकदांकां त्याच्या घरीं धरणें बसलें कीं येईल मऊ, करतो काय ! हा गृहस्थ कांहीं बधत नाहीं, आज एक वर्ष आज आज उद्यां उद्यां अशा याच्या थापा चालल्या आहेत. या गृहस्थाला आतां एक अखेरचें पत्र लिहिलें पाहिजे. या सतरा नंबरच्या गृहस्थाची भेट झाल्याला आज दोन वर्षें झालीं, पुन्हा त्या काकाला याच्याकडे पाठविला पाहिजे. या पंचवीस नंबरच्या गृहस्थाचें नाक दाबल्या खेरीज तोंड आतां उघडावयाचें नाहीं. ही अशी सगळी व्यवस्था लाविली ह्मणजे आपली चंगळ उडणार आहे. आतां आळस करून उपयोग नाहीं. कोण आहेरे, विठ्या? [ रुप्याच्या डबींतली पट्टी व तंबाकू खातो. ] विठ्या, अरे विठ्या, ती रुप्याची थोरली पिकदाणी आण पाहूं इकडे ?

**विठ्या**—जी साब, ही आनूलीच [illegible]गा. [ पिकदा[illegible] ठेवितो. ] साब, खालती वसरीवर लई लई मंडळी बाकांवर [illegible]सल्याती. ह्मनत्यात सरकारची गाठ व्हाविया. अक्शी बूट इष्टाकण्या, आनू डोईवर चक्रचा फिरवूनशिनी आल्याती !

**अप्पा**—बसूं दे त्यांनां खालीं त्या कपाटांतली औषधाची

बाटली आण पाहूं. तो गलास आण. ( आपल्याशीं ) आज बोवा माझें डोकें अगदीं भणभणून गेलें आहे!

**विठ्या**—( बाटली व गलास आणतो ) ही घ्यावी साब.

**अप्पा**—( बाटलींतलें औषध गलासांत घालून पितो ) विठ्या, विडी अन् आगपेटी लॉव्. (विठू ती आणून देतो, अप्पासाहेब विडी ओढतो. ) विठ्या, त्या रिकामटवळ्या मंडळीला ह्मणावें अप्पासाहेब आतां भेटत नाहींत कामांत आहेत, उद्यां या. ( आपल्याशीं ) हो तर, असं महाग करून विकल्याखेरीज चांगला बज बसत नाहीं. विठ्या, मैनाजी खाल आल्या आहेत का रे ?

**विठ्या**—जी, त्या लइ वाढूळच्या त्या खोलीमंदी वाट पघत बसल्याती.

**अप्पा**—बोलावें तिला वर. या शिंच्याला वर कोणाला बोलवावें, खालीं कोणाला बसवून घ्यावें, हें समजतच नाहीं. बुलॉव् ! विठ्या, बुलॉव् तिला वर जलदी ? माम्याला म्हणावें बेझिकचा डाव घेऊन ये.

**विठ्या**—जी साब. ( जातो )

( मैनाजी व मामा येतात. )

**मैनाजी** — गुड ईव्हिनिंग टु यू माय् लव्ह !

**अप्पा**— वेल् किती लेट हा, तुमची आम्हीं किती वेळ वाट पहात बसावें ?

**मैनाजी**—घरून निघालें, वाटेनं रामाचं दर्शन घेतलं अन् त्याच पाईं इकडे आलें.

**अप्पा** — आतां हीं देवाचीं दर्शनें घेऊन त्याच्या जवळ मागायचें काय ? बसा या गादीवर.

**मामा** — काय म्हणजे, या पायांची चाकरी जन्मभर घडावी हें मागायचें, होय कीं नाहीं मैनाजी ?

**मैना**—अलबत्, कसं बोललात्. पण साहेब, या घरीं या मैनेला येवढी मज्जाव नसावी.

**अप्पा**—मैनाजी, तुम्हींच रामाचें दर्शन घ्यावंत अन् आम्हाला

रामांचीं दर्शनें नको असतील असेंच कीं नाहीं! माम्या, कर पत्यांची चटपट.

**मैनाजी** — अहो आपणांसारख्या भाग्यवानांनां रामांचीं दर्शनंचशीं काय पण स्पर्शनं दिखील— ( हांसते ).

**अप्पा** — वा: मोठ्या चतुर आहांत बोवा! तुम्हाला फिरून मज्जाव व्हायची नाहीं. हें घ्या तुम्हाला बक्षीस. ( पांच रुपये दहा रुपयांच्या नोटेंत ठेवितो अन् त्याची पुडी करून मैनेच्या अंगावर फेंकतो. )

**मैना** — ( रागावलीसें दाखवितें ) हें काय हें, वेडच लागलं आहे अगदीं! ती पुडी लागली नसेल वाटतं आमच्या अंगाला!

**अप्पा**— यं, गुलाबाचें फूलचना अगदीं! नको असली तर आणा ती आमची पुडी इकडे. ( हात पुढें करितो. )

**मैना**— हो, वाटपहा, देईन तर आतां. ( पुडी चोळींत ठेविते. )

**अप्पा**— मैनाजी, तो आमचा गळपट्टा, झाला कीं नाहीं तयार अजून ?

**मैना**—साहेब, आज दोन दिवस कसं तें फावलंच नाहीं. आपण तो मंदिली खण परवां बसनूपंचमीला दिलात त्याची चोळी शिवण्यांत सगळा वेळ गेला. शिवाय तो आपला अन् माझा पोटोग्राफ फ्रेममध्यें बसविला. काय पण माशुक दिसतो आहे साहेब!

**अप्पा**—अरे वा:, त्या खणाची चोळी शिवून अंगांत दिखील घालून आलां आहांत आज! आमची तिकडे नजरच गेली नाहीं. चोळी अगदीं स्वत: शिवलीत अं! उद्योगापुढें कमाल आहे बोवा!

**मैना**— आपण प्रेमानं दिलेल्या खणाला दुसऱ्याचा हात लागूं द्यायचा मग काय मेलं राहिलं तें! ती चोळी शिवतांना दोनदां हाताला सुई बोंचली पण तें कांहीं मनांत न आणितां चोळी शिवणं संपलं तेव्हां आज उठलें. या चोळीला आतां एक

तेवढा शालू मिळाला म्हणजे बहार होणार आहे. पण केव्हां आ॰ तां मेहेरबानी होईल ती होवो.

**मामा**— अहो शालू मिळेल. शालू देण्याला आमचे अप्पा॰ साहेब नामर्द आहेत कीं काय ?

**मैना**— हें हो काय तुमचं असं बोलणं! मी पण कुठें तसं म्हणतें आहे. या शिमग्याला आतां शालू पाहिजे सांगतें आहे.

**अप्पा**—देऊं एक तुम्हाला शालू मैनाजी, असा दम सो॰ डूं नका.

**मैना**—हें पहा हो. कांहीं तरी बोलायचं झालं!

( फुन्ना मारवाडी येतो. )

**फुन्नाजी**—( सलाम करितो. ) रावषाब, आमचाँ तो काँम् ह्या घडीला झाला पाहिजे. हां !

**अप्पा**—कोणीं रे या मारवाड्याला वर येण्याची परवानगी दिली ?

**फुन्नाजी**—आमाला तो परवाणगी रसाणगी नयी लागते षाब ! अमेतो वर एकदम येणार माणष हाये. तमे असा अ- माला घडीघडी कसाला सतावते. आँमचा रुपिया देयेल तो अमी तुमचा घराकडे कदीबी पहाणार नयी समजले षाब !

**मामा**—शेटजी, असा रागाऊं नकोस. बैस तर खरा.

**अप्पा**—माम्या तुं आपलं काम कर. पत्यांची चटपट कर चल. त्याच्या नादीं लागून काय उपयोग.

**फुन्नाजी**—अप्पाषाब मे तो हा तमचा विचार बडा- षाबाच्या कानावर घालेल षमजला. आमचा रुपिया टाका आज- चा आज. आमचा पैका या घडीला तमे गिणला पाहिजे. अमे इथूनशी हलणार नयी.

**अप्पा**—कां मारवाड्या, फारसें तोंड सोडलें आहेस, बैस तिथें उगीच, वटवट किती करितोस ? कर माम्या डावाला आरंभ. मैनाजी हं चालूंद्या. ( विडी ओढतो. ) माम्या पत्ते वांट.

रामांचीं दर्शनें नको असतील असेंच कीं नाहीं! माम्या, कर पत्यांची चटपट.

**मैनाजी** — अहो आपणांसारख्या भाग्यवानांनां रामांचीं दर्शनंचशीं काय पण स्पर्शनं दिखील— ( हांसते ).

**अप्पा** — वा : मोठ्या चतुर आहांत बोवा! तुम्हाला फिरून मज्जाव व्हायची नाहीं. हें घ्या तुम्हाला बक्षीस. ( पांच रुपये दहा रुपयांच्या नोटेंत ठेवितो अन् त्याची पुडी करून मैनेच्या अंगावर फेंकतो. )

**मैना** — ( रागावलीसें दाखवितें ) हें काय हें, वेडच लागलं आहे अगदीं! ती पुडी लागली नसेल वाटतं आमच्या अंगाला !

**अप्पा**— यं, गुलाबाचें फूलचना अगदीं ! नको असली तर आणा ती आमची पुडी इकडे. ( हात पुढें करितो. )

**मैना**— हो, वाटपहा, देईन तर आतां. ( पुढी चोळींत ठेविते. )

**अप्पा**— मैनाजी, तो आमचा गळपट्टा, झाला कीं नाहीं तयार अजून ?

**मैना**—साहेब, आज दोन दिवस कसं तें फावलंच नाहीं. आपण तो मंदिली खण परवां बसन्पंचमिला दिलात त्याची चोळी शिवण्यांत सगळा वेळ गेला. शिवाय तो आपला अन् माझा फोटोग्राफ फ्रेममध्यें बसविला. काय पण माशुक दिसतो आहे साहेब!

**अप्पा**—अरे वा:, त्या खणाची चोळी शिवून अंगांत दिखील घालून आलां आहांत आज ! आमची तिकडे नजरच गेली नाहीं. चोळी अगदीं स्वतः शिवलीत अं ! उद्योगापुढें कमाल आहे बोवा !

**मैना**— आपण प्रेमानं दिलेल्या खणाला दुसऱ्याचा हात लागूं द्यायचा मग काय मेलं राहिलं तें ! ती चोळी शिवतांना दोनदां हाताला सुई बोंचली पण तें कांहीं मनांत न आणितां चोळी शिवणं संपलं तेव्हां आज उठलें. या चोळीला आतां एक

तेवढा शालू मिळाला म्हणजे बहार होणार आहे. पण केव्हां आ॰ तां मेहेरबानी होईल ती होवो.

**मामा**— अहो शालू मिळेल. शालू देण्याला आमचे अप्पा॰ साहेब नामर्द आहेत कीं काय ?

**मैना**— हें हो काय तुमचं असं बोलणं! मी पण कुठें तसं म्हणतें आहे. या शिमग्याला आतां शालू पाहिजे सांगतें आहे.

**अप्पा**—देऊं एक तुह्माला शालू मैनाजी, असा दम सो॰ डूं नका.

**मैना**—हें पहा हो. कांहीं तरी बोलायचं झालं!

(फुन्ना मारवाडी येतो.)

**फुन्नाजी**—( सलाम करितो. ) रावषाब, आमचाँ तो काँम् ध्या घडीला झाला पाहिजे. हां !

**अप्पा**—कोणीं रे या मारवाड्याला वर येण्याची परवानगी दिली ?

**फुन्नाजी**—आमाला तो परवाणगी रसाणगी नयी लागते षाब ! अमेतो वर एकदम येणार माणप हाये. तमे असा अ॰ माला घडीघडी कसाला सतावते. आँमचा रुपिया देयेल तो अमी तुमचा घराकडे कदीबी पहाणार नयी समजले षाब !

**मामा**–शेटजी, असा रागाऊं नकोस. बैस तर खरा.

**अप्पा**—माम्या तुं आपलं काम कर. पत्यांची चटपट कर चल. त्याच्या नादीं लागून काय उपयोग.

**फुन्नाजी**—अप्पाषाब मे तो हा तमचा विचार बडा॰ षाबाच्या कानावर घालेल षमजला. आमचा रुपिया टाका आज॰ चा आज. आमचा पैका या घडीला तमे गिणला पाहिजे. अमे इथूनशी हलणार नयी.

**अप्पा**—कां मारवाड्या, फारसें तोंड सोडलें आहेस, बैस तिथें उगीच, वटवट किती करितोस ? कर माम्या डावाला आरंभ. मैनाजी हं चालूंद्या. ( विडी ओढतो. ) माम्या पत्ते वांट.

**मामा**—आमची तयारी आहे ( मामा वांटणी करितो. ) तांबडा बदाम आला आहे हुकूम ! मैनाजी कसा काय तुमचा डाव आहे ?

**फुन्नाजी**—आंमचा तो रुपिया असे मांगते. ( वह्या चाळतो) आमचा काय तो विचार सवषाब तमे करेल तो वरी गोष्ट होणार आहे पमजला षाब.

**अप्पा**—माम्या, मैनाजीवर या डावांत डबल बेझिक झाले पाहिजे. ( पत्तें चाळतो ) अरे हा माझ्याकडे या डावांत काय हा लाट आला आहे ! किती हे राजे अन् एके अन् हे हुकूम ! मैनाजी तुमच्याकडे किती राण्या आल्या आहेत ! ( हांसतो. )

**मैनाजी**—साहेबांनां लागतील तितक्या! ( पत्ते चाळते व हांसते. )

**मामा**—या अप्पासाहेबांचें नशीब अगदीं बोवा फळफळतें आहे जसें. खेळांतच काय पण सगळ्या कामांत यांचा आपला लाट उडतो आहे. पैसे कसे रोज घरीं हातांपायां पडत येत आहेत याच्या ! कां मी ह्मणतों तें खरें कीं नाहीं शेटजी ?

**फुन्नाजी**—त्येचा आमॉला काय होय! आमाचा बॉडाचा पैसा ने व्याज अप्पाषाब बडाषाबा कडूनशी तमे काढोन दिला पाहिजे. अषा न झाला तो कोडतामंदी दावा करून षाबावर असे तो षम्मॉन काढणार!

**अप्पा**—अशी मारवाड्या कटकट करूं नको बोवा. आमची कोण चालली आहे बहार! तुझे लेका पैसे एका मिनिटांत फेंकून देईन. हं, चालूंद्या, टाका डाव मैनाजी ?

**मैना**—हं, हें पहा, हें झालं आमचं एक लगीन.

**मामा**—तुमचें लगीन ! अन् ते बोवां कोणाशीं?

**मैना**—कुणाशीं म्हणजे, हें काय विचारायचें ? ( अप्पासाहेबांकडे पाहून मुरका मारते. )

**अप्पा**— या बायकांपुढें हद्द आहे ! हे घ्या तुम्हाला. ( दहा रुपयांची नोंट फेंकतो, मैना ती टेविते. ) हे झाले आमचे

पांचशें. माम्या फिरीव तो कांटा. किती झाले आतां एकंदर? पंन्नाशें.

**मामा**— आमचे झाले साडे सातशें अन् पंचवीस. (डब्यांत-ली पट्टी अन् तंबाकू खातो.)

**मैनाजी**— आमचे झाले बारशें. (पट्टी काढते व अप्पा-साहेबांनां देते.)

**अप्पा**— आमचे लागले तुमच्यावर तीनशें मैनाजी.

**फुन्नाजी**— आँमचा निकाल न करेल तो गोष्ट बरी होणार नयी. बडाबाब म्हणतो अप्पाबाबाशी जा, ने तमे तो अमास्ने झिडकारून देते. अबा अमा गरीबाला का हरघडी सतावते बरं गवबाब?

( विसाजीपंत येतो. )

**अप्पा**— अरे कोणरे हा या मंडळीला वर येण्याला परवा-नगी देतो? या मंडळीनें तर आमच्या घराचा उंबरा झिजविला बोवा!

**विसाजी**— ( उभ्यानेंच ) आमचा असा त्रास जर आ-पणांला येऊं लागला तर मग आम्हीं जावें तरी कोणाच्या दारा-शीं; आमची दाद लागावी कशी?

**मामा**— बसा तर खरे पंत. अहो हळूहळूं सगळी दाद लागेल. ( विसाजी एकीकडे बसतो. )

**अप्पा**— काहो, तुम्ही किती मूर्ख, गाढव अहांत हो? क-शाला आमच्या घरीं येत असतां? त्रिदोष झाला म्हणजे मग वैद्य सोधायला लागावयाचें!

**विसाजी**— अप्पासाहेब मी पदर पसरतों, पायां पडतों, पुन्हां नाहीं अशी चुकी व्हावयाची.

**अप्पा**—तुम्हीं ही अलीकडली मंडळी म्हणजे अगदीं व्य-वहार शून्य! जा, आमच्याकडे येऊन कांहींएक गुण यायचा नाहीं.

**मैना**—असं काय मेलं त्यांना झिडकरून द्यायचं अगदीं तें? तशीच एखादी मात्रा शोधून काढावी म्हणजे येईल गुण.

**अप्पा**— तुम्हाला वकील नेमिलें आहे वाटतें त्याणीं ?

**मैना**— हें काय बोलणं हें ? माणसाला एखाद्याची दया येतच असते. अलीकडे पहातें तो फारच अगदीं!

**अप्पा**—बस्स तुला कोणीं ह्या उठाठेवी सांगितल्या आहेत. ( मारवाड्याला ) जा रे फुन्या उद्यां ये जा, आज नको येथें धरणें धरून वसूं. चल टाक डाव माम्या ?

**मैना**— इतकं तें रागावायला कशाला हवं होतं? मी चुकलें, माफी मागतें. ( रुसून एकीकडे बसते. )

**अप्पा**— खेळ तर पुढें पाहून. पहा आतां मैनाजी तुमच्यावर कसा डाव करितों तो !

**फुन्ना**— अप्पाषाब, आँमचा रुपिया टाकला पाहिजे आज्-चा आज.

**अप्पा**— कोण आहे रे, विठ्या ? या मारवाड्याला खालीं काढ येथून. उगीच लाविली आहे मघापासून पिरपीर! हा घे चल माम्या आमचा हुकूम. ही आमच्यावर डाव करिते नाहीं?

**मैना**— साहेब आम्ही गरीबांनीं काय करायचा आहे आपल्यावर डाव !

**विसाजी**— मला एकवार पदरांत घेतलाच पाहिजे. माझी मुलेंबाळें उपाशी मरताहेत. ( डोळे पुसतो. )

**अप्पा**–किती बोवा त्रास देतां हो ? पहिल्यान्दां कोठें गेलें होतें हें तुमचें शहाणपण ? तरी बरें तुमचे डोळे अंजन घालून उघडले होते. नुसते कर्जाऊ रुपये द्यायाचे, पण या मंडळीला वाटतें कीं, एकदां या अप्पासाहेबाजवळ रुपये आले कीं, झाले गिळंकृत. पण हा अप्पासाहेब कोणाची एक कवडी ठेवणारां-पैकीं नाहीं हें या मंडळीला कसें तें समजतच नाहीं.–मारवाड्या तूं येथून आतां उठतोस कीं नाहीं. उद्यां ये ह्मणून सांगितलें ना तुला?

**फुन्ना**–रावषाब, तमचा उद्या नें परमदाडे तो कदीबी आँपला हाँयेच. ( वही काढतो ) हें पहा षाब आमचा पांच हज्जार

रुपिया मुदल, ने तण् हजार रुपिया व्याज, ने दोडसो रुपिया मनोती अने तमचा देव भला करो, बीस ने पांच रुपिया बांडाचा इष्टाप, ने शंभर रुपया दलाली, हा इतका पैका तमे तो काले दिलाच पाहिजे. उद्यां दस वाजतां अमे पेम्याला धाडूनशी देल, त्येला रुपिया तमे जो न देल तो वोकिलाची नोटीस बडासाबाला भेजेल, ने कोडतामंदी फिर्यादी लाऊनशी बडासाबाचा संमदा सॉमान अमे तो जप्तीत ठेवेल. हॉं. षाब तुमाला आज बजावतोहै. हा अमे नघालो येथूनशी.

**अप्पा**——झाली तुझी मारवाड्या वटवट, कां राहिली आहे अजून थोडीशी ? जा, आतां जा. लेका तुझ्यावांचून अम्हाला धडगत नाहीं आमच्यावांचून तुला नाहीं !

**फुन्ना**——( जातां जातां ) तमाला तो रावषाव समदी थट्टाच वाटते. अमाला लेकाबिका काय म्हणून म्हणतां हरघडी? मारवाडी कोठें बामणाचा तो लेक फारच होत अशेल! [ जातो. ]

**अप्पा**—— मैनाजी, हा घ्या आमचा एक्का.

**मैना**——हा घ्या आमचा हुकूम. झाला डाव. मोजा आतां किती मार्क लागले ते मामा ?

**मामा**——मोजतों बोवा.

**विसाजी**——आपल्या म्हणण्याप्रमाणें मीं तजवीज केली आहे. ( पुडकें पुढें करतो ) हें पहा साहेब, मी आतां साष्टांग नमस्कार घालतों! ( तसें करतो. ) माझ्यावर एक वेळ दया करावी. मला अन्नाला लावावें.

**अप्पा**——बोवा शर्थ आहे तुमच्या तेलंगीपणापुढें. बरें उद्यां या जा. ( पुडकें मामाच्या स्वाधीन करतो. ) पहातों आतां कसें जुळेल तसें. उद्योग माझा नशीब तुमचें. तुमचा तो अर्ज आणून द्या छापून. त्यांत मीं सांगितल्याप्रमाणें दुरुस्त्या केल्या अहांतना?

**विसाजी**——जी, सगळ्या केल्या आहेत. अर्ज उद्यां देतों आपल्याजवळ.

**अप्पा**—तो माझा दुरुस्त्या केलेला ड्राफ्ट अजून आणला नाहींत, तो आतांच्या आतां घेऊन या. किती दिवस ठेवलांत बोवा जवळ ?

**विसाजी**—राहिला खरा फार दिवस. आतां आणून हजर करितों.

**अप्पा**—जा आतां तुम्ही.

(विसाजी जातो. विठ्या एक लखोटा घेऊन येतो.)

**विठ्या**—साव, योक पट्टेवाला हा लाखोटा घ्येऊनशी आला-या. म्हणत्या कीं बंगल्यावर आत्तां बोलावलया.

**अप्पा**— काय बोवा आतां इतकें लांब तांगडत जायचें! चला, गेलें पाहिजे. विठ्या, त्या शिपायाला सांग तूं पुढें हो मी-आलोंच तुझ्या मागून. त्या खंडूला म्हणावें गाडी जोड. माझ्या त्या खोलीला नीट कुलूप लाव. चला मैनाजी, एक पट्टी तर द्या ?

**मैना**— जी, हजर आहे. कठीण बाई हा आपला उद्योग! रात्र नाहीं दिवस नाहीं सदा काम आहेच. विश्रांती म्हणून कशी ती ठाऊक नाहीं!

**अप्पा**— (पोषाख करून) बरें येतों अम्ही आतां, गुड नाईट. (शेक ह्यांड करायाला हात पुढें करितो.)

**मैना**— मी येतें गाडींत फिरायाला बरोबर.

**अप्पा**— छे: छे:, आज नाहीं उद्यां जाऊं आपण. द्या आतां रजा.

**मैना**— नाहीं. मी नाहीं ऐकायची, मी येणार बस्स.

**अप्पा**— बरें, चला. तुम्हाला ना म्हणून आमचे चालणार आहे ?

(ते जातात.)

---

## प्रवेश २ रा

**स्थल**— भाऊसाहेबांचा दिवाणखाना.

( भाऊसाहेबांची मुलगी ठकू तिसऱ्या प्रहरीं दिवाणखान्यांतील एका कोंचावर टेंकून बसली आहे. )

**ठकू**—( आपल्याशीं ) आज मडम कां बरं अजून शिकवायला आली नाहीं? तिची रोजची यायची वेळ तर होऊन गेली. आज तिची दुसरी कुठली एंगेजमेंट असेल काय ? पण काल ती कुठं बोलली नाहीं. गेली असेल झालं कुठं तरी. ( जांभई देते ) कालचं तें संगीत शाकुंतल मोठं बहारीचं झालं. काय बाई त्या शकुंतलेनं मौज मौज केली! आवाज तरी किती गोड गोड होता त्या शकुंतलेच्या पात्राचा ? तिनं म्हटलेलीं तीं पदं माझ्या कानांत कशीं अजून गुणगुणताहेत ? त्या शकुंतलेची लव्हन काय त्रेधा उडून गेली होती. पण तिच्या सख्या मोठ्या हुशार बाई! ती प्रियंवदा तर सदा गोडबोलीच! मग जेव्हां कां शकुंतलेची अन् दुष्यंताची एकदम गांठ पडली तेव्हां काय बाई मोठी मोठी मौज उडाली. पण कसला मेला कवि तो. त्या दुष्टानं त्या दोघांना पुरतं बोलून दिखील दिलं नाहीं! त्या उभयतांचे कुठे दोन शब्द होताहेत तो केला त्या कवीनं रसाचा विरस. ( मडम येते ) ह्या आल्याच मडममाहेब. ( एकदम उठते. ) गुड इव्हिनिंग मडममाब.

**मडम**—गुड इव्हिनिंग माय डियर. ( तिचा मुका घेते. ) अमाला थोडासा आज लेट झाला. ( कोंचावर दोघी बसतात. ) ठकू, तुमचा आज गळपट्टा किती झ्याला डेखूं ?

**ठकू**— आज मी, मडम, गळपट्टा करायाला बसलेंच नाहींग. तुह्मी येण्याच्या आधींच मी निजून उठलें. ( जांभया देते. )

**मडम**— हें बहुट वाईट.दुपारची स्लीप आगडी चांगली नथी. तुमच्या सारख्या तरुण मुलीनं तर कदिबि निजूं नये दुपारचा.

**ठकू**— काय करूं हो तर? कालचं रात्रीचं जाग्रण झालं होतं ह्मणून निजलें आज दुपारची घटकाभर.

**मडम**—रात्रींचं बहुट्वेळ जाग्रण तर आगदी, आगदी वाईट. त्यानं डोळा खराब होटो. फूड डायजेष्ट होट् नयी. असा लयी वाडूळ कडी रात्रीचा जागू नयी.

**ठकू**—मडम, काल ती चिमणी आली होती बोलावायला, तिच्या बरोबर संगीत नाटकाला गेलें होतेंग.

**मडम**—हें टर आगडी आगडी आगडी चाँगला नयी. मुली-लोकांनीं स्वटंत्रपणानं कडी कडी अशी एन्टरटेनमेंट् देखुं नयी. हा आमाला आगडी पसंत नयी. आमी बापूसाबाला हा खचिट सागूं. एखाद्या वेळीं आपल्या पटीबरोबर गेलं टर हारकट नयीं आसं आमचं ह्मणणं.

**ठकू**— बरं, कळलं तुमचं म्हणणं. तु सांगितलंस तरी मी कुठें भितें आहें ! तुझा पहातें तो फारच अगदीं ष्ट्रीक्टपणा. गेलं एखादे वेळीं नाटकाला ह्मणून काय झालं ?—काल किनयी मडम त्या शकुंतलेचं नाटक होतं हो.

**मडम**— ठाऊक आहे अमाला टो नाटक. मोठा चांगला हाये. पण अमी म्हणतो बापुसाबाबरोबर गेला म्हंजी चांगला.

**ठकू**— तें असूंद्यांहो. पण त्या नाटकांत मोठी मौज मौज होती मडम, तुम्हाला नेईन अं तें एक दिवस पहायला. त्यामध्यें लव्हमारेजचं प्रिन्सिपल अगदीं कसं पुरं आहेहो !

**मडम**— टुमच्यामंडी अशीं म्यारेजेस पूर्वी होटींच.

**ठकू**—पण या मेल्यांनीं तीं आतां नाहींशीं करून टाकलीं आहेतना ? हें पहाग मडम, त्या नाटकांत किनयींग, शंकुतला आपल्या सख्यांबरोबर बॉत्रमध्यें लव्हच्या गोष्टी सांगत बसली होतीग. दुष्यंत राजा त्यांचीं बोलणीं झाडांच्या आडून ऐकत होतां, अन् जो ह्मणतीस तो एकदम त्यांच्या समोर आला तेव्हां काय मौज मौज झाली. मग किनयींग—

**मडम**—पुरे झाला टो मौज. आजचा लेसन काढा आधीं ?

**ठकू**—कांग माझ्या गोष्टीचा असा हिरमोड करतीस ? मग त्यांचं गांधर्व रीतीनं तिच्या बापाच्या नकळत लग्न झालं. पण तो बाप किती शहाणा ! त्यानं लागलीच शकुंतलेला गोड गोड उपदेश करून तिच्या नवऱ्याकडे पाठविली. नाहीं तर मेले आ-तांचे हे बाप. स्लेव्हरीप्रीय !

**मडम**— हं काढा आजचा लेसन्.

**ठकू**— मडम मला आज कंटाळा आला आहे. आजच्या दिवस सुटी द्या गडे.

**मडम**— असा अभ्यासाचा हेळसांड चांगला नयी. आमचा काय जाटो. तुमी सर्व शिकलाट टे विसरून जाल !

**ठकू**— आजच्या दिवसाचीचना पण मी कायती सुट्टी मागतें आहे ?

**मडम**—बरं. आटा आमालाही आज लौकर जायचा आहे. उद्याला, टी पर्वा सांगिटलेली स्ट्रीस्वातंत्र्याची पोएटरी तोंड-पाठ करा,गळपट्टा सगळा संपवा. उद्या पियानोवर टुला नवा ट्यून शिकवीन. भाऊसाबाचा सपाटा लोकरीचा लौकर पुरा करा. ठकू,आमचा चार महिन्याचा पगार राहिला आहे, टो अमाला आटा पाहिजे. बापूसाब कडी येणार? आमचा पगार एकसेवीस झाला आहे. बापू लौकर यायाचा नसला टर भाऊसाबाजवळ पगार मांगून ठेवा.

**ठकू**—आजच येतों म्हणून पत्र आहे. हें बघाना पाहिजे तर.

**मडम**— आल राईट, त्याचापाशी पगार मांगून ठेवा. आमी जाटो आटा. ( तिचा मुका घेऊन जाते. )

**ठकू**—काय बाई, मडमेचा चार महिन्यांचा पगार ठेवणं म्हणजे काय ! तिला मेहेनत द्यायची सुद्धां आतां शेम वाटूं लागली आहे. त्या पियानोबद्दल बिल् हाकामारीत पडलं आहे. तो इंग्रजी सूट घेतला त्याच्या मडमेकडून रोज बिल् घेऊन शिपाई खेपा घालतोच आहे. बाबानां तरी किती मेला रोजच्या रोज त्रास

द्यावा ! आज गांवाहून तर येऊं दे ह्मणजे पहा कशी खरड कहाढते ती ?

( ठकूचे वडील भाऊसाहेब कचेरींतून येतात. )

**भाऊ**— वेल् ठकू अजून बापू आला नाहीं ? आज यायचा होताना ?

**ठकू**— हो, हें पहा आजचं सकाळचंच पत्र आहे.

**भाऊ**— काय बेटे हे अगदीं व्यवहारशून्य. अम्ही यांच्या करितां रात्रंदिवस खटपटी कराव्या, यांच्या हें खिजगणतींत सुद्धां नसायचें ! एकदां येऊन जा अशीं त्याला आज महिनांभर एकसारखीं पत्रें पाठवितों पण त्याचें आज आज उद्यां उद्यां हें कांहीं कधीं संपत नाहीं. फसलों या अशा फ्लिपंट मनुष्याच्या नादीं लागून !

**ठकू**—बरा आपला आपल्यालाच पश्चात्ताप होतो आहे ह्मणून. मी त्या वेळीं नको नको म्हणत असतां हट्टानं सगळ्या गोष्टि केल्या, माझं ऐकलं नाहीं त्याचे हे परिणाम. मी अगदीं वरच आलें होतें कीं नाहीं बिजवराला द्यायला !

**भाऊ**—कितीग बोलतेस तूं हें ? मी त्याच्या त्या हुषारीला भुललों.

**ठकू**—अहाहा, दिवे लागले त्या हुषारीचे! परिक्षेमध्यें चार चारदां नापास व्हायचं, पगार रुपड्या तीस ! त्या गोदूच्या नवऱ्याला पहा कसा साडेचारशें, वेणुच्याला साडेपांचशें, माथीसाहेबाच्यांना साडेमहाशें. खणाखण त्यांच्या घरीं रुपये झडताहेत कसे ते ?

**भाऊ**—अग हें ज्याचें त्याचें नशीब आहे.

**ठकू**—त्या मेल्या नशीबानं काय करावं. थोडी तरतरी ठेवायची नाहीं, उद्योग करायचा नाहीं, मठ्ठासारखं खरडे घाशींत बसणंच गोड वाटतं.

( बापूसाहेब हातांत ब्याग् घेऊन येतो. )

**बापु**—( ब्याग् कोपऱ्यांत ठेऊन ) वेल, गुडइव्हिनिंग भाऊसाहेब आर यू आल राईट ठकू?

**ठकू**—माझ्याशीं नाहीं बोलायचं बस्स. माझ्या त्या मर्नीडि- मांडस् आधीं साटिस्फाय केल्या पाहिजेत सांगतें आहे.

**बापू**—भाऊसाहेब, आलों आपल्या पत्राप्रमाणें. रजा मिळ- ण्याची मोठी मारामार पडली. (चिरुट ओढीत खुर्चीवर बसतो.) काय हुकूम?

**भाऊ**—कसलेरे तुह्मी हे लोक ? तुह्माला पर्वा ह्मणून नाहीं. एक महिनाभर पत्रें पाठवून पाठवून थकलों अह्मी, पण तुमच्या तें गावींही नाहीं.

**ठकू**— कशाला असेल गांवीं. इथे झाला आहे कर्जाचा बुजबुजाट, रोज देणेदारांचीं मागण्यावर मागणीं आहेतच. किती सोसाव्या या तुमच्या अडचणी बाबांनीं ? तुम्हाला वाटतं सास- ऱ्याच्या घरीं रुपयांचीं झाडंच लागून गेलीं आहेत!

**भाऊ**— कितीग हें बोलतेस ठके? तुला कोणीं सांगितल्या आहेत ह्या उठाठेवी करायला ?

**ठकू**— कायहो तर बाबा, त्या मडमेचा चार महिन्याचा पगार देणं राहिला आहे, तें पियानोचं बिल्, तें इंग्रजी सुटचं बिल्, तीं दुसरीं आणखी बिलं हकामारीत पडलींच आहेत. आपण कांहीं आमचा जन्माचा का पत्कर घेतला आहे? त्या अशिक्षित पोरींची नेहमींची हाव् असते कीं आपल्या आईबापांच्या इथून निघतील तितके पैसे काढून आपली भर करून घ्यायची, पण माझ्यासारख्या शिकल्या सवरलेल्या मुलीला हें अगदीं आवडत नाहीं.

**बापू**— वेल् नेव्हरमाईंड. सगळ्यांचे पैसे हळूहळू देऊन टाकितां येतील त्याला काय उशीर. सगळें सोईसोईन होणार आहे.

**भाऊ**— बापू, मी बोवा तुमच्या करितां एक पै देखील खर्चणार नाहीं अशी शपथ वाहिली आहे. अहो एक तुम्हाला ही कारटी दिली इच्यापाई मी आपलें सगळें घरदार भरीला घा- लूं कीं काय! माझ्या स्वत:चा संसार आहे मला थोडा तरी. तुम्हीच प- हा बरें तुमच्या म्यारेजला मनी मींच स्पेंड केला, तुमच्या कालेजाच ।

खर्च मींच चालविला, ह्या ठकीच्या एज्युकेशनला पैसा माझाच; मनांत मीं विचार केला कीं तुमची ही बी. ए. ची परीक्षा एकदां उतरती ह्मणजे बरें झालें असतें. बरें नाहीं तर नाहीं ती परीक्षा. चारचौघांपुढें आह्मीं तोंडें वेंगाडून दिली तुह्माला त्या खात्यांत चाकरी लाऊन पण तेथें तरी आज तीन चार वर्षें बढतीच्या नावानें आवळ्या येवढें पूज्य. एकसारखी खरडेघांशीशीं गांठ. हा आतां परिणाम तरी कसा लागायचा ?

**बापू**—वेल तुमचा एक पैसा सुद्धां रहायचा नाहीं पण चार दिवस संभाळून घेतलें पाहिजे माझी ही उद्या डिपार्टमेंटची परीक्षा उतरली कीं काम झालेंच ह्मणून समजा.

**ठकू**—या मेल्या परीक्षा जन्माला लागल्याच आहेत. मी साफ सांगतें आहें ही परीक्षा कांहीं आतां उतरावयाची नाहीं. ही माझी काळ्या दगडावरली रेघ. लोकं पहा तुमच्याच खात्यांत बढतींच्या जागा कशा पटकावितांहेत त्या. तो गंगूचा नवरा अव्वल कारकुनाचा एकदम तहशीलदार झाला. त्याच्या कोठें उतरल्या आहेत परीक्षा. कांहीं बरं उद्योग केला, खटपट केली, रामा, शिवा, गोविंदा !

**बापू**—कसल्या खटपटी करावयाच्या ? आपणाला नकोत तसल्या त्या खटपटी.

**ठकू**—बसा तर मग असे बारान् बारा चोवीस वर्सं खरडे घांशीत. माझीं हीं सगळीं बिलं चुकतीं करुन दिल्याखेरीज मी आतां हितून हलूं द्यायची नाहीं सांगतें आहें.

**भाऊ**—बायकांच्या जातीनं कितीं तरी गलबल करावी ठके. बापू, प्रमोशन मिळण्याबद्दल तुह्मांला कांहीं तरी उद्योग हा केलाच पाहिजे. तुह्मी ह्मणतां तशीं कानांत तुळशीपत्रें घालून बसण्याचे हे दिवस नाहीं आहेत. चालेल त्याणें झटपट आपलें कल्याण करुन घ्यावें. पुढें मागें पाहूं नये.

( अप्पासाहेब येतो )

वेल् अप्पासाहेब, बरे वेळेवर आलात, या, बसा या खुर्चीवर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

मी या आमच्या बापूला मघांपासून उपदेश करितों आहे पण त्याला कांहीं तें पटत नाहीं.

**अप्पा** --बापूसाहेब, केव्हां आलांत, बरे खुशाल? हात पाहूं तुमचे, चारनिशी खरडतां खरडतां हाताला घट्टे पडले कीं नाहींत अजून ( हंसतो ).

**ठकू**--असे चांगले डोळे उघडा अप्पासाहेब.

**बापू**--वेल् यू बी क्वाएट. मी जोंपर्यंत बोलत नाहीं, सगळें ऐकून घेतों तों तुझें फारच वाढत चाललें, आय वॉंट हियर सच नॉन्सेन्स!

**भाऊ**--अप्पासाहेब, एवढें आमच्या जावई बोवाचें तुमच्या हातून कांहीं कल्याण झालें तर पहा बोवा.

**अप्पा** --कल्याण होण्याला काय उशीर? तें तेव्हांच होणारें आहे.

**भाऊ**--तुम्ही अन् आमचा बापू क्लासफेलो आहांत, एकमेकांचे परम स्नेही. आमच्या बापूचा स्वभाव तुम्हाला ठाऊकच आहे. त्याच्या तर्फेनें आम्ही तुम्हाला सांगतों कीं एवढें त्याचें कल्याण तुम्हीं करून दिलेंत तर आम्हां सर्वांवर तुमचे मोठे उपकार होतील.

**ठकू**--इतकं कळवळून बाबा सांगताहेत पण इकडे आहे का कांहीं त्याचं?

**बापू**--वेल् अप्पा, मी तुम्हाला खरें सांगतों, आय डोंट लाईक युअर रिपोर्टेड वेज्.

**भाऊ**--तुम्ही या तिरशिंगरावांचें बोलणें कांहीं मनाला आणूं नका अप्पा.

**अप्पा**--मला त्याचा स्वभाव आजचा ठाऊक आहे असें नाहीं. बापूचें कल्याण करावयाला मी एका पायावर तयार आहें. बापूचें माझें नातें असें कांहीं नाहीं कीं त्याच्याबद्दल आपण मजजवळ इतकी कळवळ्यानें शिफारस करावयाला पाहिजे (भाऊसाहेबांच्या कानांत सांगतो ) हे कर्जाऊ द्यावयाचे! हाताला

सवड झाली कीं पगत येतील. असें हें जमलें कीं काम करुन घ्यावयाचें माझ्याकडे लागलें. एक महिना पंधरा दिवसांत सुभेदारीची जागा. असें हें जर मग माझ्या हातून न झालें तर हा अप्पासाहेब फिरुन आपल्याला तोंड दाखविणार नाहीं.

**भाऊ**—छेः छेः इतकें हें जमायचेंच नाहीं. आमची स्थिति तुम्हाला माहीतच आहे. हें घडावें कसें, मोठें संकट आहे.

**बापू**—माझ्याकरितां कां आपण इतके संकटांत पडतां? माझी एवढी परीक्षा उतरूं द्या कीं एका अर्जानें माझें काम होणार आहे. छेः माझ्याकरितां आपण कांहीं एक उद्योग करूं नका, या अप्पाच्या उगीच पोकळ थापा आहेत, अन् तो म्हणतो हें जरी खरें असलें तरी मला तें तसें कांहीं नको आहे. अप्पा, बोवा तुमच्या या खटपटीची कांहीं एक जरूर नाहीं.

**ठकू**—नुसतं उगीच बसून काय काय होतं हें दिखील पहावत नाहीं ना! शर्थ आहे बाई या स्वभावापुढें!

**भाऊ**—अप्पा, मीं विचार केला; आपली नाहीं बोवा छाती चालत. पहा, कांहीं तरी थोडा विचार करून पहा, तुमचे परस्पर स्नेहसंबंध लक्षांत आणा, आमच्या बापूला व्यवहार म्हणजे कसा तो समजतच नाहीं. तुम्ही नका कांहीं त्याचें लक्षांत आणूं. तुम्हीच पहा बरें या तीस रुपड्यांवर याचा कसा निर्वाह लागावा. या पगारावर का यानें आपलें पोट भरावें, का बायकोचें एज्युकेशन वाढवावें, का कर्जदारांची फेड करावी कीं करावें तरी काय! यांच्या चालल्या दिवसानुदिवस स्टेटस प्रमाणें डिमांड्स् वाढत; अन् घरांत पैसा येण्याच्या नांवानें आवळ्या एवढें पूज्य. आम्ही तरी आतां किती दिवस यांचे हे खर्च चालवावे.

**अप्पा**—भाऊसाहेब, आपण म्हणतां या सर्व गोष्टी खऱ्या, पण माझा कांहीं एक इलाज चालत नाहीं, मीं तरी काय करावें? मला असें का वाटतें कीं माझा परममित्र बापू यांचें

मीं कांहींच साहाय्य करूं नये. या बापूचा स्वभाव अतिशय चमत्कारिक पडला, नाहीं तर आज आपणा पर्यंत दिखील येण्याची जरूर नव्हती. कधीं बोवा याला खरा व्यवहार समजूं लागेल कोण जाणे. हें पहा भाऊसाहेब ( त्यांच्या कानांत सांगतो ) या इतक्याचीं तर छाती तुम्हीं केलीच पाहिजे. याउप्पर माझा इलाज नाहीं. आपणासारख्यांनीं ही गोष्ट मनावर घेतली तरच हें बापूचें काम होणार आहे. रुपयांबद्दल काळजी नको रुपये ब्यांकेंत आहेत असें समजा.

**बापू**—अप्पा, तुला वेड तर नाहीं लागलें. मला या गोष्टीची कांहीं एक जरूर नाहीं. हल्लींच्या चाकरीचा राजीनामा देण्याचा प्रसंग आला तरी बेहेत्तर आहे !

**ठकू**—राजीनामा देऊन सासऱ्याच्याच उरावर जेवणं झोडीत बसायचीं कीं नाहीं ?

**बापू**—भाऊसाहेब. आय टेल यू, हीं अशीं बोलणीं मीं पुन्हां ऐकून घ्यायचा नाहीं. मला कांहीं तरी थोडा सेल्फरिस्पेक्ट आहे. माणूस एकवेळ ऐकून घेईल, दोनवेळ घेईल. रोज काय हा त्रास ?

**अप्पा**—अरे बापू, असा रागावूं नकोस. त्या ठकू वहिनीचें बोलणें काय मनाला आणावयाचें ? ती गेली आहे बिचारी कादून अगदीं. तिच्या बरोबरीच्या बायकांच्या नवऱ्यांना मोठ मोठ्या चाकऱ्या असल्यामुळें त्यांचे संसार कसे उत्तम थाटले आहेत ! तेव्हां हिलाही वाटत असेल कीं आपलाही संसार असाच थाटावा. वहिनी, तूं कांहीं काळजी करूं नको; तुझाही बघ कसा लौकर संसार थाटून देतों तो.

**ठकू**—आमचा संसार आतां या जल्मीं तर नाहीं थाटायाचा ( रागावते ).

**अप्पा**—भाऊसाहेब, बापू, मी घेतों आतां रजा. या गोष्टीचा नीट पोक्तपणें विचार करून काय तें मला कळवा म्हणजे मी लागतों पुढच्या कामाला. बापू, तूं ज्या गांवीं हल्लीं आहेस कीं नाहीं त्याच गांवची सुभेदारीची जागा रिकामी करून ती तुला

देववितों. पहातर खरी मौज. जागा मिळाली म्हणजे मग समजेल हा अप्पा थापा मारतो कीं काय तें. भाऊसाहेब, मी म्हणतों तसें जुळलें तर बापूला उद्यां संध्याकाळीं माझ्या घरीं धाडून द्या. मी त्याला बंगल्यावर घेऊन जाणार आहे.

( अप्पा जातो )

**भाऊ**—बापू, पहा बोवा तो अप्पासाहेब तर असें असें ह्मणतो. तो ह्मणतो कीं, निदान पंधराशें रुपये आपल्याला कर्जाऊ पाहिजेत; व्याज चार टक्के मिळेल अन् हें तुमचें कामही होईल. आपल्याजवळ तर इतके रुपये शिलक नाहींत. मग कसें करावयाचें ?

**बापू**—छेः, तें नांव सुद्धां घेऊं नका. या कामीं फार दूरवर विचार केला पाहिजे.

**भाऊ**—कसलारे तुह्मी हा दूरवर विचार करितां ? वेडपे कुठले ! तुह्माला या गोष्टी कळविल्या हीच आमची चुकी झाली.

**ठकू**—पंधराशें रुपये कर्जाऊच ना पण द्यायचे ? ते पुन्हा परत यायचे नाहींत की काय ? मग त्यांत कसला मेला तो दूरवर विचार आला आहे ?

**भाऊ**—आह्मी सांगू तें तुह्माला ऐकलेंच पाहिजे. तुमचे ते नवेनवे विचार आमच्या कांहीं एक कामाला पडावयाचे नाहींत. आह्माला जें बरें दिसेल तें आह्मी करणार. दुसरी गोष्ट नाहीं.

**बापू**—माझें म्हणणें ऐकावयाचें नाहीं असें ह्मटलें तर माझा इलाज नाहीं. परंतु—

**भाऊ**—परंतु बिरंतु कांहीं एक नाहीं. तुम्ही ह्या कामांत कोणच्याही प्रकारची आडकाठी आणाल तर तुमचें आमचें पुन्हां मुखावलोकन होणार नाहीं. ठके, तुझ्या हातांतले ते गोठ, गळ्यांतली सरी अन् तेवढें गळ्यांतलें मोत्यांचें पेंडें पाहिजे, दे चल काढून.

**ठकू**—मी आपले दागिने ह्मणून काढून देणार नाहीं. माझ्या दागिन्यांवर काय ह्मणून धाड घालायची ती ?

**भाऊ**—तर मग फुकाचे येत असतात पैसे हे गहाण ठेव-ल्याखेरीज ?

**ठकू**—मला एवढेच काय ते नांव घेण्यासारखे दागिने आहेत; ते एकदांचे नाहींसे झाले कीं निवतील सगळ्यांचे डोळे.

**भाऊ**—(रागानें) जा शिंच्यो तुमचीं नशिबें तुमच्याजवळ ! मला कशाला पाहिजेत ह्या उठाठेवी. पण हें बघ, ठके, दागिने पुन्हां सोडवून आणतां येतील कळलें ? अन् याच्या सात सवाई दागिने नवे करून देण्याला बापू काय नामर्द आहे कीं काय? त्याच्या मोठ्या पगाराचे रुपये सांचले कीं दागिन्यांनां ग काय कमी ? काय ही तुझी दागिन्यांची हाव ? मग दुसऱ्यांनां काय हंसावें ? फुकट इतकी विद्या शिकलीस.

**ठकू**—हो, कळते ती लाडीगुडी आह्माला. पण मी नाहीं गडे द्यायची माझे दागिने. हें हो काय बाबा तुमचं !

**बापू**—पण कां एवढा जुलूम ? मला ती मोठी चाकरी-ही नको अन् कांहीं एक नको.

**भाऊ**—बरें आहे, कळलीं तुह्मां दोघांचीं शहाणपणें आह्मा-ला. आतां आह्मालाच वाटतील तेथून आणूं आह्मी रुपये. त्या फुन्या-मारवाड्याला बोलावून आणलें कीं रुपयेच रुपये. आतां व्याज जास्त पडेल पण त्याचें घेऊं पाहून, सगळेंच कसें जुळतें ? बापू, जा आतां तुह्मी खालीं जेवणाबिवणाची तजवीज पहा. नका धरून बसूं हा हट्ट.

**बापू**—बरें आहे. मी आपल्या बाहेर नाहीं (जातांजातां) आशा मोठी कठीण आहे. हे रुपये कसे तरी अडचण सोसून फिटतील पण हा अप्पा ह्मणतो अशी गोष्ट असली तर द्यावी झालं जुळवून. आपल्या एका करितां ह्या सर्वांच्या मर्जी कशा-ला मोडाव्या ? (जातो)

**भाऊसाहेब**—ठके, तुला एक माझें सांगणें आहे. त्या आपल्या नवऱ्याची ह्मणून पुन्हां अशी अप्रतिष्ठा करूं नकोस. आतां उद्यां तूं त्याच्या बरोबर चाकरीच्या गांवीं गेल्यावर तेथें

त्याला अशी टाकून बोलत सुटलीस तर मग कमा परिणाम लागणार आहे ? चार लोकांत अप्रतिष्ठा, अन् तुझा उभयतांनां ही सुख लागावयाचें नाहीं. तूं शहाणी आहेस, याचा चांगला पोक्त विचार कर आपल्या मनाशीं.

**ठकू**—मला कांहीं वेड कां लागलं आहे असं पदोपदीं बोलायला ? ही एवढी मोठी चाकरी लागली ह्मणजे पहा कशी मर्जीनं राहीन ती ( जातात. )

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**—एक बंगला.

### अप्पासाहेब व पट्टेवाला.

**अप्पासाहेब**—( बंगल्याजवळ येतो. ) पट्टेवाला, बडसाहेबांनां कळीव कीं अप्पा आला आहे.

**पट्टेवाला**—साहेब बाहेर गेले आहेत अप्पासाव.

**अप्पा**—बरं आहे ( तो बंगल्यांच्या आंत जाऊन एका खोलींत टेबलाशेजारीं खुर्चीवर बसतो. व टेबलावरील एक फाईल हातात घेतो. ) काय युक्ती करावी, ह्या बापूला एकदम सुभेदारीची जागा कशी द्यावी, याच्यावर तर मंडळी अजून बरीच आहे, कसें करावें? हं. ती मीं मनांत आणलेलीच युक्ति बरी. त्या रावसाहेबांची करावी बदली त्या दुसऱ्या घाणेरड्या गांवीं अन् या बापूला त्याची जागा तूर्त आक्टिंग द्यावी. मग पुढें संधी आली कीं करावी त्याची जागा कायमची. या बापूसाहेबाची वाट पाहून थकलों बरीं. त्याला काळजीच नाहीं. आहे झालं अल्लड, झाडचा नवाच तुटलेला ! पण तो एथपर्यंत धांवत यायला चुकायचा नाहीं. मीं घरीं माम्याला सांगून ठेवलें आहे. त्याला एथें गाडी करून घेऊन ये ह्मणून..( पट्टेवाला येतो )

**पट्टेवाला**—साव. बाहेर बापुसाव या नांवाचं योक गिरस्त आल्याती.

**अप्पा**—वेल् पट्टेवाला, बडासाब यावयाला अजून किती देर आहे ?

**पट्टेवाला**—साब, अजून आधा घंटा तरी लागलसा वाटतोया. योक साब पाव्हणं आलं हयती त्येच्या संग बडसाब कळपा मंदी गेल्याती. असं वाटतं साब.

**अप्पा**—त्या बापूसाहेबाला मागल्या दारानें बोभाट न करितां आंत घेऊन या पाहूं ?

**पट्टेवाला**—जी साब, जसा हुकूम.

( तो जाऊं लागतो. )

**अप्पा**—पट्टेवाला, मी काल संध्याकाळीं आलों नाहीं म्हणून साहेब कांहीं म्हणत होते का ?

**पट्टेवाला**—जी, लयी वाटूळ वाट पायली साबांनीं. फार रागावले, मग पुढं नाचाचं अवतण व्हतं, तिकडं रात्रीच्या आठा घंट्याला गेलं त्ये नकाळच पांच वाजतां परत आलं साब.

**अप्पा**—बरं आहे. त्यांचा राग तेव्हांच नाहींसा करतां येईल जा, त्या बापूला घेऊन या जा ?

( पट्टेवाला जातो व बापूला घेऊन येतो )

**बापू**—अप्पासाहेब थोडासा उशीर झाला बोवा, एक्स-क्यूज.

**अप्पा**—तुम्ही लोक असेच. पंक्च्युआलिटी ठेवावी साहे-बलोकांनींच. ती चेअर घ्या. या, बसा असे या टेबलाजवळ. ( टेबलावरची फाईल घेतो. ) हें पाहिलेंत तुमच्या रावसाहेबाला आतां या गांवीं बदलावयाचें म्हणजे येईल तो ताळ्यावर.

**बापू**—मला माझ्या हल्लींच्या गांवीं तुम्ही म्हणत होतां त्या-प्रमाणें कायमची जागा दिली पाहिजे.

**अप्पा**—पण आम्ही गप्पाडे पडलोंना. थापा मारून तुम्हाला फसविणारे. तुम्ही म्हणजे बडे शिकलेले, मोठे मॉरलिष्ट, कशाला आमचें आर्जव करितां ? आम्ही पडलों हलकट माणसें !

**बापू**—आतां कां माझा अंत पहातां ? आम्हीं चुकलों, बोल-

ण्या चालण्याची माफी करा. आपल्या म्हणण्याप्रमाणें आम्हीं तयारी केली आतां कां आम्हाला छळतां ?

**अप्पा**—हं, हळू बोला, असल्या गोष्टी एवढ्या मोठ्यानें बोलतां, कसें बोवा तुम्हा लोकांनां तारतम्य नाहीं ? अहो भिंतीला कान असतात. कोण आहे ? कृष्णराव त्या ड्राफ्टाची कापी करावयाला दिली ती झाली कीं नाहीं अजून ?

**कृष्णराव**— ( एका कोपऱ्यांतल्या टेबलाजवळून. ) अप्पासाहेब झालीच. शेवटल्या दोनचार ओळी राहिल्या आहेत.

**अप्पा**—किती लेझी आहांत हो तुम्ही, करा झटपट ? बापूसाहेब, हें पाहिलेंत कां ? या गृहस्थांनां कालच ही एवढी मोठी एका शहरच्या माजिस्ट्रेटाची जागा मिळाली.

**बापू** —लोकांचीं उदाहरणें मला कशाला ? माझें कल्याण कराल तेव्हां खरें.

**अप्पा** —सगळें कांहीं दमादमानें होईल.

( पट्टेवाला येतो. )

**पट्टेवाला**—साब, बडेसाहेबांची गाडी आली.

**अप्पा** —हं बापू, त्या मागल्या दरवाजाच्या त्या कोपऱ्यांत झाडाखालीं एक मोडकी पेटी पडली आहे तिच्यावर जाऊन बसा जा. हं जा लौकर. मोठ्यानें बूट वाजवूं नका बुटाच्या पुढल्या टोंकावर चालत जा. चला उठा.

( बापू जातो )

( बडेसाहेब बंगल्याच्या पुढल्या दारानें मागल्या दारीं जाऊन उभे रहातात. )

**बडासाहेब**—( हात वर करून ) पट्टेवाला, कोट. खुर्ची लॅाव. ( पट्टेवाला कोट काढतो. ) चिरूट मंगाव. कोनू अदमी है तो ? पेटीवर कोण बसला आहे तो ? तो तिथें कशाकरटा बसला है.

( बापू लवत लवत पुढें येतो. )

**बापू**—खाविंद, मी एक उंबर गांवीं फडणीस असतों. माझी

परीक्षा झाली आहे. ( चाचरत व कांपत कांपत. ) हीं माझीं सरटिफिकिटें आहेत साहेब-( तीं पुढें करितो. )

**वडासाहेब**—( सरटिफिकिटें हिसकावून घेऊन ) वेल् गो, ड्याम् यूअर एक्झामिनेशन, ड्याम यूअर सरटिफिकेट्स्! (कागदांचा चोळामोळा करून फेंकून देतो. ) आमच्याकडे कांहीं एक नाहीं तुमचें काय म्हणणें असेल त्याबद्दल योग्य मार्गानें अर्ज करा. आमच्या बंगल्याला कायकू आलांत? काय म्हणून तुम्ही लोक आम्हाला वारंवार असें सतावतां ?

**बापू**—साहेब, मला प्रमोशन—

**वडासाहेब**—आमच्या हिकडून कांहीं एक मिळणार नाहीं. जा एथून. पट्टेवाला, हकाल देओ ए अदमीकू.

**बापू**—( भीतभीत मागें जातो. ) ह्या शिंच्या अप्पानें मला थापा मारून फसविलें. उद्यां अर्ज करून पहा मोठी जागा कशी पटकावितों ती. तरी मी भाऊसाहेबांना त्या वेळीं सांगितलें कीं, अप्पाच्या थापांना फसूं नका म्हणून. ( बंगल्याबाहेर जातो. )

**वडासाहेब**—पट्टेवाला, अप्पासाहेब नाहीं आला आज !

**पट्टेवाला**—ते लयी वाढूळ येऊन बसले हायती.

**वडासाहेब**—बुलॉव त्याला हिकडे. ( चिरूट ओढतो. )

( अप्पासाहेब येतो. )

**अप्पा**—मी त्या खोलींत मघांपासून वाट पहात बसलों आहें.

**वडासाहेब**—तुम्ही काल कां नाहीं आलांत ? अमाला तुमच्या जवळ फार फार जरूरीचें काम होतें. तुम्ही आमच्या बंगल्यांत फिरून पाऊल घालूं नका बस्स.

**अप्पा**—साहेब माफी करावी, चुकी झाली माझी.

**वडासाहेब**—तुमच्या चुक्या नेहमीं होतात. तो अण्णी, काका, भेटला होताका ?

**अप्पा**—होय साहेब, काल भेटले होते.

**वडासाहेब**—काय झालें आमच्या कामाचें !

**अप्पा**—राजवीज चालली आहे. –साहेब एक फडणीस फार लांबून आला आहे. त्याला अर्ज करावयाचा आहे.

**वडेसाहेब**—कोठें आहे ? बोलावा त्यांना.

**अप्पा**—पट्टेवाला ? ते बाहेर गृहस्थ बसले असतील, बोलावा पाहूं त्यांना, ते गाडींत असतील.

**पट्टेवाला**—जी बोलावतों साब.

( तो जातो व बापूसाहेबाला घेऊन येतो. )

**बापू**—(भीतभीत येतो) कशाला बोवा पुन्हां हाक मारली कोण जाणें ! उगीच मी या भानगडींत पडलों. ( जवळ येतो. )

**वडासाहेब**—ओ ! हे ते गृहस्थ ! ( हांसतो. ) या. पट्टेवाला, खुर्ची आण.

**बापू**—( उभ्यानेंच ) खाविंद, एक अर्ज करावयाचा आहे.

**वडासाहेब**—बसा त्या खुर्चीवर. तुमचें नांव काय ?

**बापू**—मला बापू म्हणतात. साहेब, आज वर्ष दोन वर्षे एकसारखी खरडेघाशी करतों आहें.

**वडासाहेब**—तुम्ही तर फडणीस आहांना ?

**बापू**—यस्, पण बारनिशीचेंच काम माझ्याकडे आहे. आमच्यासारख्या यंगमेनचा परामर्ष साहेबांनीं घेतला पाहिजे.

**वडासाहेब**—हे पहा यंगम्यान्, तुम्हाला सरव्हिसचा अनुभव आला पाहिजे. तुम्हीच पहा, नको यायला बरें ? थोडें पेशन्स धरा म्हणजे तुम्हाला ही मोठी चाकरी मिळेल. बसा, त्या खुर्चीवर बसा, उभे कां?

**अप्पा**—बापूसाहेब माझे क्लासफेलो आहेत, मोठे शार्प आहेत.

**वडासाहेब**—तर मग यांनाही तुम्हांला द्यायची आहे तशी एकदम मोठी चाकरी पाहिजे, होयना यंगम्यान् ?

**बापू**—खाविंदांनीं ही मेहेरबानी केलीच पाहिजे. मी मोठ्या मेहनतीनें इमानें इतबारें चाकरी बजावीन.

**वडासाहेब**—यस्, दॅट्स् ऑलराईट. अप्पा, तो फुन्नामारवाडी रोज खेपा घालतो त्याचे पैसे देऊन टाका म्हणून कितीदां

मराठी ग्रंथ संग्रहालय

तुम्हांला कळविलें ? कोठून तरी कर्ज काढून त्याचे पैसे देऊन टाका. हे मारवाडी आमच्या दारीं वारंवार कां येऊं देतां ?

**अप्पा**—उगीच चावट मारवाडी आहे तो. देतों त्याचे पैसे फेंकून. पुन्हां नाहीं इकडे येऊं देत त्याला.

**वडासाहेब**—त्याचे पैसे तेवढे देऊन टाका लौकर. मला आणखी दोन हजार रुपये कर्जाऊ पाहिजेत. मी बॉंड देतों लिहून. उद्यां सकाळीं पैसे आले तर बरें, नाहीं तर पुन्हां बंगल्यांत पाय घालूं देणार नाहीं.

**अप्पा**—बरें आहे, करतों तजवीज. माझ्यावर असा वारंवार राग करूं नये.

**बापू**— ( मनांत ) या अप्पाची येथें मोठी घसट आहे खरी बोवा. स्नेह संपादावा तर असा ! ( मोठ्यानें ) मला मी ज्या गांवीं हल्लीं फडणीस आहें त्या गांवची सुभेदारीची जागा पाहिजे. हल्लींचा सुभेदार त्या गांवीं आज फार वर्षे आहे, तो तालुक्याला मोठासा पाप्युलरही नाहीं.

**वडासाहेब**—बाबा, मिळेल, मिळेल, तुमची ग्रेड आली म्हणजे तुम्हाला सुभेदारी मिळेल. आम्हाला न्याय केला पाहिजे. दुसऱ्या इसमांचे हक्क पाहिले पाहिजेत.

**अप्पा**—जा आतां तुम्ही बापूसाहेब, बाहेर गाडींत बसा मी येतोंच तुमच्या मागून.

**बापू**—गुड्मार्निंग सर. मी घेतों आतां रजा.

**वडासाहेब**—व्हेरिवेल्, ( त्याशीं उभा राहून शेकह्यांड करितो. ) बरें आहे, कळेल तुम्हाला कायतें.

**बापू**—( जातां जातां ) थ्यांक यू सर. ( आपणाशींच ) कामतर बहुतेक जुळलेंसें खास वाटतें. फार मोठें आहे बोवा या अप्पाचें वजन.

( जातो. )

**वडासाहेब**—अप्पा, कसा आहे हा इसम ?

**अप्पा**—साहेब, चांगला आहे. त्याला त्या रावसाहेबाच्या

गांवचा कांहीं दिवस आक्टिंग सुभेदार नेमावा म्हणजे समजेल त्याची हुषारी.

**वडासाहेब**—बरं, करूं तसेंच. दादाची कशी आहे आतां घमंड ?

**अप्पा**—तो माझ्याविषयीं फार जेलसी करितो. आपण मजवर मेहेरबानी करितां हें त्याला अगदीं सहन होत नाहीं.

**वडासाहेब**—आय् नो दि म्यान्. आह्मी फार दिवस त्याला ओळखून आहों. आह्मीं त्याच्या विरुद्ध प्रतिनिधीसाहेबांकडे रपोट केला आहे.

**अप्पा**— गांवांत त्याच्या बद्दल फार कुरकुर आहे. आपण जेव्हांपासून त्याच्यावर सक्त नजर ठेवूं लागलांत तेव्हांपासून त्याणें गांवांत आपल्या नांवाचा फार गवगवा केला आहे. शिवाय तो पहिल्या नंबरचा तोंडपूजा आहे.

**वडासाहेब**—फुः, केअर आ टपेन्स !

**अप्पा**—त्याणें असा पुकारा केला आहे कीं, साहेबांना कर्ज फार झालें आहे. साहेबांचा खर्च अतोनात आहे. ह्या बातम्या त्याणें थेटपर्यंत पोहोंचविल्या आहेत असें ऐकतों.

**वडासाहेब**—ड्याम् हिज फेस, लेट् हिम् ड् हिज वर्स्ट ! अप्पा, मला या कर्जासंबंधीं तुह्मीं जास्त मेहनत घेऊन मदत केली पाहिजे. माझी त्या दायावरची अन् आफिसांतल्या मंडळीवरची फेथ् अगदीं उडाली आहे. तुह्मीं मला सर्व कामांत मदत केली पाहिजे आतां.

**अप्पा**—चाकरीला हजर आहे. मला ती बढतीची जागा मात्र लौकर देवविली पाहिजे.

**वडासाहेब**—त्याबद्दल तुह्मी अगदीं काळजी करूं नका. मी तुमच्याबद्दल स्ट्रांग रेकमेंडेशन् केली आहे. थोडक्या दिवसांत तुह्माला प्रत्यय येईल.

**अप्पा**—एवढी मजवर मेहेरबानी झाली तर मी आपले उपकार जन्मोजन्म बिसरणार नाहीं. मी मोठ्या कुळांतला आहें.

आजन्म आपणाशीं इमानानें वागेन. माझ्या वाडवडिलांनीं ज्यांना एकदां आपले धनी ह्मटलें त्यांच्याकरितां प्रसंगवशात् आपले प्राणही दिले आहेत. मीही वेळवखत आला तर आपल्या उपकारकर्त्याकरितां मान पुढें करण्याला कधींही भिणार नाहीं.

**वडासाहेब**—तुम्ही लोक पहिल्यानें फार गोड बोलतां, मोठ्या विश्वासाच्या गोष्टी सांगतां, पण—तें असो—अप्पा, जा तुह्मी आतां, कसेंही करून आज संध्याकाळच्या आंत मला तेवढे दोन हजार रुपये आणून द्या, मला फारफार जरूरी आहे.

**अप्पा**—मी आपला जीव गहाण ठेवीन पण आपली गरज खचीत भागवीन अशी मला उमेद आहे. घेतों तर रजा.

( जाऊं लागतो. )

**वडासाहेब**—त्या भुलीला, काकाला, माझ्याकडे धाडून द्या.

**अप्पा**—जसा हुकूम, त्यांना मुद्दाम भेटून धाडून देतों.

(जातात.)

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

स्थळ उंबरगांव,

रावसाहेब.

**रावसाहेब**— ( आपल्याशीं ) कंटाळलों बोवा या दगदगीला. अरे, आमच्या ह्या बदल्या तरी व्हावयाच्या किती वेळ, अन् किती ठिकाणीं ? अशा प्रकारची ही चाकरी करण्यापेक्षां पोटांत कांटे भरावे हें बरें. कशाला मीं ही आजवर दगदग केली ? अहो, त्या पुण्यांत पहिल्यानें माधुकरी तर मागितली, वारांनीं तर जेवलों, शाळेंतल्या फी करितां अन् बुकांकरितां कितीकांच्या पुढें तोंडें तर वेंगाडलीं, रात्र नाहीं दिवस नाहीं, घर नाहीं दार नाहीं, या डरावर बुकें घेऊन घोख्याशीं गांठ! त्या शाळेमध्यें रात्रीच्या रात्रीं बांकावर पडून सोळसोळा सत्रासत्रा तास अभ्यास केला. आईबापांनीं लहानपणींच सोडलें, काय त्या वडील भावानें दहा रुपयांच्या चाकरीवर करावयाचें होतें ? त्यांनीं आपला संसार चालवावयाचा का आमचे अभ्यास चालवावयाचे? तरी बिचाऱ्यानें तितक्याच्या तितक्यांत मला रुपया दोन रुपये महिना दोन महिन्यांनीं पाठवावेच. असे हे मोठे अडचणींत दिवस काढून मी बी. एच्या परीक्षेपर्यंत आलों, परीक्षा उतरली, पण पुढें काय ? विचारतो कोण आम्हाला ? धरली या खात्यांत पुढच्या आशेवर बारनिशी खरडावयाची चाकरी. विचार केला कीं, हा जन्मभर अभ्यास करून मग सुख तरी केव्हां भोगावें ? तेव्हां नाहीं पडलों त्या पुढल्या परीक्षांच्या भानगडींत. दुःखांत सुख इतकेंच कीं, माझ्या हुषारीकडेच फक्त पाहून त्या बाबासाहेबांसारख्या श्रीमंतांनीं आपली मुलगी मला दिली. या इच्यापासून मला बरेंच सुख झालें; पण माझ्या साडेसातीचा फेरा मला कसचा सोडणार ? मी आज पांचचार वर्षपर्यंत हमालासारखी सुभेदारीची चाकरी केली, पांच दहा ठिकाणीं माझ्या आजवर

बदल्या झाल्या, पण पुन्हां माझ्यापुढें त्या घाणेरड्या जांभुळगांवीं जाण्याचा हुकूम तयार ! छे ! पुरे, पुरे झाली ही चाकरी अन् ही दगदग. आपण पाठविणार उद्यां राजीनामा! ( ईझीचेयरवर विचार करीत पडतो. )

( यमुनाबाई हातांत मोहनभोगाची वाटी घेऊन येते. )

**यमुना**—आज कचेरींतून आल्याबरोबर असं उदास तें कां बसायचं? मीं हा थोडा मोहनभोग आवडतो म्हणून आणला आहे.

**रावसाहेब**— नको बोवा मला त्रास देऊं ! तो मोहन-भोग नको अन् कांहींएक नको आम्हाला !

**यमुना**—असं काय पण अगदीं तें, असं संतापायचं काय म्हणून? आलीकडे पाहतें तो आपला प्रत्येक गोष्टींत त्रास करायचा.

**रावसाहेब**— तूं आतां एथून घटकाभर जातेस कीं नाहीं ?

**यमुना**— मी नाहीं इथून हलायची. मला कायतें कारण सांगितलं पाहिजे.

**रावसाहेब**— आम्हाला सांगायचें नसलें तर ? हा बोवा मोठा आम्हावर जुलूमच आहे !

**यमुना**—जुलूम ह्मणावा कांहींही ह्मणावं; पण मी आज ह्या उदासीनतेचं कारण ऐकल्याखेरीज इथून जायची नाहीं. हें पहा, ( जवळ येऊन ) पहावा तर खरा हा मोहनभोग कसा झाला आहे तो. असं काय बरं करावं?

**रावसाहेब**—गडे, तूं किनयी बोवा फार त्रास देतेस. ( तिच्या हातांतली वाटी घेऊन त्यांतला मोहनभोग खातो.) झालें आतां तुझ्या मनाजोगतें ?

**यमुना**—हो, माझंच अगदीं पोट भरलं असेल ! ( हंसते ) आतां हें थोडसं पाणी प्यावं ह्मणजे हें डोकं अगदीं दगदगीनं भ-णभणून गेलं असेल तें अम्मळ शांत होईल. काय मेलं तें काम थोडकं का असतं? तशांत या गांवची ही हवा. पण मला सांगायचं होतं, आज इतकं अगदीं त्रासायला काय झालं आहे तें ?

( मार्तंडराव दीडमिशे दारांतून डोकावतो. )

**रावसाहेब**—कोण आहे तें दाराशीं ?

**मार्तंडराव**—साहेब मी आहें तो मार्तंड. उगीच आलों होतों.

**यमुना**—मार्तंडराव या किहो आंत.

**रावसाहेब**—मार्तंडराव उभे कां ? बसा.

**मार्तंडराव**—जी, बसतों. ( तो जाजमाच्या एका टोंकावर बसतो. ) हीं पांचचार प्रकरणें आणलीं होतीं सुनावणीला.

**यमुना**—मार्तंडराव, अहो घरीं तरी घटकाभर मिळूं द्या विसावा. तुमचीं तीं प्रकर्णं आणखी सुनावण्या घरीं तरी नकोत !

**मार्तंड**—जी, जसा हुकूम. यांची कांहीं मोठीशी गर्दी नाहीं आहे. माझा कांहीं आग्रह नाहीं. उद्यां काढतां येतील हीं कामें कचेरींत. मीं ह्मटलें होतें कीं, लवकर आटपेल ही सुनावणी, कीं आपला सह्या करून मोकळा होईन. पण मग जशी आज्ञा.

**यमुना**—पण आतां याच पायीं कचेरींतून येणं झालं आहेना? पडूं द्या घटकाभर स्वस्थ या खुर्चीवर.

**मार्तंड**—फार उत्तम. उद्यां हीं कामें उरकतील. मी घेतों तर आतां रजा.

**रावसाहेब**—तुह्मी नकाहो तिचें ऐकूं मार्तंडराव. तिला काय होतें ? एकेक काम उरकलेलें बरें. आजचें काम उद्यांवर टाकणें चांगलें नाहीं. वाचा तीं प्रकरणें.

( माजघरांतून गोप्या हाका मारतो. )

**गोप्या**—आई, आईग, माझ्या दशमीवर दूध.

**यमुना**—खरं गडे, विसरलेंच त्याच्या दशमीजवळ दुधाची वाटी ठेवायला. गोप्या, बाळा आलें हो आलें.

( ती आंत जाते. )

**मार्तंड**—( कागद काढतो ) हा एक तो अर्ज आला आहे. यांत वादीचें म्हणणें आहे कीं, कोंडनाक् महारानें माझ्या वहिवाटीच्या शेतांत जबरीनें आपला नांगर घातला, अशी अन्यायाची

आगळीक केली आहे, तेव्हां मला खाविंदांकडून दाद मिळावी. हा दुसरा अर्ज—

**रावसाहेब**— या पहिल्या अर्जावर शेरा लिहून वहिवाटीच्या फिर्यादीच्या प्रकरणांत तो ठेवा. उद्यां वादीची प्रतिज्ञा घेऊन प्रतिवादीवर समानें काढा.

**मार्तंड**—या दुसऱ्या अर्जदाराचें म्हणणें आहे कीं, मला वसुलाला मदत मिळावी. हा अर्ज सखूजी बिन धोंडजीचा मारामारीचा, हा शिवीगाळीचा, हा दुसरा एक धमकीचा.

**रावसाहेब**—दप्तरीं दाखल, असे तूर्त या सगळ्या अर्जांवर शेरे लिहा.

**मार्तंड**—हा एक रपोट टोळधाडीचा, हें एक पत्र बडेसाहेबांकडचें, स्वारी आठ दिवसांनीं तालुक्यांत फिरायला येणार आहे तेव्हां योग्य तजवीज झाली पाहिजे अशा अर्थाचें.

**रावसाहेब**— बरें आहे, करा दप्तरीं दाखल. होईल तजवीज फडणिसांकडून.

**मार्तंड**—( रावसाहेबांकडे साशंक मुद्रेनें पाहतो. ) हें एक पत्र अकौंटंट जनरलाकडचें. पात्र आणा एक पैचे घोरू सादीलवारींत जास्त लागले त्यांबद्दल सांग्शन आल्याखेरीज बिल पास करितां येत नाहीं.

**रावसाहेब**—हं: ! पाठवा शेरा लिहून तें पत्र हुजुरास. नाहीं तर ह्मणावें घाला आमच्या पगारावर धाड !

( यमुना येते. )

**यमुना**—मार्तंडराव, नाहीं कां आटपत अजून तुमचं ? पुरे, पुरे करा आतां.

**मार्तंड**—जी, झालेंच. येवढे दोन रपोट झाले कीं आटपलें. हा साहेब फारेष्टाकडचा रपोट, त्या भगांवच्या तीन कुणब्यांनीं सरकारी जंगलांतून झाडांच्या डहाळ्या व पानें तोडलीं तीं विगरपरवान्यानें तोडून नेलीं, त्यांच्यावर चोरीचे खटले होऊन त्यांना शिक्षा होण्याचा—

**रावसाहेब**—या फारेष्टानें तर त्रास दिला! त्या गरीबगुरी-बांना शिक्षा ठोकायच्या या क्षुल्लक बाबतींत! पण काय करावें. बरें आहे, लिहा त्या हद्दीच्या रेंजरला पुरावा घेऊन हजर रहाण्याला.

**मार्तंड**—हा खजिन्याकडचा ताळेबंद, हा नमुना नंबर पंचवीस. हें शेतवार पत्रक. या कागदांवर सह्या व्हावयाच्या आहेत.

**रावसाहेब**—ठेवा सगळे कागद त्या टेबलावर. ते तपासतों आज रात्रीं व करतों सह्या त्यांच्यावर.

**मार्तंड**—त्या दोन चालू वहिवाटीच्या खटल्यांत ठराव लिहावयाचे राहिले आहेत. तो एक खटला कमीट केला त्याचें फाइंडिंग लिहावयाचें आहे. उगीच हीं आपलीं कामें सुचविलीं, मग फुरसती अंतीं—

**रावसाहेब**—करतों बोवा हीं कामें आज रात्रीं तयार!

( पोलीस हवलदार येतो. )

**पोलीस**—मोहर, टाळें, दोन कैदी आलबेल साहेब. ( सलाम करतो. )

**रावसाहेब**—बरें आहे. जा तुम्ही, रामराम.

( गण्या महार येतो. )

**गण्या**—जोहार येतुया साब. त्या भगावच्या इहिरीमंदी योक मुडदा सापडलाया. त्या अवाला इहिरीमंदी ढकललिया त्या गेन्या रामुशान.

**रावसाहेब**—मार्तंडराव, हें एक नवें लचांड आलें बोवा! तो गांव तरी येथून कितीसा लांब आहे? आतांच्या आतां इन्केस्टाला गेलें पाहिजे तेथें.

**मार्तंड**—साहेब, पांच कोस लांब आहे. गेलें पाहिजे खरेंच. गण्या, जा तूं; पोहोंचली वर्दी.

( गण्या जोहार करून जातो. )

**यमुना**—हो, गेलंच पाहिजे. तुह्माला काय होतं?

( गोप्या धांवत येतो )

**गोप्या**—रावसाहेब, मी येतो बरोबर गाडींत बसून त्या गांवाला.

**रावसाहेब**—गाडींत बसून. यायला तयार. तो लंगोटीचा शेपटा खो नीट. हें बघ गोप्या, रात्रीचें लहान मुलांनीं बाहेर जाऊं नये, समजलास.

**यमुना**—इकडूनही आतां रात्रीचं बाहेर जाणं होऊं नये. ही प्रकृति अशी अशक्त झाली आहे, तशांत बारीक ताप येतो. मी नाहीं आज इथून हलूं द्यायची, साफ सांगतें आहें.

**मार्तंड**—सरकारी कामें वेळच्या वेळीं झालींच पाहिजेत.

**गोप्या**—मी मोठा झालों म्हणजे सगळीं कामें अशींच वेळच्या वेळीं करीन.

**यमुना**—पुरें तुझं, नको मेली ती तुला असली उरस्फोडीची चाकरी. जळलं मेलं हें असलं काम, आग का लागेना त्या कामाला! रात्रीची दिखील घटकाभर कशी ती विश्रांति नाहीं.

**रावसाहेब**—अग, असें रागावून संतापून काय होतें! "आलिया भोगासी असावें सादर". जें आहे तें बरेंच आहे! गोप्या, तुला त्या दाजीसाहेबांसारखा मुनसफ करूं अं. म्हणजे आपली बैठी चाकरी.

**गोप्या**—मग काय, तो काळा कोट अंगांत घालायचा, चष्मा लावायचा, अन् झपाझप न्याय करायचे, होयना हो रावसाहेब? पण त्या मुनसफाच्या गळ्यांत पांढरे पट्टे असून काळ्या कोटावर सोडतात तें काय असतं हो?

**रावसाहेब**—काय ह्या पोराला सांगावें आतां, गोप्या ती मुनसफीची एक खूण असते. जा आतां, बूक घेऊन उद्यांचीं लेसनें कर जा. पुष्कळ मेहनत करून अभ्यास करशील तर लौकर होशील मुनसफ.

(गोप्या हातांत बूक घेऊन एका कोपऱ्यांत बसतो व पाठ करतो.)

**गोप्या**—(मोठ्यानें वाचतो) "नाना म्हणून एक मुलगा होता, मनी त्याची बहीण होती. मनी त्याची बहीण बहीण बहीण."

**यमुना**—अहाहा, काय चालले आहेत अभ्यास. "नाना मुलगा होता अन् मनी त्याची बहीण होती."

**रावसाहेब**—अग, असें वाचतां वाचतांच पुढें मिल्ल, स्पेन्सर वाचूं लागतील हीं मुलें. बरें, पुष्कळ झाला आतां हा विनोद. मार्तंडराव, उद्यां सकाळीं हपिसांत आल्यावर सगळी मोजदाद करा, अन् एक चार्जाचा कागद तयार करा. उद्यां चार्ज फडणिसांना द्यावयाचा आहे.

**मार्तंड**—म्हणजे, हें काय? हें नवेंच संकट. तरी मला मघां-पासून रोंख कांहीं निराळाच दिसत होता. रावसाहेब, आमच्या-सारख्या गरीबांचा मग तरणोपाय नाहीं.

**रावसाहेब**—अहो तुम्हाला काय, आम्ही नाहीं दुसरे.

**यमुना**— तरीच आज उदास असायचं वरंका. आपणाला मग जायचं कुठें?

**मार्तंड**— कुठें बदली झाली कीं काय? या बदल्यांनीं तर बोवा त्रास आणला! आतांशीं असें चाललें आहे कीं, याची बदली कर, त्याची ग्रेड कमी कर, याला एकदम चढीव सगळ्यां-च्या डोक्यावर, त्याला पाठीव एकदम शेंदोनशें कोस लांब का-ळ्या पाण्याच्या गांवीं!

**रावसाहेब**—असेंच आहे हें हल्लींचें मन्वंतर. हें का नेहमीं राहणार आहे? आज नाहीं उद्यां, दोन वर्षांनें, चार वर्षांनें, कधीं तरी दाद लागणारच.

(एक शिपाई येतो.)

**शिपाई**—साब, एक टोपीवाला त्या वेशीच्या बाहेरच्या बंगल्यांत येऊन उतरला आहे, त्यानं रामोशाला पांचचार चाबूक ओढले. तो इंग्रजी बोले तें रामोशाला कांहीं समजेना. रामोशी बोले मराठी तें त्या टोपीवाल्याला समजेना, तेव्हां एकच गोंधळ उडून गेला साब.

**रावसाहेब**— कुठला आहे तो, मार्तंडराव, पहा बरं. नाईक, त्या पाटलाला द्या पाठवून त्याच्याकडे.

**शिपाई**— तो म्हणे मुभेदारकू बुलॉव्, किदर है. कोठला आहे तो समजत नाहीं साब.

**रावसाहेब**— बरें आहे. त्या पाटलाला घेऊन जाऊन त्याची कोंबड्याविकऱ्याची सर्व तरतूद लावून द्या. आम्ही मागून आलोंच. या आम्हीं मर्ज्या प्रत्येकाच्या संभाळावयाच्या. जो येतो त्याचा हुकूम आम्हावर !

**यमुना**—ही आतां बदली तरी कुठें झाली आहे ?

**रावसाहेब**—त्या डोंगराच्या पायथ्याशीं जांभूळगांव आहे त्या गांवीं. या एयर्ला तरी हवा बरी होती. तिथली अगदीं खराब. हवा खराब, पाणी खराब.

**मार्तंड**—रावसाहेब, असा हा आपणाला त्रास होतो ह्याला कांहीं उपाय तरी करावा.

**रावसाहेब**—याला काय उपाय करावयाचा ? अधिकाऱ्यांच्या हुकमापुढें कोणाचें काय चालणार आहे ?

**मार्तंड**—मर्जी असल्यास मीं सुचविला असता एक उपाय. त्या तिथल्या किल्लीनें हें कुलूप उघडलें असतां सर्व बेत यथास्थित जुळणार आहे.

**रावसाहेब**—तुम्ही काय ह्मणतां तें मला कांहींच कळत नाहीं.

**मार्तंड**—मी अशी गुणगुण ऐकतों कीं, एक अप्पासाहेब कमाविसदार ह्मणून कोणी आहे, त्याच्या हातांत सगळ्या गोष्टी आहेत. बडेसाहेबांचा अन् त्याचा फार घरोबा आहे. कर्तुं अकर्तुं सगळें त्याच्या हातांत आहे. त्याची भेट घेतली कीं हां हां ह्मणतां काम होतें !

**रावसाहेब**—अं: ! त्या सगळ्या गटारयन्त्रांतल्या गप्पा आहेत. प्राण गेला तरी आह्मी असल्या खटपटी करणार नाहीं.

**यमुना**—नकोग बाई तसला विचार कधींही मनांत. देवा, नको आह्मांला तसली बुद्धि देऊं.

**मार्तंड**—मीं जी गोष्ट खात्रीलायक ऐकली ती कळविली. माझा कांहीं कोणत्या गोष्टींत आग्रह नाहीं आहे. पण ही सर्व दगदग मग चुकली असती. त्यांत कांहीं मोठेंसें पातक—

**रावसाहेब**—खबरदार पुन्हां असली गोष्ट माझ्या समोर काढाल तर ! त्यांणीं माझ्या आणखी पंचवीस ठिकाणीं बदल्या केल्या, कमी पगारावर घातलें, फार तर काय ? पण चाकरीवरून बडतर्फ केलें तरी बेहेत्तर आहे, पण मी ह्या असल्या अनीतीच्या मार्गाला कधींही प्रवृत्त होणार नाहीं. आह्मी इतकी ही विद्या शिकलों, मोठमोठे किताब मिळविले, त्या विद्येला, त्या किताबांनां लांच्छन आणणारी गोष्ट कधींही करणार नाहीं हें खूप समजून ठेवा. ह्या अडचणी, हें छळ, हीं संकटें कालेंकरून नाहींशीं होतील; पण आमच्या नांवालौकिकाला, गृहस्थीला, विद्येला, कुळाला एकदां कां अनीतीचा व पापकर्माचा काळा कुळकुळीत डाग लागला ह्मणजे तो वज्रलेप होणार. जा तुह्मी आतां. माझ्याजवळ आज ही गोष्ट काढलीत ती काढलीत पण पुन्हां याजबद्दल तुह्मी इतर कोणाजवळ गोष्ट काढाल तर तुमचें कधींही बरें होणार नाहीं. देव करो अन् तुमच्या मनांत असली ही विपरीत बुद्धि कधींही न येवो. माणसावर डोंगर जरी कोसळले तरी त्यानें आपलें इमानाचें ब्रीद कधींही सोडूं नये. या जगांत प्रत्येकावर असें कसाला लावून पाहण्याचे प्रसंग वारंवार येतात, त्यांमधून धैर्य धरून तो एकदां पार पडला ह्मणजे त्याचे दिवस परिणामीं मोठे सुखाचे जातात. —कोण आहेरे, गेन्या, तो टांगा जोड. —मार्तंडराव, सांगितल्याप्रमाणें उद्यां कचेरींत व्यवस्था ठेवा. उद्यांचे उद्यां चार्ज देऊन आम्ही आपल्या बदलीच्या गांवीं जाण्याला निघणार.

**यमुना**—मग आतां आज रात्रीं त्या गांवाकडे गेलं पाहिजे ? उद्यां सकाळीं गेलं तर नाहीं कां चालायचं ? आज गडे ही थंडी फार पडली आहे !

**रावसाहेब**—गेल्याखेरीज दुसरा इलाज नाहीं. पहिल्यानें ते कोण वाटसरूच्या बंगल्यांत येऊन उतरले आहेत त्यांची सर्व तरतूद लावून पुढें तसाच त्या गांवीं जाऊन येतों. उद्यांची निघण्याची सर्व तयारी करा. हे आम्ही आतां निघालोंच.

**यमुना**—बरं आहे. ही शालजोडी आन् गेटम न्यायचं होतं

बरोबर उपरण्यानं नीट कार्नुशिलं झाकून घ्यायचीं होतीं. लौकर लौकर परत फिरवयाचं. गेन्या, ते घोडे मस्त आहेत. तांगा नीट रात्रीचा संभाळून ने. ते तांग्याचे कंदील लाव. वत्या आहेत कीं नाहींत? रामजी हवालदाराला न्यायचा बरोबर. (गेन्या तांग्याच्या गाद्या न्यायला येतो ).

**गेन्या**—जी हायती बाईसाब, तांग्याच्या गाद्या फाटल्या हायती नीट केल्या पाहिजेत साब.

**रावसाहेब**—बरें आहे जा तुम्ही आतां आंत. आह्मांला कोठें शेंदोनशें कोसांच्या प्रवासाला जावयाचें नाहीं कांहीं.

**यमुना**—संभाळून जायचं. तांग्याच्या पेटींत फराळाचा डबा घातला आहे. ओढ्यावर उतरून फराळ करायचा. आज रात्रीं साडेआठ वाजतां चंद्रोदय आहेच. फराळाच्या वेळेपर्यंत पडेल चांदणं.

(जातात.)

---

## अंक २ रा.

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—उंबरगांव, बापूसाहेबांचा वाडा.

### महादेवभट.

**महादेवभट**—( मोठ्या सकाळीं बुधवारी पंचा नेसून अंगांत बाराबंदी घालून ओसरीवर येऊन बसतो. ) कोण आहेग घरांत ? ती काल त्या पाटलानें पळसाची पानें आणलीं आहेत तीं परतीं घेऊन ये पाहूं हलक्या हतानें ? आजच्या पुरत्या जेवाय पत्रावळी तरी लावतों. त्या मागल्या ओसरीच्या वळचणीवर चुलाण्याजवळ चोया खोंचून ठेवल्या आहेत त्या चोयाही परत्या आण पाहूं ?

( महादेवभटजींची बायको वाराणशी घरांतून येते. )

**वाराणशी**—आहो, दोन दिवस मुलाच्या चाकरीच्या

गांवीं आलां अहांत तेव्हां तरी हीं कामां नकोत. स्वस्थ हरि हरि ह्मणत बसानां परते ?

**महादेवभट**—अगो, आपणांस पडली कामांची संवय, तेव्हां उगाच कसें बसवणार ? आपल्यास त्या कोंकणांत उगां बसवेल ? आण, आण नीं पानां. चिरंजीव नी सुनबाई सकाळचीं फिराय गेलीं आहेत तोंवर तर लावृं खऱ्या दोन पत्रावळी. एक तुला नी एक आपली मला जेवाय !

**वाराणशी**—बरें, माझें काय जातें बापडें ( पानें व चोया घेऊन येते ) पण कायहो हें सकाळचें फिराय जायचें हें काय ? मूल आपला पहातें तों चोळणा पायापावेतों घालतो. केवढालेग बाई ते काळे कुट्ट आंगरखे ! पोतींच आपलीं घालायचीं अंगांत ! पहातें तो आपला चष्मे लावतो ! इतक्यांतगो बाई कशास लागतात ते चष्मे ? तुमचें इतकें ह्मातारपण झालें तरी तुह्मां देखील नाहीं लागत अजून त्या आरशा ! अन् ती सुनबाई आंगांत बुतावाच्या बंड्या घालते, पायांत पांढऱ्या पिशव्या चढवते, नी काळे काळे जोडे घालते बघितली तीं ! ती अंगावर जरीकाठी शालजोडी रोजरोज परती कशास घेते हो ? रस्त्याची धूळ लागून एकदां मळली ह्मणजे झालें !

**महादेवभट**—आपणांस काय त्याचें ? ह्या नव्या मंडळीचे ते घेरे नी त्या आरशा नी पोषाख नी थाटमाट सगळें कांहीं बेटें आपलें चमत्कारीकच ! ते आपले पैसे कमावतात नी हवेतसे उधळतात. ( पत्रावळी टांचतो. ) कळलें कां, ती माझ्या पिशवींतली तंबाकू घे पाहूं? सकाळची तल्लफ आली आहे. ह्या आतां एकीकडे पत्रावळी टांचतो नी तोंडानू गीतेचा पाठ ह्मणतों ह्मणजे आपला स्वार्थचा स्वार्थ नी परमार्थचा परमार्थ !

**वाराणशी**—( पिशवी आणून देते व महादेवभट तंबाकूची चिमूट तोंडांत टाकतो. ) कायहो, या यांच्या माडीवर इतक्या बाटल्या कसच्या पडल्या आहेत हो? खोबरेल तेलाच्या कीं काय? हीं रांड्ची कपाटं भरून बुकां काय नी काय काय ! हीं मुलान्

सगळीं वाचलीं असतील काहों? कशाला खरेदी केलीं आहेत परतीं इतकीं बुकां! उगाच पैसा मात्र खराब केलान्. दुसरें कांहीं एक नाहीं या इतक्या पैशाचें कोंकणांत एखादें चखोटसें ठिकाण नसतें काहों मिळालें?

**महादेवभट**—कशास् बुकें घेतलीन् नी काय घेतलीन् बोलावें कोणी?—आपणास काय त्याचें—पण ह्या चोया संपल्या ह्या. मला थोड्याशा त्या विळीवर नवीन चोया करून दे पाहूं?

**वाराणशी**—( विळी घेऊन येते, व तिच्यावर चोया करिते ) पाठना व्हायाचा आहे गीतेचा?

**महादेवभट**—होय. आज चौदावा अध्याय ह्मणावयाचा आहे. ( तोंडानें म्हणतो )

लोभप्रवृत्तिरारंभः कर्मणामशमः स्पृहाः ।
रजस्येतानि जायंते विवृद्धे भरतर्षभ ॥ १ ॥

( बापूसाहेब व ठकू बाहेरून येतात, पुढें पट्टेवाला येतो, बापूच्या मागून डाक्टर, शाळामास्तर, फारेष्टर व मार्तंडराव दीडमिशे येतात. )

**बापू**—( दाराशीं आल्याबरोबर ) कायहो बाबा? तुह्मी कशाला हे कारभार करितां आहां? आमच्या वाड्याची ओसरी म्हणजे पत्रावळीविक्याचें दुकान आहे कीं काय? उचला उचला हा पसारा येथून. तुह्मांला कोणी सांगितले होते हे उद्योग? ओल्डफूल! ( पत्रावळी व पानें बुटाच्या लाथेनें उडवितो. )

**महादेवभट**—अरे पण हो. माझा एवढा पाठ तरी होऊं दे. असा मजवर परता रागावतेस तो कशासाठीं? (तोंडानें पाठ ह्मणतो.)

मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः ॥
सर्वारंभपरित्यागी गुणातीतः स उच्यते ॥ १ ॥

**बापू**—कसला घेऊन बसला आहांत पाठ! उचला उचला सर्व हें दुकान, दुसरी गोष्ट नाहीं. उठतां कीं नाहीं का उठवूं हात धरून? कोण बोवा त्रास आहेहा! ( त्याचा हात धरून उठवितो. ) चला त्या मागल्यादारीं जाऊन बसा अन् करा हवीतितकी बडबड.

**महादेवभट**—उठलों बोवा ! सांगशील तें ऐकलें पाहिजे, कोणचा श्लोक तो, विसरलों इतक्यांत. होय. हा ऐकलास का—

मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः ।

नको मास धराय, मी जातों बोवा आपल्या पायानें. ( तो मागील दारीं जातो. )

**ठकू**— ( वाराणशीला ) कशाला इथें फतकल घालून बसलां अहांत हो ! अम्हाला नकोत त्या तुमच्या चोया. कायबाई या कोंकणच्या माणसांचा रानटीपणा तरी ? किती या ओसरीवर केर केलात ! दोन दिवस पाव्हण्यासारखं आलं तर किती मेला माणसाला त्रास द्यावा तो ? उठा म्हणून सांगतेना तुम्हाला ? पुरे झाल्या त्या मेल्या चोया.

**वाराणशी**—हं हं! अगो मला शिऊं नकोस, मीं अंग धुतलें आह, सोंवळी आहे. हें गो काय ? त्या पायांत तें चढाऊ जोडे घालून मला शिवतेस ? उठलें हो मी. ( चोया गोळा करिते. )

**ठकू**—पडूं द्या त्या चोया तिथेंच, तो शिपायी ठेवील उचलून. मोठं मेलं तें कोंकणच सोंवळ ठाऊक आहे. कोण आहेरे ? रामजी, या चोया उचलून ठेव अन् या इथला चांगला केर काढ. जसा उकिरडा पसरला आहे या ओटावर. सगळी ही ओटी झाडून साफ कर.

( वाराणशी शेंबूड शिंकरून घरांत जाते. )

**ठकू**— ( खुर्चीवर बसतें ) पहा त्या कोठें शेंबूड शिकरल्या ! बाई या कोंकणच्या माणसांना स्वच्छपणा कसा तो ठाऊकच नाहीं. रामजी, या माझ्या पायांतले येवढे बूट अन् स्टाकिंग काढ पाहूं. माझी तेवढी शालजोडी दिवाणखान्यांत ठेव.

**रामजी**—जी साब. (ठकूच्या पायांतले बूट स्टाकिंग काढतो) पण बाईसाब या पत्रावळींवांचून आज सकाळींच काय अडलें होतें ?

**ठकू**—उगीच मेलीं रानटी माणसं ! अजागळ कुठली ! आलीं आहेत येथें आमचा आब घ्यायला !

(माडीवर दिवाणखान्यांत बापूसाहेब, शाळामास्तर, डाक्तर, फारेष्टर खुर्च्यांवरून बसतात, व मार्तंडराव एकीकडे उभा राहतो. )

**बापूसाहेब**—( पागोटें व कोट काढतो व पाटलुनाच्या खिष्यांत हात घालून डाक्टरासमोर उभा रहातो. ) वेल्, आजचा मार्निंग वाक् चांगला झाला. पर्स्पिरेशन् खूप निघालें. वेल् डाक्टर आमची नाडी पहा पाहूं ?

**डाक्टर**—( नाडी पहातो ) तुमची हेल्थ अगदीं आलराईट आहे बोवा बापूसाव.

**बापू**—हा मार्निंग वाक् मोठा हेल्दी असतो नाहींहो मास्तर?

**मास्तर**—वा: यांत काय संशय ?

**फारेष्टर**—कां मार्तंडराव, सुभेदार साहेबांची झालीना एथून उचलबांगडी ?

**डाक्टर**—बरें झालें, एकलकोंडा कोठला !

**फारेष्टर**—मोठे मारलिष्ट ह्मणवितात ना पण !

**मार्तंड**—आज फडणिसांना चार्ज द्यायचा आहे.

**बापू**—रामजी, रामजी पट्टेवाला ?

**ठकू**—( पहिल्या मजल्यावरूनच. ) अरे रामजी, वर हाका मारायचंना ? ऐकूं नाहीं कां येत ?

**रामजी**—जी, साब ?

**बापू**—आजचें पोष्ट आलें कीं नाहीं ?

**रामजी**—जी साब, आलें आहे. (पोष्टाचे कागद वर आणून देतो. )

**बापू**—( लाखोटे फोडतो व कागद मार्तंडाच्या अंगावर फेंकतो व एक कागद हातांत घेऊन ) ओ ! जॉलि, जॉलि! मास्तर, डाक्टर तुह्माला एक ग्ल्याड न्यूज सांगावयाची आहे. मला या गांवची आक्टिंग सुभेदारी मिळाली. ही आर्डर आली पहा. रावसाहेबांची बदली जांभूळगांवीं झाली आहे.

**डाक्टर**—ओ, थ्यांकयू! आह्मी तुह्माला कन्ग्राच्युलेट करतों.

**फारेष्टर**—आह्मावर सुभेदार साहेब मेहेरबानी असावी.

**महादेवभट**—उठलों बोवा ! सांगशील तें ऐकलें पाहिजे, कोणचा श्लोक तो, विसरलों इतक्यांत. होय. हा ऐकलास का—

मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः ।

नको मास धराय, मी जातों बोवा आपल्या पायानें. ( तो मागील दारीं जातो. )

**ठकू**— ( वाराणशीला ) कशाला इथें फतकल घालून बसलां अहांत हो ! अम्हाला नकोत त्या तुमच्या चोया. कायबाई या कोंकणच्या माणसांचा रानटीपणा तरी ? किती या ओसरीवर केर केलात ! दोन दिवस पाव्हण्यासारखं आलं तर किती मेला माणसाला त्रास द्यावा तो ? उठा म्हणून सांगतेना तुम्हाला ? पुरे झाल्या त्या मेल्या चोया.

**वाराणशी**—हं हं! अगो मला शिऊं नकोस, मीं अंग धुतलें आह, सोंवळी आहे. हें गो काय ? त्या पायांत तें चढाऊ जोडे घालून मला शिवतेस ? उठलें हो मी. ( चोया गोळा करिते. )

**ठकू**—पडूं द्या त्या चोया तिथेंच, तो शिपायी ठेवील उचलून. मोठं मेलं तें कोंकणच सोंवळ ठाऊक आहे. कोण आहेरे ? रामजी, या चोया उचलून ठेव अन् या इथला चांगला केर काढ. जसा उकिरडा पसरला आहे या ओटावर. सगळी ही ओटी झाडून साफ कर.

( वाराणशी शेंबूड शिंकरून घरांत जाते. )

**ठकू**— ( खुर्चीवर बसतें ) पहा त्या कोठें शेंबूड शिकरल्या ! बाई या कोंकणच्या माणसांना स्वच्छपणा कसा तो ठाऊकच नाहीं. रामजी, या माझ्या पायांतले येवढे बूट अन् स्टाकिंग काढ पाहूं. माझी तेवढी शालजोडी दिवाणखान्यांत ठेव.

**रामजी**—जी साब. (ठकूच्या पायांतले बूट स्टाकिंग काढतो) पण बाईसाब या पत्रावळींवांचून आज सकाळींच काय अडलें होतें ?

**ठकू**—उगीच मेलीं रानटी माणसं ! अजागळ कुठलीं ! आलीं आहेत येथें आमचा आब घ्यायला !

(माडीवर दिवाणखान्यांत बापूसाहेब, शाळामास्तर, डाक्तर, फारेष्टर खुर्च्यांवरून बसतात, व मार्तंडराव एकीकडे उभा राहतो. )

**बापूसाहेब**—( पागोटें व कोट काढतो व पाटलुनाच्या कप्यांत हात घालून डाक्टरासमोर उभा रहातो. ) वेल्, आजचा मार्निंग वाक् चांगला झाला. पर्स्पिरेशन् खूप निघालें. वेल् डाक्टर आमची नाडी पहा पाहूं ?

**डाक्टर**—( नाडी पहातो ) तुमची हेल्थ अगदीं आलराईट आहे बोवा बापूसाब.

**बापू**—हा मार्निंग वाक् मोठा हेल्दी असतो नाहींहो मास्तर?

**मास्तर**—वा: यांत काय संशय ?

**फारेष्टर**—कां मार्तंडराव, सुभेदार साहेबांची झालीना एथून उचलबांगडी ?

**डाक्टर**—बरें झालें, एकलकोंडा कोठला !

**फारेष्टर**—मोठे मारलिष्ट ह्मणवितात ना पण !

**मार्तंड**—आज फडणिसांना चार्ज द्यायचा आहे.

**बापू**—रामजी, रामजी पट्टेवाला ?

**ठकू**—( पहिल्या मजल्यावरूनच. ) अरे रामजी, वर हाका मारायचंना ? ऐकूं नाहीं कां येत ?

**रामजी**—जी, साब ?

**बापू**—आजचें पोष्ट आलें कीं नाहीं ?

**रामजी**—जी साब, आलें आहे. ( पोष्टाचे कागद वर आणून देतो. )

**बापू**—( लाखोटे फोडतो व कागद मार्तंडाच्या अंगावर फेंकतो व एक कागद हातांत घेऊन ) ओ ! जॉलि, जॉलि! मास्तर, डाक्टर तुह्मांला एक ग्ल्याड न्यूज सांगावयाची आहे. मला या गांवची आक्टिंग सुभेदारी मिळाली. ही आर्डर आली पहा. रावसाहेबांची बदली जांभूळगांवीं झाली आहे.

**डाक्टर**—ओ, थ्यांक्यू! आह्मी तुह्मांला कन्ग्राच्युलेट करतों.

**फारेष्टर**—आह्मावर सुभेदार साहेब मेहेरबानी असावी.

बापू—ठकू, ठकू, टी ल्याव. ठकू ?

मार्तंड—मी सांगतों साहेब निरोप. ( जातो )

बापू—आय् मस्ट गेट कायमची सुभेदारी डियर.

मास्तर—मिळेल, तीही मिळेल.

( ठकू व मार्तंडराव चहाच्या बशा व पेले घेऊन येतात. )

ठकू—मला आर्डर पहावयाची आहे माय डियर.

बापू—इतक्यांत पोहोंचली का तार ?

( आर्डर तिच्या जवळ देतो. )

मार्तंडराव—ही आनंदाची बातमी मीं कळविली साहेब.

ठकू—फार चागलं झालं हो. मला मोठी काळजी होती ती एकदांची निवारण झाली. चहा घ्यायचा, तो निवतो आहे.

फारेष्टर— सुभेदारीण बाईसाहेब आम्हा गरीबावर कृपादृष्टी असावी.

ठकू—हें काय हो फारेष्टर ? तुम्हीं सगळ्यानीं आतां इकडे संभाळून घेतलं पाहिजे. ( चहाचे पेले व बशा सगळ्यांनां देते. )

डाक्टर—आय मस्ट टेल यू बापूसाब. सकाळीं फिरून आल्यावर पहिल्यानें थोडें फूड घेतल्या खेरीज हा टी कधींही घेऊं नये. फिरण्यानें सगळ्या शरीरांतल्या शिरा लूज होतात. या टीबरोबर बिस्किट्स् असावीं.

बापू—वेल् ठकू त्या कपाटांतला तो बिस्किटांचा डबा काढा द्या वाटून सगळ्यांना.

( ठकू बिस्किटें वाटते. )

डाक्टर— ( चहांत बिस्किटें भिजत टाकतो. ) ही ट्रेचरचीं बिस्किटें फार शांदार ! तो लोबो, करतो पण त्याच्या त्या बिस्किटांना टेस्टच नसते.

मास्तर—पण या डब्याला पडतात रुपये साडेतीन. त्या लोबोचीं काय गांवठी स्वस्तीं !

बापूसाहेब—वेल् डीयर तुम्ही घ्या थोडा टी अन् बिस्किट.

( आपला अर्धा पेला तिला देतो, ठकू खुर्चीवर बसून चहा पिते. ) ओहो ! मार्तंडरावाच्या बशींत बिस्किटें नाहींत !

**ठकू**—मार्तंडराव, घ्या त्या डब्यांतलीं दोन.

**मार्तंड**—जी, नकोत बाईसाहेब, माझी स्नानसंध्या अजून व्हावयाची आहे.

**ठकू**—जळली मेली ती स्नानसंध्या. आह्माला ठाऊक आहे.

**बापू**—वेल्, मार्तंडराव, एक घ्या, खाल्लेंच पाहिजे. ( त्याच्या तोंडांत बिस्किट घालूं लागतो. )

**मार्तंड**— साहेब, इतका आग्रह नको; मीच घेतों. ( तो बिस्किट खातो व चहा पितो. )

**डाक्टर**—असा सोनारानेंच कान टोंचला पाहिजे.

**फारेष्टर**—आम्ही यांना जर आग्रह केला असता तर याणीं डोक्यांत राखच घातली असती.

**मार्तंड**—छे: छे : साहेब मी सर्वांचा दास आहे. सर्वांचें या सेवकाला ऐकलेंच पाहिजे.

**ठकू**— मार्तंडराव, जुन्या सुभेदारांच्या घरीं मिळत असे काहो असं कधीं चापायला ?

**मार्तंड**—छे : बाईसाहेब, त्यांचा स्वभाव फारच कद्रू. एकेका पैशाला गांठ बसावयाची. आतां या मार्तंड्याची इतकीच विनंती आहे कीं आपणा उभयतांचा या गांवाला वियोग म्हणून नसावा. या तालुक्याची कायमची सुभेदारी पटकावली पाहिजे.

**मास्तर**—ती ग्रेड आली म्हणजे मिळेल.

**मार्तंड**—कशाला पाहिजे ग्रेडबीड. प्रयत्न केला म्हणजे काम काय हां हां म्हणतां होईल.

**बापू**—तें कसेंहो मार्तंडराव, आम्हाला तरी सांगा. ( हांसतो. )

**मार्तंड**—साहेब सगळें जाणत आहेत, उगीच आमची थट्टा आरंभिली आहे.

**बापू**—लौकरच तुम्हा सर्वांना कळेल.

**डाक्टर**—एकदम कायमची सुभेदारी मिळेल आपल्याला ?

**बापू**--तर मग ह्या रड्या सुभेदाराची उचलबांगडी उगीच झाली असेल वाटतें ?

**फारेष्टर**--कमाल आहे बोवा !

( महादेवभट तोंडानें पाठ म्हणत येतो )

**महादेवभट**—( पाठ ह्मणतो )

आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः ।
ईहंते कामभोगार्थमन्यायेनार्थसंचयान् ॥ १ ॥

हें बघ बापू मीं इवलेसे कोंकणचे पोहे नी फणसपोळी आणली आहे. खातोस काय थोडी ? या मंडळीला दे थोड थोडा आमचा आपला कोंकणचा मेवा.

**बापू**—काहो बाबा, कशाला आलांत वर तुह्मी. तुह्माला सांगितलें होतेंना कीं, मागल्यादारीं तुह्मी बसा ह्मणून. चला व्हा चालते येथून.

( वाराणशी येते )

**वाराणशी**--हें बघ बाळा, मी तुजकरितां मुद्दाम एक कोंकणचें मोहाचें शहाळें आणलें आहे. देऊं का त्यांतलें इवलेसें खोबरें ?

**ठकू**--जा, आतां खालीं जा. त्या कोपऱ्यांत स्वस्थ बसाज़ा उगीच, किती मेला त्रास देतां हो आह्माला ? अहाहा ! काय ती नथ, काय तें कुंकू, तें लुगडें ?

**वाराणशी**—बरीच किंग बोलायला शिकलीस, आह्मी त्रास देतों काय तुला, ही निघालें मी खालीं, (महादेव भटाला) चला-हो तुह्मी खालीं बसूंया हिला आपल्या घोंवाला घेऊन.

**बापू**—हें पहा बाबा, आह्मी एथें मोठ्या कामांत गुंतलों आ-होंत, येथून जा, तुह्मी जा खालीं, निघा येथून. नाहीं तर शिपा-याकडून हांकून देईन.

**महादेवभट**—आह्मालारे देणार पोरा शिपायाकडून हांकून. हे आह्मी निघालों या घटकेला येथून. चलग, ह्या बाप्याच्या घरीं पाणी ह्मणून पुन्हां घ्यावयाचें नाहीं. कोण शिचा हा अपमान !

आह्मास हा शिपायाकरवीं हांकून लावणार, मोठ्या कामगाराचा बेटा झाला आहे कीं नाहीं ! ( जाऊं लागतो. )

**मास्तर**—अहो बाबा, रागावूं नका—बसा येथें.

**बापू**—स्टापमास्तर, त्या ओल्डफूल्सनां गा करूं द्या एकदांचें.

**महादेव**—मोठे लेकाचे शिकले आहेत विंग्रजी !

( ते दोघे रागानें निघून जातात. )

**ठकू**—काय हो तर मग, कालपासून अस्सा त्रास दिला आहे. माणसानें सहन तरी कोठवर करावा.

**बापू**—लेट गो द्याट, पण कायहो मार्तंडराव मग तुमचे सुभेदारसाहेब बदली फिरती करायला नाहीं का जात? जा ह्मणावें, फिरवा बदली. पहातों कशी फिरते ती !

**ठकू**—उगीच डौल नकोत. माझ्याच बाबांचे उपकार मानीले पाहिजेत.

**बापू**—पण मी कोठें मारतों आहे डौल. तो हुकूम आला तेव्हां काय चालले होते विचार मार्तंडराव ?

**मार्तंड**—कसले चालावयाचे आहेत विचार ? जाणार उद्याच्या उद्यां. त्याचें ह्मणणें आहे कीं आणखी पंचवीस ठिकाणीं बदल्या झाल्या तरी आपण जाणार.

**डाक्तर**—कसलाहो तो रड्या सुभेदार? मोठा बी. ए. झाला आहे! लिबरल, आडव्हान्स्ड् विचारांच्या नांवानें आवळ्याएवढें पूज्य. सुधारणा ह्मणजे काय असतें हें त्यांच्या कधीं स्वप्नीं देखील यावयाचें नाहीं.

**फारेष्टर**—येतों आतां सुभेदारसाहेब, उशीर झाला.

**मास्तर**—आपण अगदीं आनंदाची बातमी आह्मांला सांगितलींत याकरितां घरीं जातां जातां आनंद करीत गेलें पाहिजे.

**फारेष्टर**—या आजच्या गडबडींत त्याचा अगदीं विसर कसा पडला बोवा !

**मार्तंड**—मी घेतों साहेब आतां रजा. पुन्हां कचेरींत

लौकर आज आलेंच पाहिजे. पण आपली फडणिशीची जागा कोणाला मिळावयाची.

**बापू**—कळेल तेंही थोड्या दिवसांत. या तर मग तुह्मी. नमस्कार !

( मार्तंड जातो )

वेल् त्या कपाटांतील हार्टच्या लेबलची काढा एक पाहूं ठकू ?

**ठकू**—ती काल मुंबईहून पेटी आली त्यांतली ना काढायची?

**बापू**—बरें त्यांतली काढा मासल्याकारितां.

( ठकू पेटींतली बाटली काढून त्यांतलें औषध गलासांत ओततें. )

**मास्तर**—( गलास हातांत घेतो ) हं घ्या फारेष्टर, डाक्टर साब, बापूसाब. ओ ये माल तो आज बोहोत आच्छा है ! करा आरंभ. लेट दि हेल्थ गो अराऊंड, अराऊंड ! ( गलास तोंडाला लावतो. ) बस्स बोवा.

**बापू**—आणखी एकएक. डायल्यूट करून घ्या पाहिजे तर.

**डाक्तर**—बरें आहे आपणांस काय, उंसाचा रस आणखी ! आपण सर्व जण आतां आनंद प्रदर्शनार्थ बापूसाहेबांची व ठकूबाईची हेल्थ घेऊं.

( सगळे एकएक गलास हातांत घेतात. )

**फारेष्टर**—हुरे ! बापूसाबाला अन् ठकूबाईला पुष्कळ हेल्थ येवो ! आयुष्य येवो ! ( पितात. )

**बापू**—अरे ए मास्तर, डाक्तर, फारेष्टर आज एथें जेवावयाला रहाना रे. चैन करूं ?

**डाक्टर**—नाहीं बोवा एक्सक्यूज्. आतां असें ह्मणून मेजवानी नाहीं चुकावयाची. जातों आतां.

**बापू**—ती कसली चुकावयाची, तुह्मी सोडतां कीं काय ?

( सर्व जातात. )

---

## अंक २ रा,

### प्रवेश ३ रा.

**स्थल**—अण्णासाहेबांचा वाडा.

अण्णासाहेब, तात्यासाहेब, रावसाहेब.

**रावसाहेब**—अण्णासाहेब, ही का आमची चाकरी, का हमाली, का सगळी थट्टा? आहे तरी काय? हें पहा, आतां आपण असा एकदां हुकूम सोडा कीं, या रावसाहेबाला त्याच्या घरून एक दिवस रात्रीचा उचलावा, आणखी एखाद्या मोठ्याशा नदीच्या डोहांत द्यावा ढकलून; दुसरी गोष्ट नाहीं!

**अण्णा**—काय झालें काय तुमच्या चाकरीला?

**रावसाहेब**—कांहीं एक झालें नाहीं. हुकूम आपणच धाडतां अन् पुन्हां मलाच विचारतां. आज मला थोडीं नाहींत थोडकीं नाहींत, या खात्यांत चाकरी धरून सहा वर्षें झालीं. पहिलीं दोनतीन वर्षें सुखांत काढलीं; पण या गेल्या दोन तीन वर्षांत माझ्या बदल्या तरी झाल्या किती ठिकाणीं? कशाला दिलीत मला आक्टिंग सुभेदारी? तीन वर्षें आक्टिंग सुभेदारीचें काम करून पुन्हां आपला फडणिसचा फडणीस!

**तात्यासाहेब**—बरें आहे, मग त्यांत काय झालें! नेमलें तुम्हाला तुमच्या कायमच्या जागीं.

**रावसाहेब**—छे: आमच्या नोकरीबद्दल चमत्कार अजून सांगायचा राहिलाच आहे. हें पहा, आम्ही आज दोन तीन वर्षें उंबरगांवीं नोकरी केली, तेथून झाली आमची जांभूळगांवीं बदली आक्टिंग सुभेदारीवर. आम्ही जांभूळगांवीं जायला निघालों, येथें येऊन पोहोंचलों तों आज पुन्हां आणखी आम्हाला हुकूम तयार, कीं तुम्हीं परत उंबरगांवीं जावें. तेथें तुम्हाला फडणिशीची जागा दिली आहे!

**तात्या**—बरें झालें तुमचें. जांभूळगांवीं जायचा हेलपाटा वांचला तुमचा.

**रावसाहेब**—आतां ज्या उंबरगांवीं आम्हीं तीन वर्षें सुभेदारीची चाकरी केली त्याच गांवीं फडणीस व्हावयाचें, अन् आमच्या हाताखालचे फडणीस बापूसाहेब आमच्यावर सुभेदार व्हावयाचे! वाः फार चांगला न्याय! काय बरें माझ्या हातून अपराध घडला आहे सरकारचा आन् आपणां सर्वांचा? गेलीं तीन वर्षें रात्रंदिवस मोठ्या मेहनतीनें सुभेदारीचें काम बिनबोभाट बिनतक्रार बजाविलें त्याचें हें बक्षीस दिलें वाटतें आह्माला!

**अण्णा**—आह्माला यांतली कांहीं एक भानगड माहीत नाहीं.

**रावसाहेब**—आपल्या आफिसांतून आपल्या सल्ल्यानें सगळ्या नेमणुका होतात हें जगजाहीर आहे.

**अण्णा**—आम्हीं आतांशीं असें ठेविलें आहे कीं जें काम पुढें येईल तें करावयाचें. हुकुमाच्या बाहेर काडीमात्र वागावयाचें नाहीं.

**तात्या**—हें पहा रावसाहेब, उगीच या अण्णापुढें वटवट करून काय उपयोग? हीं सगळीं कामें पाहणारे निराळेच आहेत.

**रावसाहेब**—काय कोण्या नव्या कामगाराची नेमणूक झाली कीं काय?

**तात्या**—बडेसाहेबांना आयतीं बिनपगारी माणसें अप्पासाहेबांसारखीं मिळतात, मगहो काय?

**रावसाहेब**—हा अप्पासाहेब कोण?

**तात्या**—आहेत एक हरीचे लाल, बच्यासाहेबांचे गळ्यांतले ताईत!

**रावसाहेब**—हं हं! ते अप्पासाहेब काय? आम्हांला नेलें होतें त्यांच्या घरीं त्या विसूनें. आमची त्यांची खूप उडाली!

**तात्या**—मग हो काय? लावा संधान. तुमचे तर ते दोस्त असतील.

**रावसाहेब**—मी तशांतला मनुष्य असतों तर मला कशाला हे दिवस आले असते!

**तात्या**—हें पहा, बडेसाहेब कर्जानें भगदीं मस्त झाले आहेत.

**रावसाहेब**—त्याचें आह्माला काय? आह्माजवळून त्या आप्पाला एक कवडीही प्राण गेला तरी मिळावयाची नाहीं. असे प्रकार करून मी आपल्या कुळाला, विद्येला, गृहस्थीला कधींही कालिमा आणणार नाहीं.

**अण्णा**—फार उत्तम. हा तुमचा मनाचा निश्चय रावसाहेब कधींही ढळूं देऊं नका. तुमच्या सारख्या विद्वानांनीं असेच विचार सदा ठेवावे.

**तात्या**—रावसाहेब, नुस्ती कर्जाच्या कामीं मदत करायची. त्या बापूसाहेबानें पहा कसें आपलें कल्याण करून घेतलें तें. तुमच्या डोक्यावर मिरीं वाटायाला तयार होऊन बसला कीं नाहीं?

**अण्णा**—पण तात्या, आमचे रावसाहेब आपला सचोटीचा मार्ग कधींही सोडणार नाहींत हें तुह्मी पक्कें समजून असा.

( मोठाभाई येतो. )

**मोठाभाई**—कां अण्णासाहेब, आपल्या चाकरीचा राजीनामा कधीं देणार आपण आतां?

**अण्णा**—जेव्हां हुकूम होईल तेव्हां. आमच्या नोकरीवर धाड यायची आहे कीं काय?

**मोठाभाई**—त्याचा काय नेम व्हायची कोठें तरी बदली. गांवांत काय ही ओरड होऊन राहिली आहे एका मत्त सिंहाची अन् त्याच्या अनुयायांची. तुह्मी तर बसलां आहांत कानांत तुळशीपत्रें घालून.

**अण्णा**—आह्मीं काय करावें ह्मणतां?

**तात्या**—कळेल थोडक्याच दिवसांत काय करावयाचें तें!

**अण्णा**—नका बोवा आह्मांवर कांहीं भूर्दंड आणूं. आमचें असें आहे कीं, सहा तास इमानेंइतबारें चाकरी करावयाची, अन् स्वस्थ हरि हरि ह्मणत बसावयाचें. कोण बसला आहे सगळ्या जगाच्या भाकऱ्या भाजीत!

**रावसाहेब**—अशा ह्या आपल्या शांत स्वभावानेंच तर आमच्या सारख्यांना त्रास आणि हालअपेष्टा भोगाव्या लागतात!

**मोठाभाई**—या मत्त सिंहाचें पाप भोंवण्याची वेळ आली तर तुह्मी मदत कराल कीं नाहीं ?

**अण्णा**—मग जशी हरि बुद्धि देईल तसें करितां येईल.

**मोठाभाई**—तात्यासाहेब, तुमची मदत पाहिजे.

**तात्या**—आपली तयारी. कसेंही करा, पण त्या एका अनुयायाला बिनभाड्याचें घर दाखवाल तेव्हां मला संतोष होईल.

**मोठाभाई**—पहाल आतां काय मौज होईल ती ! काय ही स्थिति झाली आहे ? हा सिंह आपला स्वस्थ निर्भयपणें डुरक्या देत बसला आहे, अन् त्याचे अनुयायी सर्व रानावनांत यथेच्छ विहार करून येऊन त्याची भरती करिताहेत !

**अण्णा**—अहो, हें तर आज किती दिवस ओपन् सीक्रेट आहे; पण करावें काय !

**मोठाभाई**—येईल, लौकरच येईल काय करावयाचें तें कळण्याची संधि.

**तात्या**—कांहीं एक होणें नाहीं. हा सिंह जाळ्यांत सांपडण्याची महा मुष्कील आहे.

**मोठाभाई**—जाळें असें कांहीं भक्कम तयार होतें आहे कीं, एकदां तें या सिंहाभोंवतीं गुरफटलें कीं, त्याणें हवे ते प्रयत्न केले तरी तें ह्मणून तुटावयाचें नाहीं.

**अण्णा**—तुह्मी ह्मणतां या जाळ्याच्या ग्रंथि भक्कम भक्कम बसल्या पाहिजेत.

**मोठाभाई**—आतां मी फार बोलत नाहीं, थोडक्या दिवसांत काय तें कळेल.

**रावसाहेब**—असा हा सुदिन केव्हां येईल याची पुष्कळ मंडळी वाट पाहते आहे.

**अण्णा**—पण कायहो, हें जाळें या मदोन्मत्त सिंहाभोंवतीं गुरफटणार असा ज्ञातीवान् न्यायप्रिय महात्मा तरी कोण निर्माण झाला आहे ?

**मोठाभाई**—प्रत्यक्ष या प्रदेशाचीं राज्यसूत्रें चालविणारे प्रतिनिधि साहेब.

**अण्णा**—अं! येथपर्यंत मजल येऊन ठेपली ह्मणतां? प्रत्यक्ष प्रतिनिधि साहेबांपर्यंत ही गोष्ट जाऊन धडकली? भाईसाहेब, कोणच्या महापुरुषानें ही कामगिरी बजावली हो?

**मोठाभाई**—आतां छपवून कशाला ठेवूं? या मोठाभाईनें हें काम केलें आहे. आमच्या चाकरीचा राजीनामा अन् या सगळ्या हकीगतीचें टिपण हे दोन कागद पुढें केले, अन् सांगितलें कीं, एक आमचा राजीनामा तरी घ्यावा अगर हकीगतीची चौकशी तरी व्हावी; तेव्हां चौकशी व्हावयाचें ठरलें. आपणां सर्वांनीं मात्र आतां न्यायदेवतेला स्मरून मनोभावानें मदत केली पाहिजे.

**रावसाहेब**—या आपल्या महत्कृत्यानें या देशावर आपले मोठे उपकार झाले आहेत. अहो, मी त्या अप्पाच्या भुलथापीला सामील झालों नाहीं म्हणून मजवर आज मोठें संकट येऊन गुदरलें आहे.

**अण्णा**—हे सुभेदाराचे फडणीस झाले आहेत, अन् ह्यांच्या हाताखालचे फडणीस यांच्यावर सुभेदार होऊन बसले आहेत!

**मोठाभाई**—सगळ्यांचा आतां उत्तम प्रकारचा न्याय होणार आहे.

**तात्या**—प्रतिनिधि साहेबांसारख्यांनींच जर मनावर घेतलें असेल तर सगळ्या गोष्टी बाहेर येतील. पण या कामीं सुभेदार मात्र पुष्कळ मरणार आहेत.

**मोठाभाई**—अहो, त्यांना काय भीति? त्यांणीं एखादी गोष्ट आपण होऊन फारच केली असेल? त्यांणीं खऱ्या गोष्टी पुढें आणल्या तर त्यांच्या केसालाही धका लागावयाचा नाहीं. त्यांणीं यत्किंचित्‌ही भिऊं नये.

**अण्णा**—त्या सगळ्या गोष्टी होतील. आपले प्रतिनिधि साहेब मोठ्या उदार स्वभावाचे आहेत.

**मोठाभाई**—येतों आम्ही आतां. आमचें शेवटचें सांगणें आहे कीं, न्यायाच्या कामाला सर्वांनीं मदत केली पाहिजे.

( मोठाभाई जातो. )

**रावसाहेब**—मग मीं जावें म्हणतां अण्णासाहेब त्या गांवीं ?

**अण्णासाहेब**—बेलाशक जा. त्या गांवीं थोडे दिवस काढा. सगळ्या गोष्टी थोड्या दिवसांत सोईला लागतील.

**रावसाहेब**—बरें आहे. मी आपल्या सल्ल्याच्या बाहेर नाहीं. प्रसंगीं आपण मला मदत केली पाहिजे.

**अण्णा**—तें आमचें काम. तुह्मी खुशाल बिनधास्त असा.

( जातात. )

# अंक ३ रा

## प्रवेश १ ला

**स्थल**—एक बंगला.

कृष्णराव, मार्तंड, मामा, विठ्या.

**मामा**—का मार्तंडराव, केव्हां आल्या आपल्या स्वाऱ्या?

**मार्तंड**—हे आत्तां संध्याकाळींच.

**मामा**—बापूसाहेब आलेच असतील?

**मार्तंड**—ह्मणजे, अप्पासाहेबांचें पत्र आल्यावर आलेंच पाहिजे. त्या गांवचे शाळामास्तर, डाक्टर, फारेष्टर वगैरे सगळी मंडळी घेऊन सुभेदारसाहेब आले आहेत.

**मामा**—फार चांगलें. विठ्या, ह्या सगळ्या हंड्या झुंबरांतलीं गलासें बेलियाच्या तेलानें भरलीस कीं नाहीं?

**विठ्या**—जी साब, लई घमघमाट. म्यावी आपलं अंग त्या तेलानं चोपडलया.

**मामा**—कृष्णराव, तुह्मी तें सगळें अत्तर या येथल्या फरनिचरला चोळा पाहूं.

**कृष्णराव**—बरें आहे. मामा अप्पासाहेबांनीं काल गुलाबपाण्याचें कारंजें आणवा ह्मणून सांगितलें होतें तें आणलें कीं नाहीं?

**मामा**—सगळी लेश तयारी आहे, आह्माला काय? हुकमाचा अवकाश. अर्धा मण गुलाबपाणी आणलें आहे. बस्स होईल कीं नाहीं?

**मार्तंड**—हे अत्तराचे दिवे अन् या घमघमाटाचें वर्णन गोष्टींच्या बुकांतून ऐकत होतों; पण त्याचा आज प्रत्यक्ष अनुभव आला बोवा! या येथें शेर दोन शेर, मण अर्धा मणावर बोली, दुसरी गोष्ट नाहीं!

**कृष्णराव**—अहो, अप्पासाहेब तसेच भाग्यवान् आहेत!

( हिराभाई येतो. )

**हिराभाई**—मामा, अजून सुंद्राजी आले नाहींत तें? अप्पा-

साहेब मंडळी घेऊन घरून निघाले. त्यांणीं मला पुढील तजवीज लावण्याकरितां पुढें पाठविलें आहे.

**मामा**—हा निघालोंच त्यांना बोलावणें. विठ्या, तीं दोन वालशिटें आणून ठेव. त्या हाऱ्यांतलें सामान खोलींत ठेव. खबरदार त्यांतली फुटली तर. अरे तो माळी अजून फुलांचें सामान घेऊन आला नाहीं तो? काय बोवा गैदी लोक हे ? आतां हीं सगळीं कामें आह्मांलाच केलीं पाहिजेत!

**विठ्या**—मामासाहेब झड्याचीं पानें रायलीं हायतीं आनायचीं.

**मामा**—गाढवा, आधीं समजत नव्हतें का आठवण करावयाची? या माम्यानें सगळीं धोरणें एकट्यानें संभाळलीं पाहिजेत. कृष्णराव, मार्तंडराव, तुह्मी आतां येथली सगळी तयारी लेश ठेवा. सगळें रुप्याचें पानसुपारीचें सामान त्या कपाटांत ठेविलें आहे. (इकडे तिकडे फिरतो) काय बोवा सगळी धांदल उडून गेली आहे! अरे माझी काठी कोठें आहे, माझा जोडा? (तो बाहेर जाऊं लागतो.)

**हिराभाई**—(मामाला) कारभारीपणा करावयाला पाहिजे? जा आतां तुह्मी. आह्मी करतों सगळी व्यवस्था. (मामा जातो) विठूजी, तो कलाबतूचा गालीच्या असा मध्यें घाला. त्यावर तीं दोन वालशिटें ठेवा. या गालिच्यावर तर आज रात्रीचा मुख्य देव बसावयाचा. ते दोन गालीचे दोहोकडे घाला, पांच अगरबत्त्या लावून या वालशिटांच्या मध्यें ठेवा.

**विठ्या**—जी साब, संमदं करतुया.

(अप्पासाहेब, बापूसाहेब, भाऊसाहेब, विसाजीपंत, डाक्टर, फारेष्टर वगैरे सर्व मंडळी येतात.)

**बापूसाहेब**—बसा. सर्व मंडळी बसा. ओ! व्यवस्था तो अच्छा झाली आहे.

**अप्पा**—(हिराभाईला एकीकडे नेऊन) शेटसाहेब, ह्या

घटकेला मला दोन हज्जार रुपये जरूर पाहिजेत. काय व्याज पडेल तें देईन.

**हिराभाई**—साहेब, हा आतां रात्रीचा दहा वाजावयाचा वखत, या वेळीं कोठले आणावे बोवा हे रुपये ?

**अप्पा**—आपला जीव गहाण ठेवा पण रुपये पाहिजेत.

**हिराभाई**—जर सोनें मोतीं गहाण असलें तर आतां बजावतों काम.

**अप्पा**—गहाण ठेवण्याची सोय असती तर मग तुमचें इतकें आर्जव कशाला हवे होते ?

( मैनाजी येतात. )

**मैनाजी**—सलाम साहेब.

**अप्पा**—( आपल्याशीं ) रुपये तर आतांच्या आतां पाहिजेत. आतां या हिऱ्याला गहाण ठेवावयाला सोनें मोतीं कोठलें आणावें ? ( विचारकरितो ) हं. आतां ही युक्ति करावी. ( मैनाजीला ) हें पहा मैनाजी अंमळ इकडे या पाहूं, या खोलींत.

**मैनाजी**—( खोलींत जाते ) काय हुकूम ?

**अप्पा**—आमचें एक काम करा. तुमच्या अंगावरच्या तेवढ्या त्या वांकी, सरी, माळ, तोडे, गळ्यांतलें मोत्याचें पेंडें, कानांतल्या बुगड्या व नाकातली नथ द्या काढून पाहूं आतांच्या आतां ?

**मैनाजी**—ह्मणजे ? हें बाई आज नवंच ऐकतें. साहेब, मी कांहीं आपल्या दागिन्यांना हात लावूं द्यायची नाहीं सांगतें आहे. मी हें कांहीं एक ऐकणार नाहीं.

**अप्पा**—या अप्पासाहेबाची ही गोष्ट ऐकावयाची नाहीं असें ह्मणतेस अं ! तुला शरम नाहीं वाटत? तुला असें वाटतें कीं, हे दागिने एकदांचे गेले ह्मणजे पुन्हां मिळावयाचे नाहींत ? तुला दागिने दिलेच पाहिजेत, नाहींतर ते मी जबरीनें काढून घेईन. मीं ते तुला करून दिले आहेत, मीच ते परत घेणार. ( तिच्या अंगा-वरचे दागिने काढूं लागतो. )

**मैनाजी**—इतकी नको माझी अप्रतिष्ठा करायला कांहीं. मीच

देतें काढून. आपण परत घेतलेत तरी आपणच पुन्हां देणार समर्थ आहांत. ( ती दागिने देते. )

**अप्पा**—आतां कसें शहाण्यासारखें बोललीस.

**मैनाजी**—पण मी आतां यांपेक्षां मोठाले घेईन, सांगतें आहे.

**अप्पा**—अग चल, चार दिवसांत तुला पुन्हां सोन्या मोत्यांनीं फुलवून काढीन. हा अप्पासाहेब मनांत आणील तें करील. ( हिराभाईला बोलावतो. ) ए शेट्या चल ये इकडे? ( हिराभाई आंत येतो. ) हें घे सोनें मोतीं लागेल तितकें. तुला काय वाटलें होतें कीं या अप्पाला तें मिळणार नाहीं?

**हिराभाई**—साहेब, आपण कराल ती आज पूर्वदिशा आहे. मला गरिबाला त्यांत तें काय वाटावयाचें आहे.

**अप्पा**—आतां त्या वाणगट गप्पा पुरे करा. चला व्हा चालते आतांच्या आतां.

**हिराभाई**—हा निघालों. पण साहेब मी आल्याच्या आधीं, आरंभ होतां कामा नये, सांगतों आहे. ( जातां जातां आपल्याशीं ) हो तर आपण पडलों व्यापारी गडी. आतां नोटांना काय उशीर, हव्या तितक्या! ( जातो. )

( सुंद्राजी येतात. )

**बापू**—किती उशीर हा? चला या लौकर.

**सुंद्राजी**—जी थोडा झाला उशीर खरा. माफी करावी. सगळ्यांला सलाम करितें साहेब.

( ती गालीच्यावर बसते. )

**बापू**—वेल, अप्पासाहेब, आटपलें कीं नाहीं बोवा तुमचे कारभार अजून? एक मिनिटही फुरसत नाहीं या गृहस्थाला!

**मामा**—हं, करा सुंद्राजी आरंभ झटपट.

**विस्ताजी**—तुमचा तो तबला ठोकण्यांत अन् तारा लावण्यांत वेळ नको. अप्पासाहेब, बापू, सर्व मंडळी या आतां पुढें.

( सर्व मंडळी बसतात. )

**मामा**—मैनाजी अशा तुह्मी दूर कां?

**मैनाजी**—मलाबाई लाज वाटते.

**अप्पा**—कांहीं नाहीं लाज वाटत. ( तिचा हात धरून आपणाजवळ आणून बसवितो. ) बसा अशा येथें कोंचावर आमच्या शेजारीं. आतां कशा दिसतां बरें ? दागिने नसले ह्मणून काय झालें ? " जातीच्या सुंदरांना कांहींही चालतें " ! !

**विसाजी**—खरेंच आहे साहेब, असे प्रभावळींतले देव प्रभावळींतच शोभतात.

**मामा**—मदनाशेजारीं रतीच पाहिजे.

**बापू**—ऑंटनी शेजारीं क्लिओपाट्राच पाहिजे.

**अप्पा**—कितीरे चघळपणा करितां तुह्मी ?

**विसाजी**—साहेब, आह्मी का खोटें बोलतों.

**मैनाजी**—अशी जर माझी थट्टा करायची असेल तर मी जातें कशी इथून उठून.

**सुंद्राजी**—अशा हो काय चिडतां अगदीं मैनाजी ? अहो चार मंडळी आहे तिथें थट्टा आहेच. ( हांसते ) थट्टा करून घेणं तरी नशिबीं पाहिजे !

**विसाजी**—करा आरंभ आतां सुंद्राजी.

**सुंद्राजी**—जी, जशी आज्ञा

## पद.

( कंथ बिन कैसि या चालीवर )

रूप कितीं हें रम्य मनोहर ॥ स्वरुप ॥ ध्रु ॥
भरजरि चांदणि शालु नेसलिस ।
कंचुकि नामी दिसते ॥ सखेही ॥
अलंकार जरि असले नसले ।
तनु तारुण्यें खुलते ॥ मनोहर ॥ १ ॥

**अप्पा**—ओहो सुंद्राजी, चीज तर बहारदार काढलीत !

**मामा**—सगळा भाव मैनाजीकडे झुकतो आहे.

**विसाजी**—त्या तशाच आहेत.

**मैनाजी**—हें कायहो माझी थट्टा करितां सगळेजण ?

देतें काढून. आपण परत घेतलेत तरी आपणच पुन्हां देणार समर्थ आहांत. (ती दागिने देते.)

**अप्पा**—आतां कसें शहाण्यासारखें बोललीस.

**मैनाजी**—पण मी आतां यांपेक्षां मोठाले घेईन, सांगतें आहे.

**अप्पा**—अग चल, चार दिवसांत तुला पुन्हां सोन्या मोत्यांनीं फुलवून काढीन. हा अप्पासाहेब मनांत आणील तें करील. (हिराभाईला बोलावतो.) ए शेट्या चल ये इकडे? (हिराभाई आंत येतो.) हें घे सोनें मोतीं लागेल तितकें. तुला काय वाटलें होतें कीं या अप्पाला तें मिळणार नाहीं?

**हिराभाई**—साहेब, आपण कराल ती आज पूर्वदिशा आहे. मला गरिबाला त्यांत तें काय वाटावयाचें आहे.

**अप्पा**—आतां त्या वाणगट गप्पा पुरे करा. चला व्हा चालते आतांच्या आतां.

**हिराभाई**—हा निघालों. पण साहेब मी आल्याच्या आधीं, आरंभ होतां कामा नये, सांगतों आहे. (जातां जातां आपल्याशीं) हो तर आपण पडलों व्यापारी गडी. आतां नोटांना काय उशीर, हव्या तितक्या! (जातो.)

(सुंद्राजी येतात.)

**बापू**—किती उशिर हा? चला या लौकर.

**सुंद्राजी**—जी थोडा झाला उशीर खरा. माफी करावी. सगळ्यांला सलाम करितें साहेब.

(ती गालीच्यावर बसते.)

**बापू**—वेल, अप्पासाहेब, आटपलें कीं नाहीं बोवा तुमचे कारभार अजून? एक मिनिटही फुरसत नाहीं या गृहस्थाला!

**मामा**—हं, करा सुंद्राजी आरंभ झटपट.

**घिस्माजी**—तुमचा तो तबला ठोकण्यांत अन् तारा लावण्यांत वेळ नको. अप्पासाहेब, बापू, सर्व मंडळी या आतां पुढें.

(सर्व मंडळी बसतात.)

**मामा**—मैनाजी अशा तुम्ही दूर कां?

**मैनाजी**—मलाबाई लाज वाटते.

**अप्पा**—कांहीं नाहीं लाज वाटत. ( तिचा हात धरून आपणाजवळ आणून बसवितो. ) बसा अशा येथें कोंचावर आमच्या शेजारीं. आतां कशा दिसतां बरें ? दागिने नसले ह्मणून काय झालें ? " जातीच्या सुंदरांना कांहींही चालतें " ! !

**विसाजी**—खरेंच आहे साहेब, असे प्रभावळींतले देव प्रभावळींतच शोभतात.

**मामा**—मदनाशेजारीं रतीच पाहिजे.

**बापू**—ॲंटनी शेजारीं क्लिओपाट्राच पाहिजे.

**अप्पा**—कितीरे चघळपणा करितां तुह्मी ?

**विसाजी**—साहेब, आम्ही का खोटें बोलतों.

**मैनाजी**—अशी जर माझी थट्टा करायची असेल तर मी जातें कशी इथून उठून.

**सुंद्राजी**—अशा हो काय चिडतां अगदीं मैनाजी ? अहो चार मंडळी आहे तिथें थट्टा आहेच. ( हांसते ) थट्टा करून घेणं तरी नशिबीं पाहिजे !

**विसाजी**—करा आरंभ आतां सुंद्राजी.

**सुंद्राजी**—जी, जशी आज्ञा

## पद.

( कंथ बिन कैसि या चालीवर )

रूप किती हें रम्य मनोहर ॥ स्वरुप ॥ ध्रु ॥
भरजरि चांदणि शालु नेसलिस ।
कंचुकि नामी दिसते ॥ सखेही ॥
अलंकार जरि असले नसले ।
तनु तारुण्यें खुलते ॥ मनोहर ॥ १ ॥

**अप्पा**—ओहो सुंद्राजी, चीज तर बहारदार काढलीत !

**मामा**—सगळा भाव मैनाजीकडे झुकतो आहे.

**विसाजी**—त्या तशाच आहेत.

**मैनाजी**—हें कायहो माझी थट्टा करितां सगळेजण ?

**अण्णा**—काय झालें थट्टा केली म्हणून? अंगाला भोकें पडतात का?

**मैनाजी**—आह्मी आपल्या गरीब आहोंत बरं सुंद्राजी! आम्ही कसल्या सुरूप, आह्माला कुठले मिळाणार आहेत दागिने तुमच्या इतके?

**सुंद्राजी**—अहो अप्पासाहेबां सारख्यांचा आश्रय असतां तुह्माला हो काय कमी?

**विसाजी**—अलबत्—चालूंद्या तुमचें सुंद्राजी.

**बापू**—आतां एक संगीतांतली चीज ह्मणा सुंद्राजी.

**सुंद्राजी**—( हांसते ) कोणच्या नाटकांतली ह्मणूं?

**विसाजी**—तुह्माला येईल ती.

**सुंद्राजी**—बरं आठवतें अं.—( गाते )

## पद.

या मदन मनोरम रूपीं, मन माझें गुंतुनि गेलें ॥ ध्रु ॥
कधि वाहिन काया यांसी, प्रेमें हें ऐसें झालें ॥
दिवस तो पूर्ण सौख्याचा, येइल मज कवण्या काळें ॥
( चाल ) गुणरूप चिंतनिं पाही ॥ झोंप मज नाहीं ॥
शयनीं मी निजलें ॥ किति तरंग हृदयीं उठले ॥ १ ॥

**अप्पा**—कोणचें तें मनोरम रूप सुंद्राजी?

**विसाजी**—नाहीं का आलें लक्षांत? बापूसाहेबांचें!

**मामा**—भाव तिकडेच झुकत होता, तुमच्या कसा लक्षांत आला नाहीं बोवा?

**बापू**—अशी माझी थट्टा करूं नका. पलीकडे ते फादरइनला बसले आहेत.

**अप्पा**—अं:, तीं झालीं आतां ह्यातारीं माणसें.

**विसाजी**—त्यांची पहा झाली आहे मध्यान रात्र. बरें आहे, चालूं द्या सुंद्राजी.

**सुंद्राजी**—जी, तयारी आहे आमची.

### पद.

( अप्पासाहेबांवर भाव )

धन्य धन्य या गुणवंताची । सर्व जनांवरि बहु प्रीती ।
दरबारामाधिं हातखंडा अति । लोक कितिक पायां पडती ॥ध्रु.॥
सुंदर बांधा श्यामल काया । खुलते शरिराची कांती ।
जरिचा फेटा शिरीं विराजे । चमके हिरकणि बोटिं किती ॥
झोंकदार त्या मिशा पहाहो । गोड कितिक दिसती ।
भिगबाळीचा झोंक पाहुनी । नारि मनामधिं किती झुरती ॥
मरगचीचें जाकिट विलसे । खुले कोट हा त्या वरती ।
सुवर्ण छेडा झळके फळके । संपत्तीला नच गणती ॥ धन्य ॥१॥

**हिराभाई**—वा: खुप बहार केलीत सुंद्राजी.

**अप्पा**—अं, तुह्मी केव्हां आलांत शेटजी ?

**हिराभाई**—मी मघांच आलों आहे साहेब. मी परवां कळविलें त्याची झाली खातरी?

**विसाजी**—फार बहार करतात बोवा!

**अप्पा**—ही चीज तर खूपच शोधून काढलीत. कविता तुमचीच असेल.

**सुंद्राजी**—जी, जसे आले तसे दोन शब्द जुळवून सेवेला हजर केले आहेत.

**बापू**—तुम्ही अगदीं गाण्यांत अप्पासाहेबांचा फोटोग्राफ काढलांत. फार चतुर आहांत!

**अप्पा**—हें घ्या तुह्माला बक्षीस. ( शंभर रुपयांची नोट देतो. ) कां खुपनां आतां ?

**सुंद्राजी**—( उठून सलाम करिते. ) मीं ह्मटलेंच आहे "संपत्तीला नच गणती" आह्मांसारख्यांचा अशा शौकी गृहस्थां खेरीज कोण समाचार घेणार आहे? पण या काळांत शौकी गृहस्थच नाहीसे झाले आहेत.

**मैनाजी**—माझ्या दागिन्यांवर धाड आली होती. आतां कशा खिशांतून पटापट नोटा निघतील !

**अप्पा**—झालाना इतक्यांत सवतीमत्सर ? तुह्मांला आम्ही कांहीं कमी करीत नाहीं ह्मणून बरें. तें असो, पण-( एकीकडे हिराभाईला ) मग त्याचें काय झालें शेटजी?

**हिराभाई**—तयारी आहे. ( पुडकें त्याच्याजवळ देतो. ) त्याला काय उशीर !

**अप्पा**--( पुडकें खिशांत घालून ) तुमच्या सारख्यांची मदत असल्यावर काय कमी पडणार आहे?

**बापू**—वेल, अप्पासाहेब, आपला घसा अगदीं कोरडा पडला बोवा.

**अप्पा**—माम्या, सुभेदार काय ह्मणतात तें ऐकू येत नाहीं का?

**बापू**—चला त्या खोलींत. ( खोलींत जातात व तेथें बुचें उडतात. )

**अप्पा**—( खोलींत ) –बापू–आणखी एक घे किरे.

**बापू**—अय्या! ( ढेकर देतो. ) नको आतां इनफ.

**अप्पा**—मामा, ओत त्याच्या घशांत, पहातोस काय ?

**बापू**—बरें बोवा मीच घेतों.

**अप्पा**—माम्या, मरायचें आहे वाटतें. अरे बाटली पालथी आली ना ? माम्या, ते मार्तंडराव कां मागें मागें करितात ? ओत त्यांना पुढें.

**मार्तंडराव**—मला इतका आग्रह नको आहे, मीच घेतों.

**अप्पा**—भाऊसाहेब–असा आमच्या पाहुणचाराचा अनादर करूं नये.

**भाऊ**—मीं घेतलें थोडेसें. मला आतां बेटें वयाच्या मानानें फारसें सोसत नाहीं. मला नको बोवा आग्रह करूं.

**बापू**—घ्या, तुह्मी मंडळी घ्या. डाक्टर, मास्तर? (ते घेतात)

**आप्पा**—चला आतां ( मंडळी फ्रुट खाते व रुमालांनीं तोंडें पुशीत पुशीत बाहेर येते. ) हं सुंद्राजी चालूंद्या आतां. पण आधीं मामा मोतियाचे गजरे सगळ्यांनां वाटा ?

**मामा**—जशी आज्ञा. ( गजरे वाटतो. ) हं, बापू तुह्मी आ-

पलें काम बजावा. तुह्मीं घातले पाहिजेत देवाला आज हार आणखी गजरे.

**बापू**—तुह्मी करा तें काम उभे आहांत तें.

**आप्पा**—तें नाहीं बोवा चालावयाचें सुभेदारसाहेब. तुमची गोल्डन नाईट आहे आज, तुम्हींच तें कृत्य केलें पाहिजे.

**बापू**—बरें बोवा मी बजावतों कामगिरी. ( तो सुंद्राजीच्या गळ्यांत हार घालतो हातांत गजरे घालतो, अत्तर गुलाब देतो. )

**मास्तर**—आ-आतां ही म-माळ घातली ब-बरं का सुंद्राजी तुमच्या गळ्यांत बापूसाहेबांनीं !

**बापू**—वेल् उगीच रहा तुह्मी मास्तर.

**मामा**—सु-सुंद्राजी उ-उठा बापूला सलाम करा ?

**सुंद्राजी**—जी. ( उठून सलाम करिते ) सेवा चाकरीला हजर आहे ही दासी.

**मार्तंड**—या-या, आ—तां रा-रावसाहेबांच्या गा गांवीं. सेवा चाकरीला आलें पा-पाहिजे तुह्मी सु-सुंद्राजी.

**बापू**—किती चावट अहांत हो तुह्मी. वेल् गो आन्.

**सुंद्राजी**— ( मान हालविते. )

प्लीज किती मी झालें माय डियर ।
देऊं नका मज दूर लोटुनी ॥ ध्रु ॥
फेतफुल राहिन अनुदिन सखया ।
तनमन तुजला नित्य वाहुनी ॥ १ ॥
सरव्हिस घ्यावी जवळुनि माझ्या ।
लव्ह मज वरती पूर्ण ठेउनी ॥ प्लीज ॥ २ ॥

**आप्पा**—ओहो ! व्हेरिगुड. फार गोड गायलीत बोवा ही चीज.

**बापू**—फार फार बहार केलीत बोवा तुह्मीं सुंद्राजी.

**अप्पा**—वेल् बापू तुह्मांला त्या रावसाहेबांची आणखी गंमत समजली का ?

**बापू**—काय, काय ती—

**अप्पा**—त्याला तुमच्या गांवीं तुमच्याच हाताखालीं फड-णीस नेमिला आहे.

**बापू**—वा: वा: फारफार बहार झाली बोवा ! येऊद्या आतां माझ्या तावडींत ते राजश्री याविराजीत! चला एक उत्तम चीज ह्मणा आं आणखी पुरे करा सुंद्राजी.

**सुंद्राजी**—जी.ह्मणते -

## ठुंबरी.

शोच समुजानादनु, पियारे, आपकहो फिर सोनाक्यारे ॥ ध्रु ॥
जिसनगरींमे न्याय धरमनहि, उसनगरींमे रहनाक्यारे ॥१॥ शोच॥

**मंडळी**—फार फार वहार झाली. वा: खूप ! शाबास, क्याबातहै !

**आप्पा**—माम्या, गाडी जोडावयाला सांग. मला आतांच्या आतां त्या तेथें गेलेंच पाहिजे. (सुंद्राजीला) सुंद्राजी हें घ्या तुह्माला आणखी बक्षीस. (शंभर रुपयांची नोट देतो.) आम्ही येतों आतां. माम्या, सुंद्राजीनां अन् मैनाजीना गाडीकरून घरीं पोहोंचवा.

(मंडळी उठते)

**सुंद्राजी**—(सगळ्यांना सलाम करिते) आतां आमच्यावर सगळ्या मंडळीचा दयालोभ असावा व अशीच सेवा चाकरी घेत जावी.

(जातात.)

---

# अंक ३ रा

## प्रवेश २ रा

स्थळ—उंबरगांव, बापूसाहेबाचा वाडा.

### ठकू.

**ठकू**—(गळपट्टा विणते आहे. आपल्याशींच.) हे इतके दिवस उद्योग करितां करितां एकदांचे मला सुखाचे दिवस दिसले. पण

बाबांचीं पत्रें येतातच आहेत कीं आणखी कांहीं कर्जाऊ रुपये द्यायचे आहेत, तेव्हां हुंडी करून पाठवून द्या. आतां हे रुपये आणावें कुठले? मागले आजून रुपये त्या मारवाड्याचे द्यायचे आहेत ते हका मारीत पडलेच आहेत. मला सगळीं स्वप्नं पडत आहेत! सगळ्या शेवटीं या माझ्या दागिन्यांवर धाड यायची आहे. मी कांहीं ह्मणून माझ्या एका तनूसडीला हात लाऊं द्यायची नाहीं. मग काय व्हायचें असेल तें होवो!

(सखूजी पाटील येतात.)

**सखूजी**—बाईसाहेब, मुजरा येतोया या पाटलाचा.

**ठकू**—कोण, पाटील? बसा त्या जाजमावर. आज फार दिवसांनीं रस्ता चुकलांत? तुह्मी ती दुधाकरितां ह्मैस दिलीत कीं नाहीं ती मुळींच दूध देईनाशी झाली आहे. कोण आहेरे रामजी? त्या रावजी फडणीसाच्या यमनाबाईला ह्मणावं आतांच्या आतां तुला बाइसाहेबांनीं बोलाविलें आहे.—तेव्हां पाटील ती आपली ह्मैस घेऊन जा कशी.

**रामजी**—जी बाईसाब, आतां आणतों त्या बाईसनीं बोलाऊन.

(जातो.)

**पाटील**—बाईसाब, हा सखूजी पाटील एकचशी काय पण चार ह्मशी बांधणार ग्वाळ्यामंदी.

**ठकू**—उद्यां सकाळीं चांगल्या दुभत्या दोन ह्मशी आणल्या पाहिजेत तर खरं ह्मणेन हें सगळं तुमचं गोड बोलणं.

(यमुना येते.)

**यमुना**—आज अगदीं इतकं जरूरीचंचसं बोलावणं आलं?

**ठकू**—तुह्माला सांगितलं होतं नां कीं रोज दुपारच्या येत जा ह्मणून; पण मुद्दाम यायचं नाहीं. शिपायी आले पाहिजेत बोलवावयाला रोजच्या रोज. ठेवले आहेत रोजचे शिपायी बोलावणं यायला! दिमाखच भारी!

**यमुना**—ठकूबाई, आज पांच साहा दिवस झाले गोप्याची किनयी फार प्रकृति बिघडली आहे. ताप कांहीं त्याला सोडीत

नाहीं. घामाचं टिपूस नाहीं, त्याच्या अंगाची अतिशय तलखी होत असते. ह्मणून रोज दुपारचं त्याच्या जवळ बसावं लागतं. काय करावं. नाहीं तर मी रोज यायची. घरी बसायचं तें इथें.

**ठकू**—पण काल दुपारीं आलां नाहींत ह्मणून रात्रीं डोळाचं वरण अन् खडे मिसळलेला भात खावा लागलाना आह्मांसर्वांनां ? मीं ह्मटलं होतं तुह्मी याल अन् तेवढे तांदुळ अन् डाळ निवडून द्याल, पण तुमच्या आपल्या नेहेमींच्या बारा बयादी आहेतच. आज काय गोप्या अजारी उद्यां काय काटा बोंचला परवां काय यजमानांना शेंबूड जास्त आला ! घ्या तो पाट अन् निवडा तेवढे तांदूळ अन् डाळ.

**यमुना**—( पुटपुटत ) काय बाई ही बायको फारच शेफारून गेली आहे. हिच्या काय बरं घरची मी मोलकरीण लागून गेलें आहे. काढूं कां हिची आतां खरड ? पण नको, हे दिवस असे कठीण आले आहेत तेव्हां तोंडाला कुलूप घातलं पाहिजे.

**ठकू**—कायहो पुटपुटत उभ्या राहिला आहांत यमुनाबाई ? कांहीं तरी मेली तरतरी असावी माणसाच्या अंगांत. डाळ तांदूळ निवडायला सांगितले, राहिली आपली बायको उभी कांहीं तरी पुटपुटत. पोशा बायका कुठल्या !

**यमुना**—बाईसाहेब, आमच्या वडिलांनीं अह्माला तरतरी शिकविलीच नसली तर कोठून येणार ? असले कठोर शब्द सहन करून घेणारी मी बायको नाहीं. होऊं द्या आपणांला दोन मुलंबाळं म्हणजे समजेल संसाराचं सूख !

**ठकू**—मला नाहीं व्हायचीं मुलबाळं, उगीच खायाला काळ अन् भुईला भार ! घ्या तो पाठ अन् ती डाळ.

**यमुना**— आपणाला असं कळतं तेव्हां आपण देवच आहांत ह्मणायच्या. ( पाट घेऊन डाळ निवडूं लागते. ) मला हे असे खालीं पहाण्याचे दिवस यावे अं !

**पाटील**— ( आपल्याशीं ) या बयाला फार वाकवलीया या बाईसाबांनीं; पण बाई असापती असाप !

**ठकू**— काय पाटील, यंदा पीकपाणी कसं आहे ?

**पाटील**— आहे आपलं बाईसाब सुमाराचं.

**ठकू**— तुमच्या तोंडांतून कधीं यायचंच नाहीं पीकपाणी चांगलं आहे म्हणून. उद्यां आमच्या घरीं दोन पल्ले बाजरी अन् चार पल्ले हरबरे आणून टाकले पाहिजेत तुम्हीं.

**यमुना**— ( मनांत ) बाई, येवढ्या गोष्टी मात्र करायची तुला बुद्धि होऊं देऊं नकोस.

**पाटील**— बयासाब, यंदा हरबरा नाहीं नीटसा आला, बाजरी तर अक्शी बुडालीच बगा.

**ठकू**— तें सगळं ठाऊक आहे मला. सांगीतलं तें केलं पाहिजे. अहो, आम्ही कांहीं फुकट का मागतों आहोंत ? हाताला आले म्हणजे तुमचे पैसे देऊन टाकयचे कळलं. इतके अधीर होऊं नका.

**पाटील**— बाईसाब, रावसायबापुढं माझा योक वयवाटीचा खटला चाललाया. माझी समदी जमीन जातिया बगा.

( यमाजी माळी येतो. )

**यमाजी**— बयासाब, मळ्यामंदी बाईच ऊस लावला व्हता त्यांतली चार कांडीं आणलीं हयतीं. ( उसाची मोळी भिंतीशीं उभी करितो. )

**ठकू**— अहारे मेल्या हिमट्या, या मोळीवरच का आमची समजूत करायची ! दोन काकवीच्या घागरी अन् पल्लाभर गूळ तर खरा !

**यमुना**—बाई, नाहींहो हे प्रकार चांगले, असं कधीं दिखील मनांत आणूं नका.

**ठकू**—तुझी खालीं पाहून आपलं काम करा. तुझाला कशाला पाहिजेत ह्या उठाठेवी. काय बाई लहाना तोंडीं मोठा घास घ्यायची संवयच पडून गेली असते कांहीं माणसांना !

**यमुना**—मला जें बरं वाटलं तें बोललें.

**ठकू**—बरं आहे, चांगलं बोललांत. आह्मांला कांहीं यांच्या जवळून ह्या जिनसा फुकट का मागायच्या आहेत? मेला माण-

साला विनोद समजत नाहीं तें काय माणूस ? राहूंद्या ती डाळ, घरांतलं तेवढं ताक करा ना?

**यमुना**—मला किं नाहीं खचित आज लौकर घरीं गेलं पाहिजे.

**ठकू**—घरीं लौकर जायचंच आहे. तेवढं ताक करा, दोन घागरी गोड्या पाण्याच्या आणा, चार घागरी तेवढं विहिरीचं खारं पाणी ओढून द्या, मग हे तांदूळ निवडा, अन् मग जाऊं द्या बाईसाहेबांची धिंडका, कळलं का ? तुह्मी जर आह्माला मदत केली नाहीं तर मी जवळ सांगून रावजीच्या चाकरीवर पाणी आणवीन सांगतें आहे.

**यमुना**—( संतापून ) आपल्या हातीं काय जें असेल तें खुःशाल करून घ्या पण आम्हाला रोज रोज हा जाच नको. जेव्हां पहावं तेव्हां मी हें करीन, मी तें करीन. ( हळूच ) दोन दिवस आला आहे अधिकार, इतक्या शेफारून जाऊं नका. ( रागानें घरांत ताक करायला जाते ).

**पाटील**—( हळूच ) बाई तुझ्या नरम स्वभावापुढें हद्द हयी. आमच्या सारख्यांच्या बायकांनीं तर असं घटीभर नसतं सहन क्येलं. ( मोठ्यानें ) बयासाब माझी रावसायबाप वर्दी लावली पाहिजे.

**ठकू**—पाटील आमचं एक काम कराल तर सांगतें. आम्हाला एक दहा विसा उसन्या पाहिजेत. हाताला सवड झाली कीं पोहोंचत्या करूं.

( यमुना येते )

**यमुना**—झालं ताक ठकूबाई. आतां हे तांदूळ निवडतें अन् जातेंच घरीं. गोप्यानें रडून गोंधळ केला असेल.

**ठकू**—कायहो पाटील मागल्या रावसाहेबांची रगडून पोट-पूजा करीत होतां नाहो ?

**यमुना**—सगळं शिवनिर्माल्य होतं. आह्मीं नाहींग बाई अशीं कोणापुढें तोंड वेंगलीं, कुणाला घरचा उंबरठा चढूं दिला नाहीं.

**पाटील**—बाई साब, या बयासाब ह्मनूल्यात त्येच खरं. उगाच कोणाच्या नावांत भलतंच बोललं तर लयी पाप लागतं. त्येंच्या पुढें कुणीं नांव काढलं कीं लयी रागावत, ह्मनत कीं घरांत पुन्हां पायी ठेऊं नको. या कामामंदीं अक्शी रागीट बगा.

**ठकू**—हो हो ठाऊक आहे आह्मांला, ऊगीच प्रतिष्ठा नकोत. उगीच कोणीं पोकळ फुशारक्या सांगितलेल्या मी नाहीं ऐकून घ्यायची.

**यमुना**—मीं जरी कित्ती सांगितलं तरी खरं नाहींच वाटायचं. कसं निर्मळ वर्तन होतं हें एक त्या देवालाच ठाऊक. त्याच्या दरबारीं पापापुण्याचे सगळे निवाडे आहेत.

**ठकू**—पुरे झाले तुमचे वेदांत. अशी देव जर सगळ्यांची कृती पहाता, सगळ्यांचे निवाडे करीत बसता, अन् त्यांच्या मनानं जर आपले पतिराज निर्दोष ठरते तर मग कशाला झाले असते सुभेदाराचे फडणीस ? तें कांहीं येक नाहीं. सगळं आपलं उगीच कांहींतरी थोतांड आहे झालं. पण आपणांला काय त्याचं ? कोण कसं होतं अन् कोण कसं नव्हतं याबद्दल वितंडवाद करून मला काय करायचं आहे ? पाटील, जा आतां तुह्मी. मग मीं गोष्ट काढली त्याचं काय झालं ?

**पाटील**—बयासाब मी गरीब माणूस. इतक न्हायती. कर्जाऊ झालं ह्मणून काय झालं ? माझ्या त्या वादाबद्दल रावसायबाप—

**ठकू**—जा, माझ्या घरीं पाऊल घालूं नका उद्यांपासून. आम्हा बायकांना हो काय कळतं ? खबरदार कचेरींतल्या गोष्टी मजजवळ येऊन सांगत बसाल तर ! जा उठा येथून. कधीं कोणाच्या तन्सडीला तरी शिवणं होतं आहे का ?

**पाटील**—बाईसाब मी येतों फिरून रावसाब आल म्हंजी.

( पाटील जातो. )

**यमुना**—मी येतें आतां ठकूबाई. झाले हे तांदूळ निवडणं. ( जातां जातां ) फार चांगलं केलत त्या हलकट माणसाला धुडकाऊन लावलंत तें. अस्साच विचार नेहमीं मनांत ठेविला पाहिजे.

मोठं कठीण असतं हो तें. ही सुभेदारीची चाकरी ह्मणजे ठकूबाई फार फार कठीण. फार जपून वागावं लागतं. बाई त्या देवाची भीती बाळगली पाहिजे. कोणचीही अनीतीची गोष्ट माणसानं पाहिली नाहीं तरी तो परमात्मा हज्जार डोळ्यांनं पहात असतो. या जन्मांत केलेल्या पापाचीं फळें याच जन्मांत भोगावीं लागतात, हें कांहीं कधीं खोटं व्हायचं नाहीं. देवाला भिऊन वागणारावर दिखील अनेक दुःखाचे प्रसंग यायला चुकत नाहींत. आपणांला देवानं दोन दिवस सुखाचे दाखविले आहेत त्यांचा दुरुपयोग अगदीं करूं नका. 'जो चढें तो पडे' हें नेहेमीं ध्यानांत ठेवा. या मीं दोन अडाणीपणाच्या गोष्टी सांगितल्या आहेत त्या लक्षांत ठेवाच.

**ठकू**—किती लुबरेपणा करतां हो ? माझ्या बाबतींत तुह्मांला कुणीं मध्यें तोंड घालायला सांगितलें आहे ? हे सगळे धादांत आपल्या नवरोजीजवळ बसा सांगत. कोण तरी बायको लघळ आहे हो ? जा, जाऊं द्या एकदांची धिंडका.

**यमुना**—मला दोन शिव्या जरी दिल्यात ठकूबाई, तरी मला कांहीं एक वाटणार नाहीं. मला जें बरं दिसलं तें मीं सांगितलं.

( जाते. )

( मार्तंडराव येतो. )

**ठकू**— शहाणपणाची मोठी घमंड या बाईला. थांबतर खरी तुझं शहाणपण बाहेर काढतें कसं तें. !

**मार्तंड**— बाईसाहेब, कोण काय बोललं ?

**ठकू**— अहो ही यमनाबाई, त्या रावजी फडणिसाची.

**मार्तंड**— ती तशीच आहे. हे मी रुपये आणले आहेत हे ठेवायचे.

**ठकू**— होका? किती आहेत ते ? आज कांहीं म्हटलं असत. पगाराचा दिवस नाहीं.

**मार्तंड**— त्या इनामदाराकडून आणिवले आहेत कर्जाऊ.

**ठकू**— बरं झालं बाई मिळाले एकदाचे कर्जाऊ रुपये. उद

आतां पुण्यास पाठवितें. मार्तंडराव, त्या मोठ्या खटल्याचं काय झालं हो आज? काय बाई त्या खटल्यांत मेहनत केली आहे आठ दिवस एकसारखं फाइंडिंग चाललं होतं. हें बूक उलथं कर तें बूक वाच. किती तरी बाई बुकांतलीं पानं लिहिलीं आहेत त्या ठरावांत!

**मार्तंड**—आज कचेरींत जेव्हां का ठराव वाचला रावसाहेबांनीं तेव्हां सगळे लोक आश्चर्यचकित झाले. पण त्या फडणीसाचं मात्र तोंड अगदीं उतरून गेलं होतं.

**ठकू**—कां तें? त्यांना जेलसी वाटली वाटतं? त्यांना ती विद्वत्ता पहावली नसेल? त्यांना काय कीं त्यांच्या त्या पट्टराणींना काय दुसऱ्याचं चांगलं सहनच व्हायचं नाहीं!

**मार्तंड**—या ठरावांत फडणिसांची खूप उडविली आहे. परिणाम कदाचित् भयंकरही होईल.

**ठकू**—अशीच त्यांची खोड मोडली पाहिजे. ती यमुना मोठ्या तोऱ्यानं माझ्या समोर बोलत होती, मोठे नाकानं कांदे सोलीत होती!

(बापूसाहेब येतो.)

**बापू**—(इझी चेयरवर पडतो.) शू:, काय त्रास झाला बोवा आज! त्या केशवरावाला चार महिने शिक्षा चोपली व पांचशे रुपये दंड ठोठावला!

**ठकू**—(त्याच्या कोटाचे बटन सोडते.) तें परवां फाइंडिंग चाललं होतं तोच नां खटला? काय केलं त्या केशानं? या खटल्यांत त्या फडणिसांची फजीती उडविली आहे म्हणून ऐकिलं.

**बापू**—तुम्हांला कोणी सांगितली ही खबर.

**ठकू**—हे मार्तंडराव आतां सांगत होते. ती यमुना मोठे मला आज उपदेश करीत होती व आपल्या पतिराजांच्या फुशारक्या मारीत होती!

**मार्तंड**—मी घेतो रजा साहेब. रुपये दिले बाईसाहेबांजवळ.

**बापू**—बरें आहे. बडेसाहेबांची स्वारी यायची आहे एकदान

दिवसांत या तालुक्यांत, तेव्हां सगळी नीट तजवीज ठेविली पाहिजे. थोडी अंग मोडून मेहनत करा.

**मार्तंड**—जी. करितो साहेब.

( मार्तंड जातो. )

**ठकू**— काय केलं त्या फडणिसानं ?

**बापू**— सगळं येईल हळूहळू बाहेर. चला आतां थोडीशी टिफीन द्या कीं जाऊं बाहेर टांगा जोडून फिरावयाला. काय म्हणत होती ती यमुनाबाई ?

**ठकू**— काय मेलं तें सांगायचं ? मीं त्या पाटलाला म्हटलं कीं चार पल्ले हरवरे व दोन पल्ले बाजरी पाठवा, तेव्हां लागल्या बयासहेब उपदेश करायला कीं हें चागलं नाहीं हो बाई !

**बापू**—तिनें काय वावगें सांगितलें ? अशी नजर कधींही ठेवूं नये हेंच चांगलें. याच का तुह्मी शहाण्या शहाण्या त्या ? हें-नाहीं बोवा आपणाला अगदीं पसंत.

**ठकू**—पण माझं सगळं ऐकायचं तर खरं. माझ्या तोंडांतून शब्द निघाला कीं त्याचा एकदम निकाल होतो. मीं कांहीं हें फुकट नाहीं मागीतलं त्याच्या जवळ! पैसे पाठवून देईन ह्मणून सांगितलं त्याला. मला अगदीं वेड नाहीं लागलं कांहीं !

**बापू**—मग हरकत नाहीं. कोणाच्या तनूसडीला शिवावयाचें नाहीं हा माझा कृतनिश्चय आहे. आतां कर्जाऊ रुपये मागावे लागतात ते मागणें सुद्धां गैर आहे. पण काय करावें. ( फराळ करतो. )

**ठकू**—बरं आहे. मी पण कोठें आहे अपल्या विचाराच्या बाहेर.

**बापू**—चला आतां. घटकाभर फिरून येऊं.

( ते जातात. )

---

# अंक ३ रा.

## प्रवेश ३ रा.

स्थल—उंबरगांव.

( रावसाहेब, गोपाळ व यमुना. )

**रावसाहेब**—(ओसरीवर एका जाजमावर सचिंत बसतात.) मला जी भीति होती त्याप्रमाणें या बापूसाहेबानें माझा छळ मांडलाच. मी सुभेदारीच्या जाग्यावर होतों तेव्हां या बापूला कधींही एका शब्दानें सुद्धां दुखविलें नाहीं, त्याला हवें तसें वागूं दिलें, त्याला काम शिकविलें. किती त्याच्या चुक्यांवर पांघरूण घातलें. तोच बापू आज मजवर सर्पासारखा चवताळून उठला अं! माझे सर्व उपकार विसरला, अन् आज कचेरींत हवी तशी त्याणें मजवर आग पाखडली अं! तो इतके दिवस माझे पदोपदीं अपमान करीत असे ते मीं कालावर लक्ष देऊन निमुटपणें सोशिले, त्याची बायको ठकू ही माझ्या या इला आपल्या घरीं बोलावून तिजकडून हवे ते काबाडकष्ट करून घेते त्याबद्दलही मी आजपर्यंत स्तब्ध राहिलों. पण आज या बापूनें माझ्या एका मागल्या मोकदम्याच्या संबंधानें हवीं तशीं वेडींवांकडीं खोटीं अनुमानें काढून तीं त्या फाइंडिंगांत गोंवलीं अं! ज्याचें अंतःकरण काळें त्याला सगळें जग काळें दिसत असतें. माझ्यावर लांच घेतल्याचा संशय! अन् त्याला कारण काय तर त्या खटल्यांत मीं स्वतः फिर्यादीला उलट सवाल केले अन् खटला मुद्दाम लांबणीवर टाकिला. मीं परमेश्वराला भिऊन काम केलें आहे. कोणाच्या एका तन्सडीला सुद्धां मिंधा राहिलों नाहीं. यःकश्चित् मळ्यांतली भाजी कोणीं आणून दिली तर तिला देखिल शिवलों नाहीं. अशा प्रकारची कडकपणाची वर्तणूक मीं नेहमीं ठेविली असतां ज्या हातानें मजविषयीं तसले आरोप त्या फाइंडिंगांत लिहीले असतील त्याचीं बोटेंच झडून जातील. देवासमोर जर माझें वर्तन चोख, निर्मळ आहे तर कोणीं

कितीही शंख केला तरी त्याची मी कधींही पर्वा करणार नाहीं.

( पडद्याच्या आंतून. )

**गोप्या**—आईग, आतां कसंग करूं मी, माझ्या अंगाची तलखी झाली ग, आई.

**यमुना**—अहो, हा पहाहो कसं करतो आहे तो. गोप्या, असं रे बाळा काय करावं ? ( पडदा उघडतो. )

( रावसाहेब आंत जातो. )

**रावसाहेब**—गोप्याला आज पुनः ताप भरला वाटतें.

**यमुना**—अतिशय ताप भरला आहे. तोंडाला कोरड पडली आहे, अगदीं तगमग करितो आहे.

**रावसाहेब**—( त्याला मांडीवर घेऊन ) गोपाळ, ताप लौकर बरा होईल अं, अंमळ स्वस्थ पडून रहा. कोण आहेरे गेनू, त्या वैद्यबोवांना बोलावून आण जा लौकर.

**गोप्या**—आईग, मला पाणी दे बस प्यायला. देतेस कीं नाहीं ? देगं थोडं, एक घोंटभर आई !

**यमुना**—गोपाळ, तापांत कसं बरं बाळा पाणी द्यावं प्यायला. ये मजजवळ. ( ती त्याला घेते. )

**गोप्या**—मी नाहीं जा तुझें ऐकणार. दे, दे बस, एक घोंट दे. आः, माझा घसा कोरडा पडला. ( तगमग करतो. )

**यमुना**—बाळा थोडी भाजलेली खारीक देऊं का खायला ? माझं बाळ तें, असा काय बरं अगदीं हट्ट धरून बसावा? ( त्याच्या तोंडावरून हात फिरविते ) तूं शहाणाना, मग असं काय बरं करतोस !

**गोप्या**—आतां मला पाण्याशिवाय मारून तरी टाक. आई, ( मोठ्यानें ) दे, दे! मला पाणी ( मोठ्यानें ) पाणी !! ( गडबडा लोळतो. )

**रावसा०**— ( थोड्या रागानें ) असें काय करावें, स्वस्थ पड. खबरदार कोणीं पाणी मागितलें तर.

**यमुना**—त्याला किनयी असं रागं भरूं नये, त्या पोराचा

तरी काय उपाय. ( जवळ घेऊन ) हे बघ ( त्याच्या हनुवटीला हात लाविते. ) थोडा तुला घाम आला ह्मणजे पाणी देईन अं. ( गोप्या डोळे पांढरे करितो व बेशुद्ध होतो. ) अहो, हें पहा हा कसं करतो तो! ( त्याचे डोळे दाबते ) रामा, देवा, धांव आतां! ( रडते ) माझ्या छोनुकल्या असं काय बरं करावं ? डोळे उघड पाहूं, छेः ! प्रसंग मोठा कठीण आहे. !

( वैद्य येतो. )

**रावसा०**—वैद्यबोवा, आमच्या गोप्याची प्रकृति आज फार बिघडली आहे हो.

**वैद्य**—घाबरूं नका, भिऊं नका, ( त्याची नाडी पहातो. ) हं, आलें लक्षांत, थोडा आल्याचा रस आणा पाहूं, सहाण आणा.

**रावसा०**— ( आल्याचा रस व सहाण आणतात, वैद्य मात्रा उगाळतो ) पाण्याकरितां कंठशोष केलान् अगदीं.

**वैद्य**— ( त्याला मात्रा चाटवितो ) कांहीं चिंता नाहीं, सगळी लागेल व्यवस्था, भिऊन काय होतें. याच्या तापाला आज दिवस कितवा ?

**यमुना**—आजचा हा दहावा दिवस. हो, दहावाच. आज आठ दिवस घामाचं एक टिपूस कसं तें नाहीं.

**वैद्य**—येईल, आज घाम येईल. माझा काढान् गोळी आपलें काम केल्याखेरीज राहणार नाहीं. ( गोप्याची नाडी पाहतो. ) येईल आतां शुद्धीवर. देव याला बरा करील. आज त्या केदारेश्वराच्या देवळांत त्या रामभटजीला थोडें अनुष्ठान करावयास सांगितलें पाहिजे. महादेवावर सतत धार धरली ह्मणजे याला घाम येईल.

**रावसा०**—बरें आहे, सांगतों त्यांना.

**गोप्या**— ( डोळे उघडतो ) आईग, मला पाणी. थोडं, अगदीं थोडं दे.

**वैद्य**—हा वेड्या, असें आईबापांना घाबरवावें कां कोठें ? ( त्याच्या गळ्याशीं हात नेतो ) हें पाहिलें का रावसाहेब, याला

घामाचे तुषार येऊं लागले. आमच्या गांवचा केदारेश्वर नुसत्या स्मरणानें हो पावतो. फार जागृत दैवत आहे.

**यमुना**—पाहूं पाहूं ? ( त्याच्या डोक्याला हात लावते. ) हो गडे, घाम येऊं लागला बरं. जय आई, माझं एवढं बाळ या दुखण्यांतून उठूं दे मी सोळा सोमवार करीन. बाळ थोडं पांघरूण डोक्यावर घे ह्मणजे बघ कसा चरचरून घाम येईल तो. माझं बाळ शहाणं आहे. ( त्याच्या डोक्यावरून पांघरूण घालते.)

**वैद्य**—हें पहा बाई, थोड्या साळीच्या लाह्या आहेत का घरांत ?

**यमुना**—हो, आहेत. त्यांचं काय करायचं ?

**वैद्य**—थोड्या साळीच्या लाह्या आच्छेर पाण्यांत घाला. त्यांत थोड्या लवंगा, एक तुळशीची मंजिरी घालून तें पाणी आटवा, अन् थोडथोडें पाणी याला प्यायला द्या. गोप्या, थोडा स्वस्थ पडून रहा ह्मणजे तुला पाणी देववितों अं.

**गोप्या**—बरं, पण मला पुष्कळ पाणी पाहिजे.

**यमुना**—देईन अं बाळ. लहान मुलांचं कांहीं कळून येत नाहीं. ( पांघरुणांत हात घालते ) पुष्कळ घाम आला बरं, पाठीला, पोटाला, चोहींकडे.

**वैद्य**—आतां होईल मोकळा; पण याला फार जपलें पाहिजे. वायूला फार भ्यालें पाहिजे.

**रावसा०**—एक त्या देवावर भरंवसा ठेविला कीं तो सर्व संकटांतून तारतो.

**वैद्य**—आज कचेरीला नाहीं जावयाचें वाटतें. ( तपकीर ओढतो. )

**रावसा०**—हो जायचें आहे. हा गोप्या घरांत असा आजारी, ही घरांत एकटी, हिचे महिने भरले आहेत. संकटें कशीं चोहींकडून ओढवलीं आहेत !

**वैद्य**—केदारेश्वरराज सर्व संकटांतून पार पाडील, काळजी करूं नये. आज आपण कचेरीची रजाच घ्यावी.

**रावसा०**—तें कां एक लचांड आहे ? तो बापूसाहेब रजा देखील देणार नाहीं.

( रामाजीपंत इनामदार, जमादार, आणि मार्तंडराव येतात )

**इनाम०**—हीच आमची असामी जमादार साहेब, बजावा आतां आपली कामगिरी.

**रावसा०**—का जमादार, इतक्या लगबगींनेंसे ?

**जमादार**—सुभेदार साहेबांनीं आत्तांच्या आत्तां कचेरींत बोलाविलें आहे आपल्याला.

**रावसा०**—सुभेदार साहेबांना सांगा कीं, मुलगा घरीं आजारी आहे. मला आजच्या दिवसाची रजा पाहिजे.

**जमादार**—तें कांहीं एक मी ऐकणार नाहीं. मला हुकूम बजाविला पाहिजे.

**रावसा०**—कां ? आज वांकडेंसें बोलतां ? तुह्माला सांगितला हा निरोप कळवा जा त्यांना.

**जमादार**—मला कांहीं एक तें समजत नाहीं. मजबरोबर आतांच्या आतां आलेंच पाहिजे.

**इनाम०**—जमादार, असा गुळमुळीतपणा काय कामाचा ? माझी तुमच्यावर फिर्याद आहे फौजदारींत रावसाहेब.

**जमादार**—तेव्हां हें धरण्याचें वारन्ट आणिलें आहे.

**रावसा०**—कोणावर? माझ्यावर फौजदारी ! मला धरण्याचें वारन्ट? काय मीं असा गुन्हा केला आहे? माझ्यावर वारन्ट !

**जमादार**—होय, तुमच्यावर वारन्ट. तुह्मी माझ्या ताब्यांत आहांत, चला माझ्याबरोबर.

**रावसा०**—बापूसाहेबांनीं माझ्यावर वारन्ट दिलें ? असा काय माझ्या हातून गुन्हा घडला आहे ? मजवर कोणाची फिर्याद आहे ?

**इनाम०**—तें सर्व कचेरींत कळेल. माझी फिर्याद आहे.

**रावसा०**—तुमचा माझा संबंध ? काय केलें मीं तुमचें ?

**मार्तंड०**—आह्माला या इथें बोलतां येत नाहीं. जामादार, या येथें आतां किती वेळ वाद घालीत बसावयाचें ? तुह्मांला सुभेदारसाहबांनीं हुकूम केल्याप्रमाणें तो अमलांत आणला पाहिजे. चला, खेंचा यांना पुढें.

( यमुना माजघरांतून धांवत येते. )

**यमुना**— मार्तंडराव, काय आहे गडबड ? काय तुमच्या रावसाहेबांनीं हुकूम केला आहे ?

**जमादार**— बाई, तुम्ही घरांत जा. तुमचें कांहीं एक काम नाहीं.

**रावसा०**—तूं जा घरांत; या हलकट लोकांचे तोंडीं लागून कांहीं एक उपयोग होणार नाहीं.

**इनाम०**— कोणाला म्हणतां हो हलकट ? तोंड संभाळून बोला; नाहीं तर अब्रूनुकसानी भरून द्यावी लागेल. जमादार, मार्तंडराव, तुम्ही साक्षी असा, यांणीं तोंडांतून आतां काय शब्द उच्चारले त्याबद्दल. रुपये घेण्याचे वेळीं गोड वाटलें. लांच घ्यायला पाहिजे लांच !

**यमुना**—कोणाचे रुपये ? कोणीं घेतले ? लांच अशीं अक्षरं इकडच्या विरुद्ध कोणा मेल्याच्यानं उच्चारावतील !

**मार्तंडराव**—बाई, तुह्मी बऱ्या बोलानं घरांत जा. तुमच्या यजमानांनीं लांच घेतला असें म्हणणें आहे, व त्याबद्दलच फिर्याद आहे.

**यमुना**—असं तोंडानं उच्चारणाराच्या तोंडाला किडे पडतील! मार्तंडराव, तुह्मी या आग पाखडणारांपैकीं एक असावेत, मोठा चमत्कार आहे ! तुम्हावर केलेले उपकार सर्व विसरलांत अं ! तुह्मी आणखी—धिःकार असो तुह्माला. हंः ! काय बाई मनुष्य झालं आहे तरी !

**रावसा०**—कां तूं इतकी कष्टी होतेस ? या सर्वांना माझा हवा तितका छळवाद करूं दे. मी कसा आहे अन् कसा नाहीं हें एक तो परमेश्वर जाणत असेल.

**गोप्या**—( आंतून ) आईग, मला पाणी! माझा घसा कोरडा पडलाग आई!

**यमुना**—आलें बाळा आलें हो! देवा, आह्मीं असे काय तुझे अपराध केले आहेत? कां आमचा असा छळवाद करितोस?

**रावसा०**—जा तूं आतां घरांत. तो गोपाळा तुला बोलावतो आहे, त्याला पाणी दे जा थोडें. पापापुण्याचे निवाडे एक त्या देवाचे घरीं सगळे आहेत. ( खिशांतली कार्ड काढून एक पत्र लिहितो, व गड्याजवळ पोष्टांत टाकावयास देतो. )

**जमादार**—चला व्हा पुढें रावसाहेब. ( त्याच्या हाताला धरूं लागतो. )

**रावसा०**—खबरदार, अंगाला हात लावूं नका. हा मी येण्याला तयार आहें. काय शिंची या गांवीं ही सगळी मोगलाई माजली आहे! घ्या औंट घटकेचे अधिकार भोगून. पण बापू, नाहीं रे हें तूं विचार करून काम करीत खचित. अखेरीस पस्तावशील. मी तर हवे ते प्रसंग मजवर गुदरले तरी देवावर हवाला ठेऊन ते भोगण्याला तयार आहें.

**इनाम०**—चला, आतां पांडित्य पुरे. गळ्यावर वारन्ट निघालें आहे तरी घमंड्या पहा!

**यमुना**—मेल्यांनो! कृतघ्नानो! तुमचं कधीं देव बरं करणार नाहीं. या तुमच्या पापाचीं फळं खचित तुह्मी भोगाल! असा प्रसग वैऱ्यावर सुद्धां येऊं नये.

(जातात.)

---

## अंक ४ था.

### प्रवेश १ ला.

स्थळ—बंगला.

बडासाहेब, व अप्पासाहेब.

**बडासाहेब**—अप्पा, त्या दादाची पूर्ण वस्तादगिरी आ-

मच्या लक्षांत आली. माझा आतां तुमच्याखेरीज कोणावर भरंवसा राहिला नाहीं. तुह्मीं आह्मांला आमच्या आफिसच्या कामांत मदत केली पाहिजे. मला हा सगळा दादाचा घोटाळा बाहेर काढावयाचा आहे.

**अप्पा**—त्याणें फार डाळ नासली आहे साहेब. तो आण्णासाहेब देखील दिसण्यांत साधा पण त्याणेंही कांहीं निराळी कृति आरंभिली आहे. कांहीं तरी गडबड आहे. हुजुरांत चौकशी सुरू आहे असा गांवांत फार बोभाटा आहे. ती चौकडी गाड्यांतून बसून संध्याकाळीं गांवाबाहेर जाते तों रात्रीचे एक एक दोन दोन वाजे पर्यंत घरीं येत नाहीं.

**वडासाहेब**—आह्मालाही याची बरीच खबर लागली आहे; पण ही चौकशी काय चालली आहे याचा कांहीं पत्ता लागत नाहीं. नाचूं द्या त्यांना हवें तितकें, दोन दिवस पोरें खेळताहेत, खेळूं द्या! आपणांला सर्व शिलकी कागदांचा निकाल लावलाच पाहिजे एक दोन दिवसांत. अप्पा, आह्मांला आतां घरीं रुपये पाठवावयाचे आहेत. कसेंही करा पण रुपये आणा सावकाराकडून.

**अप्पा**—बरें आहे, आणवितों. किती आणावयाचे?

**वडासाहेब**—निदान आठ हजार तरी पाहिजेत, कारण होमच्या व दुसऱ्या दोन तीन ठिकाणच्या मागण्या निकडीच्या आहेत.

(एक पारशी येतो.)

**पारशी**—सलाम साब.

**वडासाहेब**—वेल् माय पारशी फ्रेंड, बहुत सलाम. (त्याच्याशीं शेकह्यांड करतो.)

**पारशी**—साहेब, रुपयाची अमाला फार निकड आहे.

**वडासाहेब**—देईन तुमचे रुपये. असे घाबरतां कां?

**पारशी**—मंग अमाला मारगेज तरी करूनशी द्यावा साहेबांनीं.

**वडासाहेब**—बरें आहे. कागद आणा, मी आपलें सामान

देतों गहाण लाऊन. पण शेट, मला आणखी थोड्या रुपयांची गरज आहे.

**पारशी**—साहेब, आमी गरीब आहे. रुपये देण्याला आतां सकत नाहीं.

**वडासाहेब**—मी आपला सगळा बाग देतों लाऊन; कसेंही करा आणखी चार हजार तरी द्या.

**पारशी**—आमचा साहेब नाइलाज होतो. साहेबांसारख्यांनीं शब्द टाकावा तो आह्मीं ना कसा ह्मणावा ? आमची जात बामणांसारखी बेमुर्वत नाहीं, साहेब जाणतच आहेत. बरें, देतों आणखी रुपये, पण सामानाचें अन् बागेचें मारगेज पाहिजे साहेब.

**वडासाहेब**—बरें आहे, आमची तयारी आहे, उद्यां आणा कागद अन् रुपये.

**पारशी**—सहा हजाराचे बारा हजार ग्यारंटी मारगेज झाला पाहिजे.

**वडासाहेब**—तुम्हाला हवा तसा कागद देतों लिहून. तुह्मीं असा आह्मावर बेभरंवसा करूं नये. रुपये आतांच्या आतां पाठवून द्या ह्मणजे माझा मोठा उपयोग होईल.

**पारशी**—बरें, फार चांगलें. घेतों मी रजा. ( वड्यासाहेबांशीं शेकह्यांड करून जातो. )

**वडासाहेब**—हें एक बरेंच झालें. अप्पा तुमच्याकडले रुपये उद्यां आले कीं तें एक काम पार पडेल.

**अप्पा**—साहेब, अजूनही मीं रुपये आणलेच पाहिजेत ?

**वडासाहेब**—आह्माला ज्या वेळीं ज्या ठिकाणून जितके रुपये मिळतील त्या वेळीं तितके अगदीं जरूर पाहिजेत. मी कोणाची एक पै ठेवणार नाहीं. चला आतां आपल्या कामाला लागूं. हे दादाकडचे अभिप्राय या प्रकरणावर लिहून आले आहेत, हीं सर्व प्रकरणें नीट लक्ष लावून तयार केलीं पाहिजेत.

**अप्पा**—मी तें करतों सगळें काम.

**बडासाहेब**—पटेवाला, सोडावाटर आणा. दुसरी ती बाटली आण.

**पटेवाला**—जी साब, (तो धांवत धांवत येतो.) साब बाहेर एक गिरस्त आले आहेत.

**बडासाहेब**—बोलाव आंत. कोण आहे ?

( विसाजी येतो. )

**विसाजी**—मी आहें तो विसू.

**बडासाहेब**—वेल् विसाजी, पैसे आणले कीं नाहीं?

**विसाजी**—आणले आहेत.

**बडासाहेब**—किती? दोनहजार सांगितले होते.

**विसाजी**—पंध्राशेंच मोठ्या मिनतवारीनें मिळाले. ( नोटांचें पुडकें हातीं देतो. ) व्याज दोन रुपये शेंकडा मागतो सावकार.

**बडासाहेब**—फिकीर नाहीं, सावकार कोण ?

**विसाजी**—आहे एकजण भिक्षुक. हजार त्याचे व पांचशें माझ्या कुटुंबाच्या नांवावर ब्यांकेंत होते ते काढून आणले आहेत.

**बडासाहेब**—बरें आहे, या कर्जाबद्दलच्या गोष्टी बाहेर फुटतां अगदीं कामाच्या नाहींत. तोंडाला कुलूप घालून ठेवा. तुह्मी जा आतां.

**विसाजी**—त्याबद्दल साहेबांनीं अगदीं काळजी करूं नये.

( विसाजी जातो. )

**बडासाहेब**—झालें कीं नाहीं सर्व काम तयार अप्पा ?

**अप्पा**—यस सर, सगळें कंप्लीट झालें आहे. (कागद पुढें ठेवतो.)

**बडासाहेब**—( कागदावर सह्या करीत करीत ) अप्पा, ह्या मंडळीनें आमची हुरमत घेण्याचा विचार केला आहे. तो दादा माझ्याशीं गोड बोलतो, पण त्याचें फार खोल कारस्थान चाललें आहे. आमच्या कर्जबाजारीपणाबद्दल चौकशी अगदीं जारीनें सुरू आहे. आमच्यावर मोठे भयंकर आरोप आणण्याच्या खटपटी चालू आहेत.

**अप्पा**—गांवांत अशा दाट कंड्या आहेत कीं, आपल्या स-

गळ्या आफिसाची चौकशी व्हावयाची आहे. कोणी म्हणतात बाहेरून मंडळी रातोरात येऊन जबान्या देऊन जातात; अशा अनेक प्रकारच्या कंड्या आहेत.

**बडासाहेब**—आह्माला सगळ्या खबरा आहेत. आमचे आतां भरंवशाचे तुह्मीच आहांत, तेव्हां तुमच्याबद्दल मला कांहीं एक भीति नाहीं. पहा अप्पा, आजपर्यंतचीं तुमचीं वचनें खरीं करावयाचा हाच आतां वखत आहे. आमच्यावर आतां आकाश कोसळणार. हीं दुष्ट स्वप्नें आह्मांला आज बरेच दिवस पडत आहेत.

**अप्पा**—मी आपल्या वचनाला कधींही फिरणार नाहीं. माझ्यावर कितीही संकटें आलीं, मला कैद भोगावी लागली, माझ्या घरादाराचें वाटोळें झालें, फार तर काय पण माझी कोणीं मान जरी कापली तरी आपल्या एका केंसाला धक्का लागूं द्यावयाचा नाहीं, आपण मात्र या अप्पाला पूर्ण मदत केली पाहिजे.

**बडासाहेब**—ज्यांना आम्ही स्नेही ह्मणत होतों, ज्यांचें आह्मीं कल्याण केलें, ज्यांना आह्मीं प्रसंगीं सर्व प्रकारें मदत केली ते आमचे सर्व शत्रु बनले आहेत. अप्पा, फार फार खबरदारी ठेवा. या प्रसंगीं तुह्मावर सर्वस्वी भरंवसा ठेऊन आह्मी स्वस्थ बसतों.

**अप्पा**—साहेब फार फार चौकशी करतील तर येऊन जाऊन आपलें कर्जच बाहेर आणतील कीं नाहीं? त्यांत काय, पुष्कळांना कर्ज असतें, आपणांला भिण्याचें कांहीं एक कारण नाहीं.

**बडासाहेब**—आह्माला त्याबद्दल मोठीशी परवा आहे अशी गोष्ट नाहीं. पण—

(पट्टेवाला येतो.)

**पट्टेवाला**—एक साब भेटीला येतो ह्मणतात.

**बडासाहेब**—कोण?

**पट्टेवाला**—नांव नाहीं मला ठाऊक. ते ह्मणतात जरूर जरूर आह्माला भेट पाहिजे.

**बडासाहेब**—अप्पा, तुह्मी जा आतां. सांगितलेल्या गोष्टी

नीट लक्षांत असूं द्या. तुम्ही हुषार आहांतच. तुमच्यावर आमची सगळी भिस्त आहे. जा, आतां लौकर जा त्या मागल्या रस्त्यानें. ( अप्पा जातो. ) हा साहेब कोण असावा ? या वेळीं आमच्याकडे कशाला आला असेल बरें ?

( एक साहेब येतो. )

हं. हे राजश्री आले आहेत अं ! ( इझी चेयरवर पडतो. )

**साहेब**— मी आपल्याकडे कांहीं कामाकरितां आलों आहे.

**बडासाहेब**— ती खुर्ची घ्या. मी फार आजारी आहें दोन-तीन दिवस.

**साहेब**— आपली प्रकृति अस्वस्थ आहे ही खबर प्रतिनिधि-साहेबांना कळली आहे व त्यांना या बद्दल फार वाईट वाटतें आहे. आपणांला आतां कामाची दगदग उरकणार नाहीं म्हणून आपला आजार बरा होईपर्यंत त्यांनीं दोन दिवस आपल्या कामाचा चार्ज मला घेण्याला सांगितला आहे. आपण दोन दिवस आराम घ्यावा म्हणजे आपली तब्बेत ठीक होईल.

**बडासाहेब**—ओ माय ओल्ड फ्रेंड, या तुमच्या सांगण्यांत वजावाट किती करावयाची ती आम्हाला ठाऊक आहे समजलांत. सांगा आतां काय असेल तें. चोरतां कशाला ?

**साहेब**— हा प्रतिनिधि साहेबांचा ठराव. ( त्याच्याजवळ ठरावाचा कागद देतो. )

**बडासाहेब**— ( ठराव वाचतो. ) " प्रतिनिधी साहेबांचा दुसरा हुकूम होईपर्यंत बडेसाहेबांना चाकरीवरून सस्पिंड केलें आहे." वा:! फार चांगला ठराव.! आमची तयारी आहे. घ्या आमच्या कचेरीचा चार्ज. उत्तम, फार चांगलें ! ( पत्र लिहितो. ) हें पत्र आमचे हाताखालचे अण्णा यांना दाखवा, ते देतील सर्व चार्ज आपल्याला. ( पत्र देतो. )

**साहेब**— मी येतों तर.

( साहेब जातो )

**बडासाहेब**— यावें, सलाम ! आज आम्हीं इतकीं वर्षे

मोठ्या मेहेनतीचीं व अत्यंत बिकट कामें केलीं त्यांचें मला हें बक्षीस काय ? माझी हकीगत ऐकून घेतल्याखेरीज एकतर्फी चौकशी करून शेवटीं असला हा अप्रयोजक ठराव करणारांची मोठीच शहामत ह्मटली पाहिजे ! बरें आहे, या बड्यासाहेबाला अन् एकदम नोकरीवरून सस्पिंड करण्याचें तुह्मीं सर्व शहाण्यांनीं मनात आणिलेंत, मोठा चांगला विचार केलात. मी सर्वांना माझे माझे ह्मणत असतां अशी ही तुह्मीं माझ्या ज्ञातिबांधवांनीं आह्मावर एकदम आग पाखडलीत! वाः ! तुह्मीं आपल्या सदयतेची कमाल केलीत. ( कावराबावरा होऊन इकडेतिकडे फिरतो. )

( काका येतो. )

**काका**—साहेब, प्रसंग मोठा कठीण आहे. गांवांत एकसारखी धामधूम उडून गेली आहे. अप्पासाहेबांच्या घरावर जप्ती आणून त्यांच्या सगळ्या घराचा झाडा झाला, त्यांना धरून कैद केलें. मी धांवत धांवत आपणांला हें कळविण्याला आलों ?

**बडासाहेब**—काय, काय ह्मणतां ? अप्पाला पकडलें ? झाड्यांत काय सांपडलें ?

**काका**—अप्पासाहेब जों गाडींतून उतरतो तोंच त्याला पकडलें. झाड्यांत कांहीं एक सांपडलें नाहीं. तो कसला वस्ताद !

**बडासाहेब**—थ्यांक् यू. अप्पा, तुझ्यावरही हा प्रसंग आणलाना यांणीं ?

**काका**—दोन सुभेदार सस्पिंड केले.

**बडासाहेब**—कोण, कोणते ?

**काका**—बापूसाहेब एक. दुसऱ्याचें नांव अजून कळलें नाहीं. पण बहुतकरून विसाजीवर धाड पडली असेल. साहेब, आपण अगदीं भिऊं नका. प्रभु सगळें अरिष्ट टाळील. मी अनुष्ठानाला ब्राह्मण बसवितों.

**बडासाहेब**—तुमचे अन् अप्पाचे मजवर मोठे उपकार आहेत.

**काका**—साहेब, मी हे दोन रोखे आणिले आहेत. यांचे पैसे दिले तर माझा गळा मोकळा होईल.

**बडासाहेब**—यू स्टुपिड ब्रूट ! आह्मी कोणत्या प्रसंगांत आहोंत, अन् तुला या वेळीं पैसे सुचताहेत ! हो चालता येथून. सिपॉय, दे हांकून ह्या मूर्खाला येथून.

**काका**— ( जाऊं लागतो. ) साहेब, आपण किती जरी आम्हावर राग केलात तरी आह्मी कृतघ्न होणार नाहीं. ( जातो. )

**बडासाहेब**—( आपल्याशीं ) काय उपाय करावा आतां या गोष्टीला? माझा हुद्दा केवढा होता, माझा मानमरातब काय असे, मी अहोरात्र झटून आज इतकीं वर्षे माझ्या यजमानाची चाकरी अश्रांत श्रम करून बजावली, अनेक राज्यकारणांच्या प्रसंगीं योग्य सल्ले दिले, मोठे मी मी ह्मणविणार पण त्यांना देखील वेळ प्रसंगीं खालीं पाहण्यास लाविलें, माझ्या हितशत्रूंनीं मला गोत्यांत घालण्याचे मार्ग एक दोन वेळां उद्योग केले, त्यांतूनही मी निभावलों, अन् शेवटीं या माझ्या ह्मातारपणीं मजवर हा प्रसंग या मंडळींनीं आणला अं ! या यांच्या कृत्यानें केवढी माझी अप्रतिष्ठा होणार ! माझ्या कीर्तीला कायमचा बट्टा लागणार ! मला मोठें नवल हें वाटतें कीं, मला नोकरीवरून सस्पिड करण्यापूर्वी मला यांणीं सर्वस्वी अंधारांत ठेविलें ! आतां आणखी हे माझा किती छळ करतील याची मला कल्पनाही होत नाहीं. न जाणो मला हे कारागृहही दाखवितील काय ? छेः, यांची काय बिशाद आह्माला कारागृह दाखविण्याची ! यांणीं या अप्पाला पकडलें, काय याचा परिणाम होईल ? हा आमच्यावर उलटेल ? छेः, त्याच्या हातून असें व्हावयाचें नाहीं. पण न जाणो, हे पडले विजातीय लोक, वेळेस काय करतील याचा नेम नाहीं. काय करावें आतां. छोट्यासाहेबाला येथें येण्याला पत्र लिहिलें आहे. तो आतां आला ह्मणजे त्याच्या सल्ल्याप्रमाणें वागावें. पण तो तरी काय सांगणार? ( इकडे तिकडे फिरतो. ) माझ्या बाबतींत हा झालेला प्रकार व पुढें होणारा माझा छळ व अप्रतिष्ठा या गोष्टी चुकवाव्या कशा ? ही मंडळी लागणार हात धुऊन माझ्या पाठीस. हे सगळे अन् मी एकटा. मला नाहीं

कोणी सहाकारी मिळणार? ( खुरचीवर बसतो. ) छेः, प्रसंग गुदरला ह्मणजे कोणी कोणाच्या उपयोगीं पडत नाहीं. माझ्या कामीं इष्ट असे आतां दोनच प्रकार, तिसरा कांहीं राहिला नाहीं. एक आत्मघात व दुसरा या देशांतून तोंड काळें करणें. ( इकडे तिकडे फिरतो. ) आत्मघात करण्याला साधन ही या गांवची नदी. बिनबोभाट आपलें काम होणार आहे. हो, हीच युक्ति बरी. ' आपण मेलें अन् जग बुडालें. ' तेव्हां आतां या टेबलावर " मीं आत्मघात केला, मला नदींत येथून दोन कोसावर शोधा " अशा मतलबाची छोट्यासाहेबाच्या नांवची चिठ्ठी लिहून ठेवावी ह्मणजे बिचाऱ्याला श्रम तरी पडणार नाहींत. ( चिठ्ठी लिहितो. ) बरें, मीं ही गोष्ट केल्यावर माझ्या मागें कोणच्याही प्रकारचा या चिठ्ठीखेरीज मागमूस लागूं नये अशी सगळी व्यवस्था केली पाहिजे. तेव्हां द्यावी या माझ्या सगळ्या कागदपत्रांना आग लाऊन. चेक-बुकें, रोखे, पत्रें कांहीं एक मागें राहतां कामा नये. मग करा ह्मणावें माझ्या अफेयर्सची चौकशी! (कागद जाळतो.) करा आतां या राखेची चौकशी! ( विचार करितो. ) एका अर्थीं विचार केला असतां आह्मी आपल्या जिवाचा अंत काय ह्मणून करावा? असें हें भागूबाईसारखें काम, आह्मीं, या बड्यासाहेबांनीं करावें? छेः, दुसरी युक्तीच चांगली ठरते. या देशाला शेवटला रामराम करावा, दुसरी आतां गोष्ट नाहीं. पण हें साधावें कसें? या मंडळीनें मला वाटेंत पकडला तर? कशा द्याव्या आतां या मंडळीच्या हातांवर तुरी? काम मोठें कठीण आहे! हं. ह्या दुसऱ्या युक्तीला मीं ही लिहून ठेविलेली चिठ्ठी चांगली उपयोगी पडेल. शोधा म्हणावें सगळी नदी! सांपडतील तुम्हाला या नदींत बडेसाहेब! आतां हें असें करावें. ही आपणांजवळ एक कृत्रिम दाढी आहे हिचा या प्रसंगीं चांगला उपयोग होईल. (दाढी लावतो, एक घाणेरडा अंगरखा पायघोळ अंगांत घालतो व एक भिकार टोपी डोकीवर ठेवतो व आरशा समोर जाऊन) खूप बनला हा पोषाख! ओळखा ह्मणावें आतां या राजश्रीना! चला आतां निघावेंच.

मनांत आलेली कल्पना तावडतोब अमलांत आणलीच पाहिजे. उद्यां पहाटच्या गाडींत करावा या मंडळीला रामराम. आजची रात्र काढावी कशी तरी बाहेर भटकून. हें काहूर संपेपर्यंत काढावें एखाद्या दूरच्या बेटांत दिवस, याखेरीज आतां दुसरा इलाज नाहीं. (नोटा व रुपये पेटींतले घेतो.) हे आपणाला वर्ष सहा महिने तर पुरतील, मग पुढची गोष्ट पुढें. ज्या या बडेसाहेबापुढें सर्व लवून नमून होते, ज्याच्या चातुर्यापुढें व कलमबहादरीपुढें सगळे तोंडांत बोटें घालीत, ज्याणें शेंकडोंजणांचीं बिकट कामें हां हां ह्मणतां करून त्यांना उत्तम प्रकारचे न्याय दिले, ज्याच्या घरीं लक्ष्मी सरस्वती कचया घड्यानें पाणी भरीत होत्या, त्या या बहादरावर सर्वांनीं असें हें तोंड काळें करून जाण्याचा प्रसंग आणावाना? धिःकार असो तुम्हा सर्वांच्या कृत्यांना! आतां आह्मी आहोंत आणखी आमचें नशीब आहे! तुह्मीं सर्वांनीं मात्र आमचे चांगले उपकार फेडलेत. सलाम, तुह्मा सर्व कृतघ्न मंडळीला अन् या देशाच्या हतभाग्य लोकांना आमचा आतां अखेरचा रामराम!!!

(एक लहानशी ब्याग घेऊन टोपीचा सलाम करून जातो.)

---

## अंक ४ था.

## प्रवेश २ रा.

स्थळ, रावसाहेबाचा वाडा.

यमुनाबाई.

**यमुना**—(आपल्याशी) इतकीं बाई आह्मावर संकटं आली, पण एक तो अनाथाचा नाथ देवाधिदेव त्याच्या कृपेन सगळीं कशी आपलीं पटापट नाहींशी झालीं! त्या बापूनं अह्मावर आग पाखडण्याच्या प्रयत्न केला पण या आमच्या साह्यकारी मंडळीनीं

अह्माला अगदीं वेळेवर मदत केली ह्मणून आमची. आब्रू बचावली. बाई मोठा कठीण प्रसंग तो. असा वैऱ्यावर दिखील येऊ नये. त्या दिवशीं गोप्याची ती आवस्था, पोर हतचें जाण्याची वेळ आली होती, माझे हे दिवस भरलेले अन् इकडे आब्रू जाण्याचा प्रसंग. त्या दाजीसाहेबाचे उपकार आमच्या हातून जन्मोजन्म फिटायचे नाहींत. त्याणीं अह्माकरितां फार फार मेहेनत केली. त्याणीं रात्र पाहिली नाहीं दिवस पाहिला नाहीं, बिचारे तावडतोब इथे निघून आले अन् सरकारी वकील आणून इकडची एकदम सुटका करविली! आतां पुन्हा मेलं त्या खरतड गावचं तोंड ह्मणून पहायला नको. इथें आतां कायमचं काम मिळेल तर सोन्याहून पिवळं होणार आहे.

(ठकूबाई दुरून दिसते.)

हं. ह्या ठकूबाई इकडे कोणीकडे? ह्या आमच्या घराकडे येत आहेत. आज सूर्य पश्चिम दिशेकडेच उगवला ह्मणायचा!

**ठकू**—(येता येता मनांत) मी या यमुनाबाईला कसं तरी तोंड दाखवावं आतां.

(ठकू येते आणि एका बाजूला उभी रहाते.)

**यमुना**—यावं ठकूबाई. या सुभेदारीणबाई! (उठून उभी रहाते) याकिहो बसा. (पाट देते तिला बसायला.)

**ठकू**—(खालीं पहात उभी रहाते) मी बाई आतां कोणच्या तोंडानं यावं तरी तुह्मांजवळ. माझ्या हातून तुमचे हज्जार अपराध झाले आहेत.

**यमुना**—असं काय गडे बोलतां ठकूबाई, आहो त्यांत काय, माणूस चुकतच असतं. (तिचा हात धरून पाटावर बसविते.) बऱ्या अहातना. केव्हां आलांत इथे? पण अशा उदास का दिसतां आज.

**ठकू**—काल आलें, अह्मी आतां सदा अशाच उदास असायच्या.

**यमुना**—दोन दिवस माहेरीं आलांत वाटतं.

**ठकू**—आतां नेहेमीच माहेरीं रहायला यायचं आह्मी.

**यमुना**—म्हणजे, असं हो काय बोलतां गडे. बापूसाहेबही आले वाटतं.

**ठकू**—अह्मी सगळींजणं आलों काल संध्याकाळीं.

**यमुना**—बापूसाहेब आले असतील दोन दिवस विश्रांती घ्यायला. खरंच कठीण हो बाई ती सुभेदारीची चाकरी !

**ठकू**—आतां नेहेमीचीच रजा मिळाली आहे.

**यमुना**—काय ? काय म्हणतां तुह्मी ? झालं तरी काय ?

**ठकू**—यमूताबाई काय सांगू तुम्हाला. अह्मी मोठ्या संकटांत आहोत बाई. काल सकाळीं एकदम हुकूम आलाकीं सस्पिंड केलं आहे. चार्ज कारकुनाला देऊन एकदम निघून यायचं.

**यमुना**—असं काय बाई एकदम झालं तें. ठकूबाई सांगाहो खरं काय तें. असं जर हें झालं असलं तर फार फार वाईट गोष्ट झाली बरकां. अहो तुमचा नुकतासा कुठे संसार थाटत होता. इतक्यांत हें असं होणं म्हणजे काय बाई !

**ठकू**—अम्हालां भिकेचे डोहाळे आठवले ना. भिकेच हंडी शिंक्याला चढणं म्हणजे मोठी मुष्किलीची गोष्ट आहे !

**यमुना**—कांहीं तरी बोलतां तुह्मी. असा हुकूम एकदम यायचं कारण तरी काय झालं ?

**ठकू**—ति इथें मोठी एक चौकशी व्हायची आहे ना. काय आम्हावर बाई आतां किटाळं येतील कोण जाणे. त्यांची तर अगदीं पांचावर धारण बसली आहे. आमची कांहीं आतां धडगत दिसत नाहीं.

**यमुना**—अशा भिताहो काय ठकूबाई. असा धीर सोडूं नका.

**ठकू**— मलातर कांही सुचत नाहीं. वाटतं की ही अशी फजीती सहन करण्यापेक्षा बाजारातली पैसा दोन पैशाची आफू आणावी अन् एक दिवस कोणाला नकळतां राम म्हणावा झालं.

**यमुना**— ठकूबाई, मी तुम्हापुढें हात जोडतें. असले कांहीं एक विचार मनांत आणू नका बरंका. तुम्हाला माझ्या गळ्याची

शपथ आहे. बाई मागल्या जन्मीच्या पापाचीं फळं या जन्मीं माणसाला भोगावीं लागतात, या जन्मीं तरी माणसानं असं कांहीं करण्याचं मनांत आणू नये. या अशा करण्याला पुण्य मार्ग असं कोणी तरी बाई म्हणेल कां!

**ठकू**— काय तर हो. मुदली आधीं मला बिजवराला दिली, त्यांच्या विद्याभ्यासाला पैसे बाबांचेच, पुढें मोठे प्रयास करून मोठी चाकरी मिळवून दिली बाबांनीच; पैशापरी पैसा गेला, आतां आब्रू जाण्याची वेळ येऊन ठेपली आहे. अहो कसला आमचा संसार अन् कसलं काय. धड मुलनाबाळ अन देवळीं बिऱ्हाड. इकडे हें जगांत -असं खाली पहायला लागणार, इकडे मागं अठरा विसवे कर्ज, इकडे आम्ही कारभ्यांनीं बाबांना सबशेल बुडविलं. काय एक एक का प्रकार सांगू बाई!

**यमुना**— बाई माणसावर अनेक प्रसंग येतच असतात. दुःखा मागं सुख सुखा मागं दुःख हें आपलं जगाचं रहाटगाडगं सुरूं असतंच, तेंव्हां माणसानं भिऊन कसा परिणाम लागणार. प्रत्ये-काला केल्या कर्माचा पश्चाताप झाला, त्याणं सचोटीचा मार्ग सोडला नाहीं म्हणजे सगळीं संकटं नाहीशीं होतात. यांत कायतें समजा.

**ठकू**— हेचना पण उपदेश तुम्ही बाई अम्हाला त्यावेळीं करीत होतां. पण अम्हाला त्यावेळीं कैफ आला होता, आमचे डोळे अगदी धुंद होऊन गेले होते. यमूनाबाई, तुम्हापुढें पदर पसरतें. रावसाहेबानींच सगळं काम शिकविलं आहे, त्याणी सर्व प्रकारं जसं मागं संभाळून घेतलं त्याच प्रमाणं आतां म्हणावं या संकटातून बचावायचा एखादा रस्ता सांगा. हे शद्ब मला तुम्हा-जवळ उच्चारायला मोठी शरम वाटते पण काय करूं.

**यमुना**— तुम्ही काही एक काळजी करू नका. मी सगळं जवळ सांगून तजवीज करविते.

(रावसाहेब व बापूसाहेब येतात, यमुना व ठकू एकीकडे उभ्या रहातात.)

**बापू**—रावसाहेब, मला फार शरम वाटते आहे. माझ्यावरचं-येवढें संकट टाळण्याला कांहीं तरी उपाय सांगा. मी अपराधी आहें. माझे सहस्त्र अपराध पोटांत घाला, त्या गेल्या गतल्या गोष्टी सगळ्या विसराच आतां. (डोळ्याला पाणी आणून त्याचे पाय धरतो.)

**रावसाहेब**—बापू बसा तर खरे. ( ते बसतात. ) सर्पाला दूध पाजलें तरी तो त्या दूध पाजणारावर विषाचे फूत्कार टाकतो त्याप्रमाणें कृती करणारा मी नाहीं. आहो तुह्मी त्या वेळीं काय केलेंत, आह्मीच हतभाग्य तेव्हां तुह्मालातशा बुद्धि झाल्या.

**बापू**—मला क्षमा करा, माझे अपराध पोटांत घाला या-पेक्षां जास्त माझ्यानें बोलवत नाहीं.( डोळ्याला पाणी आणतो. )

**रावसाहेब**—बापू प्रसंग फार वाईट आला आहे. आमचें तुह्माला सांगणें आतां हेंच आहे कीं, एकंदर सर्व गोष्टी निष्प्राजल मनांनें आतां अधिकाऱ्यांजवळ कबूल कराल तरच या संकटांतून तुह्मी मुक्त व्हाल.

**बापू**—कोणच्या तोंडानें ह्या सर्व गोष्टी कबूल कराव्या, व ह्या कबूल करुनही शेवटीं आमची दशाच व्हायची कीं नाहीं. सर्व जग तोंडावर थुंकणार ते निराळेंच!

**रावसाहेब**—त्या गोष्टीचा आतां विचार करून उपयोग नाहीं आतां सगळ्या गोष्टी खऱ्याखऱ्या सांगितल्या असतां आधिकारी माफी देण्याला तयार आहेत.

**ठकू**—खरं खरं काय ते सांगावं अन व्हावं झालं मुक्त.

**बापू**—तुमच्या वडीलांनींच तर हा असा प्रसंग अह्मावर आणला. त्यां वेळेस मी वारंवार ह्मणत होतो कीं, तशा गोष्टी करणें कांहीं चांगलें नाहीं, दुरवर विचार केला पाहिजे, पण ह्या आमच्या सासरच्या सगळ्या मंडळींनीं मला जसें काहीं अगदीं भुरळ घातलें; तितक्यात तो आणखी एक अप्रयोजक अप्पा भेटला त्यानें तर भारी लगट केली हो रावसाहेब. आतां आपण विनभाड्याच्या घरांत गेला तो गेलाच अन् आह्मालाही असें संकटांत घातलें आहे,

**ठकू**—त्या मेल्यानं तर हें सगळं केलंन्. यमुनाबाई, आमचा सर्वस्वी नाश केला हो त्याणें.

**यमुना**—पण काय ह्मणता, त्या आप्पावरही बिन भाड्याच्या घरांत बसण्याची वेळ आलीना? आमच्या हिकडेही त्याणें आणला होता गोत्यांत घालण्याचा प्रसंग पण त्याची अशी खरडपट्टी काढली कीं तें कांहीं पुसूं नका.

**रावसाहेब**—त्या गेल्यागतल्या गोष्टी जाऊं द्या आतां. बापू उद्याच्या उद्या जा अन् सर्व गोष्टी बिनफिकीर कबूल करा.

**बापू**—बरें आहे आपल्या सल्याबाहेर मी खचीत वागणार नाहीं. येतो तर आतां.

(तो जातो.)

**ठकू**—मी ही येते आतां. अह्माला वाचवा, आमचे अपराध पोटांत घाला हें शेवटचं सांगणं आहे आपल्याला. पुन्हा पदर पसरते यमुनाबाई. (डोळ्याला पाणी आणते व जाऊं लागते.)

**यमुना**—(तिला कुंकू लावते.) एक त्या देवावर भार ठेवा ह्मणजे तो सगळ्या संकटांतून पार पाडील.

**ठकू**—संकटं आलीं कीं मग माणसाला देव आठवतो. देवा अह्मांवर हा प्रसंग यावाना?

**रावसाहेब**—अम्हीही घटकाभर बाहेर जाऊन येतो. त्या मंडळीला भेटावयाचें आहे.

**यमुना**—लौकर यायचं. घरांत स्वयपाक अगदीं तयार आहे, तो गोप्या मघापासून भूक भूक करितो आहे.

**रावसाहेब**—लौकर येतों परत.

(जातो.)

**यमुना**—(आपल्याशीच) ही ठकूबाई ह्मणजे अगदीं फुद्याण्यासारखी उडत होती, पण आतां कशी अगदीं वेंगून गेली आहे. काय करते बिचारी. त्या बापूची तरी तीच स्थिति. प्रसंग हा कोणावर येऊ नये, नाहीं तर ही ठकू आणखी माझ्या घरीं येऊन इतकी केविलवाणी व्हायची! केवढा तिचा तो तोरा, अभिमानाचं

अगदीं घर, सगळ्यांना कस्पटासमान लेखीत होती, पण आतां अगदीं दीन होऊन गेली आहे बापडी ! जो चढे तो पडे हीच गोष्ट खरी.

( जाते. )

---

## अंक ४ था.

### प्रवेश ३ रा.

स्थळ—अण्णासाहेबांचा वाडा.

अण्णासाहेब तात्यासाहेब रावसाहेब.

**अण्णा**—का रावसाहेब, आले कीं नाहीं तुमचे स्नेही बापूसाहेब येथें?

**रावसाहेब**—आले कालच आले, आमचे अगदीं जिवश्च कंठश्च स्नेही ! आज आले होते सहकुटूंब अम्हाला भेटायला !

**अण्णा**—मूर्ख बेटा ! काय विचार आहे राजश्रींचा ? देतात का नाहीं केल्या कर्माचा झाडा.

**रावसाहेब**—अगदीं भेदरून गेला आहे. सांगतो आहे आपणच होऊन सगळ्या गोष्टी. पण काय हो अण्णासाहेब बडेसाहेबांनीं पौबारा केला म्हणतात.

**अण्णा**—हो बोवा ती एक मोठी पंचाईतच झाली आहे, कोणी म्हणतात त्याणीं जळसमाध घेतली, कोणी म्हणतात पलायन केलें.

**तात्या**—जळसमाध घेण्याची तर गोष्टचविसरा. असला बहाद्दर गडी तसें कधींही करणार नाहीं. तो गेला सगळ्यांच्या हतांवर तुरी देऊन. मी पहिल्यापासून सांगत होतों कीं या कामीं कांहींएक होणार नाहीं, पण त्या मोठाभाईच्या उगीच फुशारक्या दुसरें काय ?

**रावसाहेब**—गोष्ट फार वाईट झाली.

**आण्णा**—सोधताहेत मंडळी चोहीकडे. खचीत असें तर होऊ नये बोवा.

( मोठाभाई येतात. )

**तात्या**—या भाईसाहेब, झाली नां फजीती! आतां करा चौकशा. त्या अप्पाला बिन भाड्याचें घर दाखविण्यांत कांहीं पुरुषार्थ नाहीं. ढेकणाला कोणीही चिरडील.

**मोठाभाई**—झाली तर खरी बोवा फजीती. आपण उद्योग करण्यांत कांहीं कमी केलें नाहीं.

**तात्या**—अहो तुमच्यासारख्या बहाद्दर मंडळीला कसें ह्मणतां, पण त्यांणीं पुरें चकविलें. बसा आतां स्वस्थ हरी हरी ह्मणत!

**मोठाभाई**—पकडलें बरें राजश्रीनां, तुह्मी काय समजला अहात!

**अण्णा**—काय, काय ह्मणता सापडली स्वारी?

**तात्या**—तें आम्हाला कधींही खरें वाटणार नाहीं.

**मोठाभाई**—यायचें आहे भेटीला आपणांला? चला घेऊन जातों पाहिजे तर!

**अण्णा**—कायहो कोठे मिळाले?

**मोठाभाई**—स्वारी निघाली होती जहाजांत बसून रावणाच्या लंकेला. तिथून एकदम सोन्याच्या विटा आणून सगळ्यांचे रुपये द्यायचे होते फेंकून!

**रावसाहेब**—एकूण येथपर्यंत तयारी होती अं?

**मोठाभाई**—स्वारीनीं घरीं ठेविली होती चिठ्ठी लिहून कीं, आह्मीं जलसमाध घेतली, आम्हाला नदीत सोधा ह्मणून. इकडे दाढी लाऊन वेष पालटून तिसऱ्या कलासात स्वारी जी बसली ती थेट पोहोंचली समुद्रकाठीं; पण अधिकारी कसले पडले खंदे, त्यांणीं माग सोधून काढला व स्वारी जहाजांत बसण्याच्या अगदीं तयारींत असतां पकडली. स्वारीनीं आपण भलत्याच गांवाहून आलों आहोत फार आजारी आहोंत तेव्हां हवा बदलावयाची आहे असें खोट्या सहीचें पत्र जहाजाच्या कपतानाला लिहिलें होतें, तें पत्र देखील सापडलें आहे.

**अण्णा**—शाबास खूप मात झाली. आतां थोडक्या दिवसांत चौकशी सुरू होणार खचीत.

**मोठाभाई**—स्वारी त्या दादासाहेबांच्या नांवानें खूप ओरडते आहे.

**तात्या**—काय बोवा, त्याणीं काय मोठा पुरुषार्थ केला ?

**मोठाभाई**—म्हणतात, यातले सगळे खेळे दादासाहेब !

**तात्या**—बरें आहे, गृहस्थ तर त्याणीं खूप शोधून काढले !

**अण्णा**—आतां मात्र सगळ्या खऱ्या गोष्टी बाहेर येतलि.

**रावसाहेम**—त्याबद्दल आतां संशय नाहीं. बापूसाहेब कबूल, कृष्णराव कबूल, विसाजी कबूल, भाऊसाहेब कबूल, काय पाहिजे आणखी. या सगळ्यानीं स्वत: जाऊन आपल्या हकीगती कळविल्या आहेत ह्यूमेन साहेबांपुढें.

**तात्या**—झाली ही सगळी मंडळीं साक्षी देण्याला कबूल अं !

**रावसाहेब**—खऱ्या गोष्टी फार दिवस कांहीं लपून छपून राहणार नाहींत.

**अण्णा**—सत्याचा जय होणारच, पापाच्या पुंजा कधीं तरी भरायच्याच.

**मोठाभाई**—आतां सर्वांनीं मनोभावें मदत करून द्यावा एकदां हरहर माहदेव उडवून. प्रतिनिधी साहेबांची सर्वांना सांगि आहे कीं, एक शब्द ह्मणून खोटा या चौकशीत बाहेर पडतां कामां नये. सर्वांनीं खरें खरें काय तें पुढें अणावें. कोणाच्या केसाला धक्का लागायचा नाहीं.

**अण्णा**—काय ह्मणून पण खोट्या गोष्टी सांगून आपलीं तोंडें विटाळून घ्यावीं ?

**रावसाहेब**—ही चौकशी मोठी जंगी होणार.

**अण्णा**—रावसाहेब, तुह्माला या कामी स्पेशल ड्युटीवर नेमिलें आहे. कशी रात्रं दिवस डोळ्यांत तेल घालून मेहनत करतां तें पहातो आतां. अधिकाऱ्यांनीं असें ह्मटलें पाहिजे कीं, पूर्ण मदत झाली. आपणांला या कामीं आपल्या प्रतिनिधी साहे-

बानीं या प्रसंगीं मोठें धैर्य, न्यायीपणा आणखी पक्षपातपराङ्मुखता दाखविली यांत संशय नाहीं. अहो, बडेसाहेब ह्मणजे त्यांचे स्वज्ञातीय, दर्जानें मोठे, फार वर्षांचे कामगार, पूर्ण कलम बहाद्दर. चोहींकडे त्यांचें वजन केवढें? त्यांचा परिचय किती दाट? त्यांची विद्वत्ता, बुद्धिमत्ता किती विलक्षण? पण खऱ्या न्यायाचा पक्ष स्वीकारून प्रतिनिधींनीं व त्यांच्या सल्लागार मंडळीनीं ह्या सगळ्या गोष्टी एका बाजूला ठेविल्या. असे निःपक्षपाती, धैर्यशील आणखी न्यायप्रिय प्रतिनिधि या प्रांताला वारंवार मिळणें फार दुर्मिळ!

**मोठाभाई**— प्रतिनिधि साहेबांची व त्यांच्या सल्लागारांची या प्रसंगीं स्तुति करावी तेवढी थोडीच; नाहीं तर कोण हो आपल्या लोकांच्या "न्यायकरा न्यायकरा" या ओरडीकडे लक्ष द्यायला बसला आहे? या खात्यांत निव्वळ मोगलाई बनली होती. तो अप्पा केवळ बडासाहेब बनला होता, या कामगार मंडळीनीं हें एवढें साहसाचें कृत्य हातीं घेतलें आहे तेव्हां त्यांना खरें खरें साह्य करण्याला आपण मात्र मागें सरतां कामां नये. हें माझें सर्व मंडळीला एकदां शेवटचें सांगणें आहे. चला आतां उगीच गप्पा मारण्यांत हांशील नाहीं.

( जातात. )

---

## अंक ९ वा.

### प्रवेश १ ला.

स्थळ.—एक भव्य बंगला. कोर्ट.

पात्रें.—टिनूसाहेब, सनूसाहेब, वेटूसाहेब, आमूसाहेब, इटीसाहेब बडासाहेब, मंडळी.

( टिनूसाहेब, सनूसाहेब व वेटूसाहेब हे तिघे न्यायाधीश एका उंच टेबलाजवळ बसले आहेत. खालीं एका टेबलाजवळ

आम्साहेब व इटीसाहेब बालिष्टर बसले आहेत. एकाबाजूला खुर्चीवर बडेसाहेब बसले आहेत.

**सन्साहेब**—( बडेसाहेबाला विचारतो. ) बडेसाहेब, तुह्मीं अप्पा या नांवाच्या एका इसमाच्या मार्फत व स्वतः बापूसाहेब या नांवाच्या इसमाजवळून एकवीसशें रुपये घेऊन या बापूसाहेबाला फडणीसाचा एकदम सुभेदार केलात, असें करण्यांत आपल्या अधिकाराच्या नात्याचा दुरुपयोग केलात अशी तुमच्यावर तोहोमत आहे. या कृत्याबद्दल तुह्मी गुन्हेगार अहांत कीं नाहीं ?

**वडासाहेब**—नाहीं.

**सन्साहेब**—तुह्मावर दुसरी अशी तोहोमत आहे कीं, या अप्पाच्या मार्फत व स्वतः तुह्मीं एक विसाजी या इसमाकडून पंचवीसशे रुपये घेऊन त्याला पुन्हां सुभेदार केलात, असें करण्यांत तुह्मी आपल्या अधिकाराच्या नात्याचा दुरुपयोग केलात. या कृत्याबद्दल तुह्मी गुन्हेगार अहांत कीं नाहीं ?

**वडासाहेब**—नाहीं.

**सन्साहेब**—तुह्मी आपल्या हाताखालच्या अम्मलदारां जवळून व इतर तुमच्या हद्दींत राहणाऱ्या इसमांजवळून, तुमच्या नोकरीच्या नियमांविरुद्ध मनस्वी कर्ज काढलेंत या तोहोमतीबद्दल तुह्मी गुन्हेगार अहांत कीं नाहीं ?

**बडासाहेब**—हाताखालच्या अंमलदारांजवळून कर्ज काढलें नाहीं. मीं कर्ज पुष्कळ काढलें आहे.

**सन्साहेब**—आम्साहेब आतां तुम्ही सुरवात करा.

**इटी**—मी बडेसाहेबांच्या तर्फेनें काम चालविण्यास हजर आहें.

**सन्**—व्हेरिवेल् मिस्तर इटी.

**आम्**—मी फिर्यादीतर्फे बालिस्टर आहे. महाराज, ही चौकशी फार फार महत्वाची आहे. बडेसाहेबांसारख्या फार वर्षे नोकरी केलेल्या कामगारावर अशा प्रकारच्या तोहोमतीबद्दल काम चालविण्याचें माझ्या नशिबीं यावें याबद्दल मला फार वाईट वाटतें आहे. परंतु आपणां सगळ्यांनीं न्यायदेवतेला स्मरून

वागलें पाहिजे व तिच्या अंकित असलें पाहिजे. योग्य न्यायाच्या कामाला मदत करणें हें आह्में कर्तव्य आहे. या कर्तव्याला जागून मी आपणांपुढें या महत्वाच्या खटल्याच्या संबंधानें आ-ह्मांकडून काय काय गोष्टी पुढें येणार आहेत याचें थोडक्यांत दिग्दर्शन करितों. बडेसाहेब या भागांत फार मोठे अम्मलदार होते. यांच्या हातीं मोठमोठीं महत्वाचीं कामें होतीं. त्यांत यांच्या भागांतील सुभेदार लोकांच्या नेमणुका करण्याचें यांचें एक काम होतें. एक आप्पा या नांवाच्या इसमावर यांचें मोठें प्रेम असे. हा इसम साहेबांच्या घरीं वारंवार जात असे. साहेब कर्ज बहुतेक या च्याच मार्फत काढीत असत. हा इसम हल्लीं याच्यावर याच चौ-कशीच्या संधबाचे गुन्हे शाबीद झाल्यावरून तुरुंगांत शिक्षा भोगीत आहे. या इसमानें बापूसाहेब या नांवाच्या एका इसमा-जवळून पंध्राशें रुपये घेऊन बडेसाहेबांना दिले असें आह्मी शा-बीद करणार आहोंत. ही रकम घेतल्यानंतर बापूची व बडेसाहे-बांची आप्पानें गांठ घालून दिली. बापूला लागलीच सुभेदारी मिळाली. याच बापूजवळून पुढें बडेसाहेबांनीं सहाशे रुपये कर्जाऊ ह्मणून घेतले ते त्याला परत दिले नाहींत. पंध्राशें रुपयांचीं रकम अप्पाला बापूचे सासरे यांच्या मार्फत पोहोंचली याबद्दल पुरावा आहे. आप्पा व साहेब यांचें नातें दलाल व धनी हें होतें असें आह्मी शाबीत करूं. दुसरा सुभेदार विसाजी याणें अप्पाच्या मार्फत हजार व स्वतः पंध्राशें रुपये बडेसाहेबांकडे पटविले हें शाबीद होईल. लागलींच विसाजीला सुभेदारी मिळाली. बडेसाहेबांच्या कर्जाबद्दल पुष्कळ पुरावा आह्मांजवळ आहे तो हजर करूं. या सर्व गोष्टींच्या संबधानें साहेबांचें वेषांतरानें व नांव बदलून प्रयाण, त्यांना पुन्हां पकडून येथें आणणें, वगैरे गोष्टी फार महत्वाच्या आहेत. ही थोडक्यांत हकीगत सांगून मी आतां पुराव्याला आरंभ करितों. पहिला साक्षीदार बापूसाहेब बोलवा.

( बापूसाहेब साक्षीकठड्यांत उभा राहतो. त्याची प्रतिज्ञा झाल्यावर

**आम्**—तुमचें नांव काय ?

**बापू**—माझें नांव बापू महादेव, सुभेदार, वय पंचवीस, राहणार हल्लीं पुणें, ब्राह्मण.

**आम्**—तुमच्या परिक्षा किती झाल्या आहेत ?

**बापू**—दोन, तिसरींत नापास झालों.

**आम्**—व्हेरिवेल, तुह्मीं पहिल्यानें नोकरी कोठें धरलीत ?

**बापू**—सुभेदार कचेरींत फडणिशीच्या जागेवर.

**आम्**—आप्पासाहेब या नांवाचा इसम ओळखतां ?

**बापू**—होय, तो आमच्या वर्गांत होता.

**आम्**—तुमच्या सासऱ्याचें नांव ?

**बापू**—भाऊसाहेब.

**आम्**—शेवटीं तुमची अन् अप्पाची गांठ कधीं पडली होती?

**बापू**—आमच्या सासऱ्याच्या घरीं, वर्ष दीडवर्षापूर्वी.

**आम्**—त्या वेळीं काय बोलणें झालें ?

**बापू**—आमचे सासरे अप्पाला ह्मणाले आमच्या जांवई-बोवाचें कल्याण करा.

**आम्**—मग ?

**बापू**—अप्पा ह्मणाला, कल्याणाला कर्जाऊ पैसे लागतात. शे-वटीं पंध्राशें रुपये देण्याचें ठरलें.

**आम्**—कोणाला द्यायचे हे रुपये ?

**इटी**—या प्रश्नाला माझी हरकत आहे.

**सन्**—हा प्रश्न आह्मी नाकबूल करतों.

**आम्**—या पंध्राशें रुपयांबद्दल अप्पा काय म्हणाला ?

**इटी**—माझी हरकत आहे या प्रश्नाला.

**आम्**—मग हे रुपये अप्पाच्या हातांत गेले कीं नाहीं ?

**बापू**—होय. सासऱ्यानें रुपये कर्जाऊ काढले, मग मी पुढें रुपये सासऱ्याला पाठविले.

**वेट्**—ते काय तें सासरा सांगेल.

**आम्**—पुढें काय झालें ?

**बापू**—अप्पा मला बडेसाहेबांच्या बंगल्यावर घेऊन गेला, बडासाहेब म्हणाले काय तें कळवूं. मग लागलींच मला सुभेदारीची जागा मिळाली.

**आम्**—तुह्मी एकंदर किती रुपये दिलेत?

**बापू**—सासऱ्याच्या मार्फत पंध्राशें, स्वतः सहाशें, एकंदर एकवीसशें.

**आम्**—तुमची ग्रेड आली होती सुभेदारीची?

**बापू**—नाहीं, मजवर दहाबारा लोक होते.

(इटींचे उलट सवाल.)

**इटी**—कधीं स्वतः आपल्या हातानें बडेसाहेबांना रुपये दिले का?

**बापू**—होय. सहाशें रुपये मीं स्वतः दिले.

**इटी**—कोठें?

**बापू**—सुभेदारीच्या गांवीं.

**इटी**—साहेब काय ह्मणाले?

**बापू**—मला रुपये कर्जाऊ पाहिजेत. मी चेक् पाठवून देईन.

**इटी**—मग नाहीं मिळाला चेक् तुम्हाला?

**आम्**—हे रुपये कबूल असें झालेंच तर मग?

**इटी**—प्रश्नाचा जबाब?

**बापू**—नाहीं. मला चेक् पाठविला नाहीं.

**आम्**—चेक्चा दुसरा भाग हजर करावा.

**इटी**—हा माझ्या सव्वालांना अडथळा होतो. मी माझ्या मित्रांच्या सव्वालांना अडथळा केला नाहीं.

**सन्**—गोआन् मिस्तर इटी.

**इटी**—पंध्राशें रुपये साहिबांना तुझ्या समक्ष पोहोंचले?

**बापू**—अप्पानें साहेबांला देण्याकारितां सासऱ्याजवळून घेतले.

**इटी**—तुझ्या समक्ष?

**बापू**—नाहीं. सासऱ्यानें मला सांगितलें.

**इटी**—हल्लीं चाकरीवर आहेस का?

**बापू**—नाहीं. सस्पेंड आहें.

**इटी**—याचे पूर्वी फौजदारी अधिकार चालवीत होतास कीं नाहीं ?

**बापू**—होय. चालवीत होतों.

**इटी**—पैसे भरून मोठी चाकरी कमाविली तरी ?

**बापू**—होय.

**इटी**—तूं कायमचा सुभेदार आहेस ?

**बापू**—नाहीं. नोकरी मिळाल्यापासून अक्टिंगच आहें.

( इटी बसतो. )

**आम्**—मला या साक्षीदाराला कांहीं विचारावयाचें नाहीं.

## ( साक्षीदार कृष्णराव. )

( कृष्णरावाची शपथ झाल्यावर. )

**आम्**—तुह्माला कोठें चाकरी होती ?

**कृष्णराव**—मी बडेसाहेबांच्या हाताखालीं कारकून होतों.

**आम्**—आप्पा तुमच्या ओळखीचा होता ?

**कृष्णराव**—होय, त्याची आमची रातंदिवस बैठक असे.

**आम्**—ही ओळख होण्याचें कारण ?

**कृष्णराव**—तो बडेसाहेबांच्या मर्जींतला होता. कामाकरितां मला त्याच्या घरीं जावें लागत असे.

**आम्**—काम कसलें ?

**कृष्णराव**—ड्राफ्टाच्या नकला करण्याचें. ड्राफ्ट अप्पा करी, तो प्रति बडासाहेबच असे. कचेरींतले कागद घरीं नेत असे, बंगल्यांतही साहेबांचें काम तो करीत असे.

**आम्**—त्याच्या घरीं मंडळी कोणकोण येत असे ?

**कृष्णराव**—पुष्कळ कामगार मंडळी, सुभेदार मंडळी, हरहमेष त्याच्या घरीं येई.

**आम्**—कशाला ?

**कृष्णराव**—आपलीं कामें करून घेण्याकरितां.

**आम्**—फुकट ?

**कृष्णराव**—अप्पासाहेब त्यांच्याजवळून कर्जाऊ ह्मणून रुपये घेत असत.

**आम्**—कोणाला देण्याकरितां?

**कृष्णराव**—बडेसाहेबांना कर्ज फार असे, तेव्हां त्यांना देण्याकरितां.

**आम्**—तुमच्या देखत दिल्या कोणीं रकमा?

**कृष्णराव**—होय, बापूच्या साहाय्यानें, विसाजीपंतानें, पंधाशें व हज्जार अनुक्रमें.

(इटी साहेबाचे उलट सवाल.)

**इटी**—तूं कधीं या रकमा प्रत्यक्ष बडेसाहेबांना देतांना पाहिल्यास?

**कृष्णराव**—नाहीं, पण अप्पा या मंडळीला बडेसाहेबांच्या बंगल्यांत घेऊन जात असे.

**इटी**—हें कोणीं विचारिलें? तूं पाहिलीस ही मंडळी कधीं बंगल्यांत?

**कृष्णराव**—होय, बापूला अप्पा घेऊन आला होता तेव्हां मी तेथें होतों.

**इटी**—तुला सस्पिंड केलें आहे कीं नाहीं?

**कृष्णराव**—होय, पण मी आतां खरी खरी हकीगत सांगितली तेव्हां आतां मला नोकरी मिळेल.

**इटी**—मोठाभाई व दादा ओळखीचे आहेत?

**कृष्णराव**—होय.

**इटी**—अण्णासाहेबाची गांठ कधीं पडली होती?

**कृष्णराव**—रोज पडते.

**इटी**—त्याचें तुझें या खटल्याच्या संबंधानें बोलणें कितीदां झालें?

**कृष्णराव**—मुळींच नाहीं.

**इटी**—किती वर्षें नोकर आहेस?

**कृष्णराव**—दहा वर्षें. (इटी खालीं बसतो.)

**आम्**—मला याला कांहीं विचारायचें नाहीं.

( कोर्टाचे सव्वाल. )

**सन्**—पोलिसाकडे केव्हां हकीकत कळविली ?

**कृष्ण**—मी सस्पिंड झाल्यावर थोड्या दिवसांनीं.

**सन्**—त्यांणीं विचारली ?

**कृष्ण**—नाहीं, मीं आपण होऊनच सांगितली.

**(.भाऊसाहेबांची साक्ष.)** (प्रतिज्ञा झाल्यावर )

**आम्**—तुह्मी बापूचे कोण ?

**भाऊ**—मी त्याचा सासरा.

**आम्**—अप्पाची तुमची ओळख होती ?

**भाऊ**—होय, तो आमच्या बापूच्या वर्गांत होता.

**आम्**—त्याच्या घरीं कधीं गेलां होतां ?

**भाऊ**—तो आमच्या घरीं आला होता.

**आम्**—मग काय हकीकत झाली ?

**भाऊ**—मी त्याला बापूचें कल्याण करा म्हटलें. तो ह्मणाला बडेसाहेबांना कर्ज फार झालें आहे, तेव्हां अडीच हजार कर्जाऊ रुपये दिले पाहिजेत. शेवटीं पंध्राशांवर जुळलें; मीं ते फुन्ना मारवाड्याजवळून कर्ज काढून अप्पाला दिले. पुढें थोड्या दिवसांत बापूला सुभेदारीची जागा मिळाली.

( इटीचे उलट सव्वाल. )

**इटी**—तुह्मी हे रुपये प्रत्यक्ष साहेबांच्या हातांत पडतांना पाहिलेत ?

**भाऊ**—छे:, मी नाहीं पाहिले.

**इटी**—तुम्हाला काय ठाऊक, कीं अप्पाला रुपये दिले ह्मणजे जागा मिळतात?

**भाऊ**—तें तर ओपन सीक्रेट होतें. शिवाय अप्पानें सांगितलें.

**इटी**—तुह्मीं अप्पाला रकम दिली तेव्हां जवळ कोण होतें ?

**भाऊ**—कोणी नव्हतें.

**इटी**—मारवाड्याचे रुपये दिलेत ?

**भाऊ**—हो. बापूनें जसजसे पाठविले तसतसे देऊन टाकले.

(**फुन्ना मारवाड्याची साक्ष.**) (प्रतिज्ञा झाल्यावर.)

**आम्**—बडेसाहेब तुमच्या ओळखीचे होते ?

**फुन्ना**—जी बाव. अमे तो त्येला रुपिया कर्जाऊ फार दिला.

**आम्**—तो पैका परत आला ?

**फुन्ना**—नै. अमे कोडतात हुकमनामा मिळविला.

**आम्**—तो बजावलात ?

**फुन्ना**—तो वाजवला तो रुपयाला पै बि नथी पैका आला बाव. आमचा फार रुपिया येणेंचा राहिला.

**आम्**—(हुकूमनामा दाखवितो.) हाच तो ?

**फुन्ना**—आं बाव. दुसरा पुष्कल मारवाडी लोकाचा ने दुसऱ्याचा पैका देणे है बावांनीं.

**आम्**—मी हे कागद दाखल करितों.

(**विसाजीपंताची साक्ष.**) (प्रतिज्ञा झाल्यावर.)

**आम्**—आप्पा तुमच्या ओळखीचा आहे का?

**विसू**—होय. मी त्याच्या घरीं रुपये देण्याला गेलों होतों. कृष्णरावानें माझी त्याची ओळख करून दिली.

**आम्**—कशाकरितां हे रुपये द्यायचे होते ?

**विसू**—मी सर्सिपड झालों होतों तेव्हां बडेसाहेबांजवळ शिफारस लावण्याकरितां.

**आम्**—मग मिळाली तुह्माला तुमची जागा ?

**विसू**—होय, बरेच दिवस लागले पण मिळायला.

**आम्**—तुह्मी बडेसाहेबांच्या बंगल्यावर गेलां होतां कां ?

**विसू**—होय. त्यांना कर्जाऊ रुपये द्यायचे होते व पहिल्यान्दांही आप्पानें मला नेलें होतें.

(इटीसाहेबांचे उलट सवाल.)

**इटी**—किती दिले कर्जाऊ रुपयें ?

**विसू**—रुपये पंधराशें दिले.

**इटी**—कोण होतें त्या वेळीं जवळ ?

**विसू**—कोणी नव्हतें.

**इटी**—अजून तुह्मी सुभेदार आहांत?

**विसू**—होय आहें.

**इटी**—लांच देऊन सुद्धां?

**विसू**—होय.

**इटी**—सस्पिंड कां झालां होतां?

**विसू**—माझ्यावर चार्ज आला होता.

**इटी**—पैसे खाल्ल्याचा?

**विसू**—होय. पण तो खोटा होता. त्याची बडेसाहेबांनीं चौकशी करून मला दोषमुक्त ठरविलें तेव्हां तर चाकरी मिळाली.

**इटी**—वेल, अप्पाचें तुमचें काय बोलणें झालें?

**विसू**—साहेब, मीं त्याच्या घरीं गेलों तेव्हां तो मला ह्मणाला तुह्मी गाढव मूर्ख आहांत काहो? त्रिदोष झाला ह्मणजे वैद्य पहायचा!

**इटी**—तुह्मी नाहीं त्याला उलट शिव्या दिल्या?

**विसू**—नाहीं साहेब, मी त्याच्या पुढें पदर पसरला, साष्टांग नमस्कार घातला.

**इटी**—काय म्हणून?

**विसू**—काम करून घेण्यासाठीं.

**इटी**—अप्पाच्या हातांत काय होतें? तो कांहीं अंमलदार नव्हता.

**विसू**—साहेब, मीं त्याला म्हटलें माझीं मुलेंबाळें अन्नाला लावा. तो तर सर्व कांहीं होता, त्याच्या खेरीज काडी हलत नसे हें सर्वत्र प्रसिद्ध होतें.

**इटी**—इतकेंच कीं नाहीं त्याचें तुमचें बोलणें झालें?

**विसू**—नाहींहो साहेब, मी आपल्या खिशांतलें पुडकें काढलें, त्याच्या हातांत दिलें, तेव्हां हो त्याचा राग शांत झाला!

**इटी**—कसलें पुडकें?

**विसू**—नोटांचें.

**इटी**—तो काय म्हणाला?

**विसू**—तो म्हणाला हे रुपये कर्जाऊ पाहिजेत. हातीं येतील तेव्हां परत मिळतील.

**इटी**—तर मग हा लांच नव्हता?

**विसू**—रुपये आजपर्यंत हो परत आले नाहींत अन् आतां येण्याची आशा नाहीं. तें आपलें नुसतें अप्पाचें म्हणणें.

**इटी**—साहेबांना कोणच्या तारखेस भेटलांत?

**विसू**—तारीख वीस जुलई रोजीं.

**इटी**—हा पहा तक्ता, या दिवशीं तुह्मी तर नौकरीवर होतां.

**विसू**—मला आठवत नाहीं, या तारखेच्या पूर्वीं किंवा नंतर भेटलों असेन.

( इटी खालीं बसतो. )

**आम्**—मला कांहीं याला विचारायचें नाहीं. बडेसाहेबांची साक्ष घेणें आहे.

**इटी**—त्यांची तयारी आहे. आम्हीच त्यांची साक्ष डिफेन्स तर्फे घेतों.

**आम्**—फार उत्तम. मी हे कागद दाखल करून आमचे तर्फे पुरावा संपवितों.

**( बडेसाहेबांची जबानी. )**

( इटीसाहेबाचे सव्वाल. )

**इटी**—तुमच्याजवळ हल्लीं काय शिलक आहे?

**बडेसाहेब**—मजजवळ एक कवडीही शिलक नाहीं.

**इटी**—विसाजी तुह्माला भेटला होता का?

**बडेसाहेब**—होय. त्या वेळीं तो एकटाच होता.

**इटी**—तुह्माला अप्पाकडून अगर दुसऱ्या कोणाकडून विसाजीवर मेहेर नजर करण्याकरितां रुपये मिळाले का?

**बडेसाहेब**—नाहीं.

**इटी**—विसाजीनें स्वतः कधीं रुपये दिले?

**बडेसाहेब**—नाहीं.

**इटी**—अप्पाकडून, बापूबद्दल तुह्माला रुपये मिळाले का?

**वडेसाहेब**—छेः ! मुळींच नाहीं. गोष्ट अगदीं खोटी.

**इटी**—बापू तुमच्या बंगल्यांत केव्हां आला होता ?

**वडेसाहेब**—मुळींच आला नाहीं. मला आठवत नाहीं.

**इटी**—बापूचें तुमचें बोलणें झालें का ?

**वडेसाहेब**—छेः, कधीं नाहीं.

**इटी**—तुह्मी सर्व नेमणुका केल्या त्यांत कांहीं अन्याय झाला आहे कीं काय ?

**वडेसाहेब**—सर्व नेमणुका अगदीं न्यायानें केल्या आहेत.

**इटी**—बापूनें स्वतः कधीं रुपये दिले का ?

**वडेसाहेब**—आठवत नाहीं.

**इटी**—तुह्मी सस्पिंड झालां तेव्हां तुमची स्थिति कशी होती ?

**वडेसाहेब**—मी अजारी होतों. माझ्या मनाला एकदम धक्का बसला होता.

( आम्‌साहेबांचे उलट सव्वाल. )

**आम्**—अप्पाची तुमची कोठली ओळख ?

**वडेसाहेब**—तो एक हुशार तरुण गृहस्थ आहे. त्याची माझी ओळख त्याच्या गांवीं मी गेलों तेव्हां पडली.

**आम्**—तो तुमच्या करितां कर्ज काढण्याच्या कामांत उपयोगी पडे कीं नाहीं ?

**वडेसाहेब**—होय, तोच बहुतेक सावकार माझ्याकडे आणी.

**आम्**—तुमच्या बंगल्यांत येत असे कीं नाहीं ?

**वडेसाहेब**—होय, केव्हां केव्हां येत असे.

**आम्**—कर्जाचे कामीं तो तुमचा दलालच म्हणायचा ?

**वडेसाहेब**—होय. दुसरेही असत दलाल.

**आम्**—त्याला या कामाबद्दल तुह्मी कांहीं नफा करून देत होतां कीं नाहीं ?

**वडेसाहेब**—माझ्याकडून त्याला कांहीं नफा मिळत नव्हता. परभारें सावकाराकडून तो घेत असला तर मला ठाऊक नाहीं.

**आम्**—त्याला नोकरी मिळण्याबद्दल तुह्मी शिफारस केली कीं नाहीं ?

**वडेसाहेब**—होय, केली होती.

**आम्**—तो तुमचे कचेरीसंबंधीं काम करीत असे कीं नाहीं ?

**वडेसाहेब**—माझा दादावरचा विश्वास उडाला तेव्हां अप्पाला मी मदतीला घेत असें. माझा त्याच्यावर पूर्ण विश्वास असे.

**आम्**—तो बापूला घेऊन तुमच्याकडे कधीं आला होता कीं नाहीं ?

**वडेसाहेब**—कधीं नाहीं.

**आम्**—विसूला ?

**वडेसाहेब**—छेः, कधीं नाहीं.

**आम्**—अप्पा कचेरींतील कागद घरी नेत असे कीं नाहीं ?

**वडेसाहेब**—कधीं नाहीं.

**आम्**—सुभेदारांच्या नेमणुकांच्या यादी दुरुस्त करीत असे ?

**वडेसाहेब**—छेः, त्याला कधीं या यादी दिसल्याच नाहींत. त्या कचेरींत असत.

**आम्**—तुमच्या विरुद्ध मजकूर सांगायचा बापूचा कांहीं हेतु आहे काय ?

**वडेसाहेब**—मला तर कांहीं वाटत नाहीं.

**आम्**—विसूचा ?

**वडेसाहेब**—कांहीं नाहीं. पण मीच त्याला सस्पिंड केलें होतें.

**आम्**—पण तुह्मीच त्याला पुन्हां नोकरी सुभेदारीची दिलीत कीं नाहीं ?

**वडेसाहेब**—होय. मी आपली खातरी करून घेऊन दिली.

**आम्**—अण्णावर तुमचा भरंवसा होता कीं नाहीं ?

**वडेसाहेब**—होय, पूर्ण भरंवसा होता.

**आम्**—अप्पा हल्लीं कोठें आहे ?

**वडेसाहेब**—तो तुरुंगांत आहे.

**आम्**—बापूच्या वर पुष्कळ लोक होते, त्यांची ग्रेड आली नव्हती, तरी त्याला जागा दिली होती ?

**वडेसाहेब**—होय, त्याला ज्या गांवीं तो होता त्याच गांवची आक्टिंग सुभेदाराची जागा दिली होती.

**आम्**—तुह्मी उंबरगांव तालुक्यांत गेलां होतां कीं नाहीं ?

**वडेसाहेब**—कधीं गेलों नाहीं.

**आम्**—शपथेवर सांगतां ?

**वडेसाहेब**—होय.

**आम्**—त्या तालुक्याचा बापू हा सुभेदार असतां त्याच्याजवळून त्या गांवीं कर्ज घेतलें नाहीं तुह्मीं ?

**वडेसाहेब**—मी तेथें गेलों नाहीं व कर्ज घेतलें नाहीं.

**आम्**—हा पहा तुमचा वरिष्ठांना रपोट, तुह्मी उंबरगांवाहून केलेला ?

**वडेसाहेब**—मला स्मरण नाहीं.

**आम्**—रपोट तरी तुमच्या हातचा ?

**वडेसाहेब**—होय.

**आम्**—मग आतां गेलां होतां कीं नाहीं उंबरगांवीं ?

**वडेसाहेब**—गेलों असेन, मला आठवत नाहीं.

**आम्**—व्हेरि वेल. अप्पानें तुमच्याकरितां किती वेळ कर्जें काढलीं ?

**वडेसाहेब**—आठ दहा वेळां.

**आम्**—तो तुमच्या भेटीला या कर्जाच्या संबंधानेंच येत असे?

**वडेसाहेब**—स्नेहसंबंधानेंही माझ्या भेटीला येत असे.

**इन्साहेब**—आम्हीं अप्पाला पाहिला नाहीं. पण तो मोठा उंची माणूस असावा असें वाटतें.

**वडेसाहेब**—होय, तो मोठा उंची माणूस असे.

**आम्**—अप्पा एकटाच भेटीला येत असे का दुसरी मंडळी हजर असे तेव्हांही तो येई ?

**बडेसाहेब**—तो येई तेव्हां एकटाच येई. इतर मंडळीसमक्ष कधीं येत नसे.

**आम्**—तुह्मी आलीकडेच फार कर्ज काढलें आहे नाहीं बरें ?

**बडेसाहेब**—होय.

**आम्**—गेल्या तीन चार वर्षांत किती काढलें ?

**बडेसाहेब**—एकंदर लाख दीड लाख रुपये.

**आम्**—याच्या मागल्या कर्जाकरितां तुमचा पगार लावून दिला आहे ?

**बडेसाहेब**—होय.

**आम्**—तुह्मी दर महिन्यास पगारापैकीं किती रुपये उचलतां?

**बडेसाहेब**—सहासातशें रुपये.

**आम्**—तुमचा महिन्याचा खर्च किती होतो ?

**बडेसाहेब**—आठनऊशें. शिवाय पॉलिसिला दरसाल भरावे लागतात दोन तीन हजार.

**आम्**—तुह्मी आपल्या पेढीच्या खात्याला पैसा जमा करीत होतां ?

**बडेसाहेब**—होय.

**आम्**—पैसे घरी पाठवीत होता ?

**बडेसाहेब**—होय.

**आम्**—बडेसाहेब, हे सर्व पैसे कोठून येत याबद्दल कांहीं थोडा खुलासा ?

**बडेसाहेब**—मी कर्ज काढीत असें सावकारांजवळून.

**आम्**—सावकारांचीं नांवें ?

**बडेसाहेब**—सांगतां येत नाहींत.

**आम्**—या सर्वांचा हिशेब ठेवीतच असाल ?

**बडेसाहेब**—मला वाईट वाटतें! मीं कधींच हिशेब ठेविला नाहीं.

**आम्**—जेव्हां पैशाची गरज लागे तेव्हां कर्ज काढीत होतां कां गरज लागेल ह्मणून पैसे जवळ शिल्लक ठेवीत होतां ?

**बडेसाहेब**—ज्या ज्या वेळीं ह्मणून मला कर्ज मिळे तेव्हां मी कर्ज काढीतच होतों, त्या वेळीं मला गरज असो कीं नसो. मला नेहमीं गरजही असेच.

**आम्**—आपणांजवळ शिलक ठेवीत होतां तर ?

**बडेसाहेब**—माझ्या पेटींत मुबलक पैसे ठेवीत असें, अन् जसजसे लागतील तसतसे खर्च करीत असे.

**आम्**—ते पैसे तुह्मी आपल्या पेटींत ठेवीत असा, पेढीवर पाठवीत नसा तर ?

**बडेसाहेब**—होय.

**आम्**—चेक बुकें कोठें आहेत ?

**बडेसाहेब**—मी आपला बंगला सोडण्याच्या आधीं सर्व कागद जाळले. मी देहभानावर नव्हतों. पुष्कळ महत्वाचे कागद जाळून टाकले असें मला नंतर कळून आलें.

**आम्**—पण त्या दिवशीं कांहीं कागद कचेरींत पाठविलेत ?

**बडेसाहेब**—मला आतां असें समजलें आहे.

**आम्**—दादाचें तुमचें किती दिवस नीट नाहीं ?

**बडेसाहेब**—गेल्या वर्ष दोन वर्षांत.

**आम्**—पण जेव्हां बंगल्यांतून गेलांत तेव्हां त्याला प्रेमळ पत्र लिहिलेंत ? हें पहा तें पत्र. (दाखवितो.)

**बडेसाहेब**—मला ठाऊक नाहीं.

**आम्**—या दिवशींच दुसरीं पत्रें तुह्मीं लिहिलींत कीं नाहीं ?

**बडेसाहेब**—मला कांहीं एक आठवत नाहीं.

**आम्**—जेव्हां तुह्मी बंगल्यांतून निघालांत तेव्हां वेषांतर केलें होतें, होय ना ?

**बडेसाहेब**—मला माहीत नाहीं.

**आम्**—अन् ही दाढी ? (कृत्रिम दाढी दाखवितो.)

**बडेसाहेब**—होय, ही वर्ष दीड वर्षापूर्वीं मीं सोंग घेतलें होतें त्या वेळीं लाविली होती.

**आम्**—मग त्या रात्रीं तुह्मी येथून निघालात दाढी लाऊन ?

**बडेसाहेब**—होय, पण मला कांहीं एक भान नव्हतें त्या वेळीं.

**आम्**—तिसऱ्या कलास गाडींतून गेलांत ?

**बडेसाहेब**—होय.

**आम्**—वाटेंत एक्या स्टेशनावर उतरलांत ?

**बडेसाहेब**—मी त्या वेळीं काय केलें हें मुळींच आठवत नाहीं.

**आम्**—लंकेपर्यंत पोहोंचण्या पुरते पैसे भरपूर होते आपल्या जवळ ?

**बडेसाहेब**—मजजवळ सुमारें दोनतीनशें रुपये होते.

**आम्**—जेव्हां तुह्माला पुढें पकडलें त्या वेळीं वारंट मागितलेंत?

**बडेसाहेब**—मला माहीत नाहीं. मी देहभानावर नव्हतों.

**आम्**—बडेसाहेब, आतां एक प्रश्न आहे. येथून निघण्यापूर्वी दारूनें झिंगला होतां कीं नाहीं ?

**बडेसाहेब**—तो दारूचा कैफ नव्हता, मानसिक दुःखाचा परिणाम होता.

**आम्**—आगबोटीचे टिकिट काढायला माणूस पाठविला होता तुह्मीं ?

**बडेसाहेब**—मला मागून असें कळलें खरें.

**आम्**—तुमची नोकरीची मुदत केव्हां संपते.

**बडेसाहेब**—वर्ष सहा महिन्यांनीं.

**आम्**—मग हे लाख दोन लाख कर्ज कसें फिटायचें. पगारांतूनच कीं नाहीं फिटायचें ?

**बडेसाहेब**—माझी मिळकत मोठी आहे. पॉलिसी आहेत.

**आम्**—त्या पालिसी तुह्माजवळ आहेत ?

**बडेसाहेब**—त्या दुसऱ्या लोकांना लाऊन दिल्या आहेत.

**आम्**—मग रावणाच्या लंकेंत जाऊन तेथून सोन्याच्या विट आणून सावकार फेडायचे असतील ?

**बडेसाहेब**—असा माझा अपमान करूं नका.

( आम्साहेब खालीं बसतो. )

## इटीसाहेबांचें बोलणें.

युअर लार्डशिप्स. या कज्जांच्या संबंधानें मला फारसें बोलावयाला नको असें वाटतें. माझे पक्षकार बडेसाहेब यांच्या विरुद्ध कांहीं एक शाबिती नाहीं. एकही साक्षीदार असें सांगत नाहीं, कीं आपण प्रत्यक्ष माझ्या पक्षकाराला स्वतः पैसे दिले. बापू व विसू सांगतात त्यांच्या सांगण्यावर भरंवसा ठेवूं नये. या सर्व साक्षीदारांनीं माझ्या पक्षकाराला बुडविण्याचा कट केला आहे. यांना माफ्या देण्यांत आल्या आहेत. हे साक्षीदार स्वतः आरोपीच आहेत. कारण, लांच देणारे देखील आरोपींत गणले जातात. यांच्या बोलण्यावर काडीमात्र आपण भरंवसा ठेवणार नाहींत, ही माझी खातरी आहे. या लोकांनीं अप्पाला पैसे दिले असतील, पण त्यावरून ते माझ्या पक्षकाराला पोहोंचले असें कांहीं ह्मणतां येत नाहीं. अप्पानें लांच खाल्ला असेल. व या लोकांनीं दिला असेल. अप्पाची व माझ्या पक्षकाराची ओळख होती. तो कर्ज काढण्याच्या कामीं माझ्या पक्षकाराला उपयोगीं पडे यावरून माझ्या पक्षकारांनीं अप्पाच्या मार्फत या मंडळीजवळून लांच खाल्ला असें कधींही अनुमान करितां येणार नाहीं. बापूला व विसाजीला जागा योग्य प्रकारें दिल्या आहेत.

**सन्साहेब**—त्याबद्दल आह्माला कांहीं ऐकण्याची जरूर नाहीं.

**इटीसाहेब**—बापू व विसाजी यांच्या बोलण्यापेक्षां माझ्या पक्षकाराच्या बोलण्यावर जास्त भरंवसा ठेविला पाहिजे. माझ्या पक्षकारानें मोठमोठ्या हुद्दयांचीं व जोखमीचीं कामें इमानेंइतबारें आजपर्यंत केलीं आहेत. त्यांच्यावर सरकारांनीं मोठा भरंवसा ठेविला आहे. माझ्या पक्षकाराच्या चाकरी संपण्याच्या कालांत त्याच्यावर या मंडळीनीं हें किटाळ आणिलें आहे याबद्दल प्रत्येक मनुष्यास वाईट वाटल्याखेरीज राहणार नाहीं. दादा, मोठाभाई व अण्णा यांणीं हा सर्व व्यूह रचला आहे. या सर्वांचें व माझ्या पक्षकाराचें वांकडें आहे, या गोष्टीचा आपण विचार करावा.

माझ्या पक्षकारांचा एवढा मोठा हुद्दा असतां, त्याचें चोहींकडे मोठें वजन असतां त्यांना एकदम सस्पेंड केलें. त्यांच्यावर फौजदारीचा प्रसंग आला, तेव्हां ज्या प्रांतांत त्यांणीं इतकी कीर्ति मिळविली त्या प्रांतांत राहण्यापेक्षां त्यांची अप्रतिष्ठा झाली सबब त्यांणीं शेवटीं जें दूरदेशीं जाण्याचें कृत्य केलें तें योग्य नव्हतें असें कोण ह्मणेल. माझ्या पक्षकाराला कर्ज पुष्कळ झालें. यांत मोठेसें कांहीं नाहीं. असें पुष्कळांना होत असतें. सावकारांचें कर्ज फेडण्याकरितां ते नवें कर्ज काढीत व लोक त्यांना देत. या कर्जाबद्दल माहिती हुजूरपर्यंत होतीच. या गोष्टीबद्दल माझ्या पक्षकाराचा मुळींच गुन्हा नाहीं. सबब त्यांना सर्व तोहोमतींमधून मुक्त करावें, ही माझी आपणाला सविनय प्रार्थना आहे. या एवढ्या मोठ्या चौकशीच्या कामीं माझ्याकडून पुष्कळ मुद्दे सांगण्याचे राहिले असतील त्याबद्दल आपण योग्य विचार करावा. ही दुःखपर्यवसायीं चौकशी माझ्या पक्षकाराला आनंदपर्यवसायी होईल अशी मला फार उमेद आहे. (बसतो.)

**आम्साहेब**—आतां या चौकशींत सरकारतर्फे माझा जबाब देण्याचेंच काम राहिलें आहे. या असल्या खटल्याच्या संबंधानें जबाब देणें मोठें दुःखकारक काम आहे, पण तें करण्याचें माझें कर्तव्यकर्म आहे व तें मला केलेंच पाहिजे. आतां या चौकशींत सर्व पुरावा बडेसाहेबांच्या विरुद्ध कसा झाला आहे तो मी थोडक्यांत दाखवितों.

प्रथम बापूचा खटला.—बापू सांगत आहे कीं, अप्पाला रुपये पंधराशें पोहोंचले.

**सन्साहेब**—मग पोहोंचले असतील, त्याचें काय?

**आम्साहेब**—अप्पा बापूला बडेसाहेबांच्या बंगल्यावर घेऊन गेला; तेथें अप्पा, बापू व बडेसाहेब यांचें बोलणें झालें व लागलीच बापूला जागा मिळाली ती एकदम फडणिशीवरून सुभेदारीची!

**सन्**—या बोलण्याबद्दल बापूशिवाय दुसरा पुरावा कांहीं

एक नाहीं. बापू हा लांच दिला असें म्हणतो, त्याच्या साक्षीवर भरंवसा कसा ठेवावा ?

**आम्**—अशा कामीं साक्षीदार ठेऊन बोलणीं होत नसतात. पंध्राशें रुपये बापूचे गेले, ते अप्पाला पोहोंचले हें बापूच्या जबानीवरून व त्याच्या सासऱ्याच्या जबानीवरून शाबीत आहे. अप्पा हा बडेसाहेबांचा दलाल होता. तो वारंवार बंगल्यांत जात असे, त्याचा बडेसाहेबांचा स्नेह होता, त्याला मोठी नोकरी देण्याबद्दल बडेसाहेबांनीं शिफारस केली होती हें बडेसाहेब कबूल करतात.

**सन्**—यावरून काय होणार ?

**आम्**—बापूला एकदम पांच दहा इसमांवर सुभेदारीची जागा मिळाली, यावरून पंध्राशें रुपयांचा निकट संबंध थेट बडेसाहेबांपर्यंत पोहोंचतो. याशिवाय दुसरें अनुमानच निघत नाहीं. शिवाय बापूचेंही ह्मणणें आहे कीं, बडेसाहेबांना देण्याकरितां हे रुपये अप्पानें घेतले.

**सन्**—त्याच्या जबानीवर विश्वास ठेवणें न्यायाचें होईल कीं नाहीं याबद्दल मोठी शंका आहे.

**आम्**—शंका घेण्याचें कारण उरत नाहीं. बापूला पुढें येऊन बडेसाहेबांच्या विरुद्ध ही हकीकत सांगून आपण स्वतः धोक्यांत पडायचें कांहीं एक कारण नाहीं व हेतुही नाहीं. आमच्या तर्फे आलेले साक्षीदार भरंवशाचे, शिकलेले, कामें केलेले आहेत त्यांच्या अनीतीविषयीं संशय घेणें ह्मणजे—

**सन्**—आमचें तसें ह्मणणें नाहीं; पण त्यांणीं सांगितलेल्या गोष्टी कांहीं भीतीमुळें सांगितल्या असतील सबब त्यांच्यावर भरंवसा—

**आम्**—त्यांना कोणीं भीति घातली असें ह्मणणें ? असें जोंपर्यंत शाबीत झालें नाहीं, तोंपर्यंत तशा प्रकारचीं अनुमानें काढण्याचा कोणालाही हक्क नाहीं. बापूची हकीकत मी म्हणतों खरी आहे.

**सन्**—पण बडेसाहेब शपथेवर सांगतात कीं, आह्मीं रुपये घेतले नाहींत, बापू आमचे बंगल्यावर—

**आम्**—आल्याचें आठवत नाहीं. जर बापूला खोटी हकीकत सांगावयाची असती तर तो चकचकीत म्हणता कीं, मीं पंन्नाशें रुपये बडेसाहेबांच्या हातांत प्रत्यक्ष दिले. असें ह्मणावयाला त्याला काय हरकत होती ? खेरीज, बापू ह्मणतो बडेसाहेबांनीं उंबरगांवीं स्वारींत मजजवळून सहाशें रुपये कर्जाऊ घेतले. उलट सवालांत बापूला विचारण्यांत आलें कीं, तुह्माला त्याबद्दल चेक मिळाली नाहीं का ? बापू शपथेवर नाहीं म्हणून सांगतो. मी चेकबुकाचा दुसरा भाग हजर करा ह्मणून सांगितलें; पण तो दुसरा भाग पुढें येत नाहीं. साहेब आपल्या जबाबांत सांगतात कीं, मी उंबरगांवीं जन्मांत गेलों नाहीं. पण प्रत्यक्ष त्यांचाच अधिकाऱ्यांना रपोट आहे कीं, आह्मी उंबरगांवीं जाऊन रयतेचीं गाऱ्हाणीं ऐकलीं. यावरून काय होतें त्याचा आपणच विचार करावा. साहेब खरे कीं बापू खरा? माझें असें ह्मणणें आहे कीं, या कामीं बड्यासाहेबांविरुद्ध उत्तम प्रकारचा पुरावा झाला आहे.

आतां विसाजीच्या खटल्याच्या संमधानें त्याची जबानी आपण ऐकलीच आहे. त्याचें व बडेसाहेबांचें वांकडे नाहीं. त्याला ही आकसानें बडेसाहेबांविरुद्ध सांगायचें असतें तर पहिले रुपये अप्पाला न देतां त्याणें बडेसाहेबांला प्रत्यक्ष दिले असें सांगितलें असतें. त्याला रुपये दिल्यानंतर लागलींच जागा मिळाली हें शाबीत आहे.

**सन्**—पण त्याच्या गोष्टीवर आह्माला भरंवसा ठेवितां येत नाहीं. कारण, त्याच्या जबानींत साहेबांच्या भेटीच्या तारखांच्या संबंधाचा मेळ नाहीं.

**आम्**—होय, थोडेसें अंतर पडतें खरेंच; पण नुसत्या तारखेच्या अपवादानें त्याची सगळी हकीकत खोटी मानितां येत नाहीं. जर त्याची ठरीव जबानी असती, अगर बडेसाहेबांच्या विरुद्ध आकसानें खोटी जबानी देण्याचा त्याचा हेतु असता, जर त्याची

बनावट जबानी असती तर त्याला तेवढा तारखेचा मेळ दुरुस्त करितां येता.

**सन्**— पण बडेसाहेबांच्या बडतर्फीच्या पूर्वी तो हकीकत सांगून चुकला होता, सबब त्याला मग बदलतां येईना.

**आम्**— असे अनुमान काढायचा आपणांला कोणच्याही प्रकारचा हक्क नाहीं.

मी असें म्हणतों कीं, नुसत्या तारखेच्या चुकीवरून विसाजीची जबानी खोटी मानितां येत नाहीं. सबब या खटल्याच्या संबंधानें बडेसाहेबांवर हा गुन्हा शाबीत आहे.

**सन्**— प्रत्येक खटल्याचा त्याच खटल्यापुरता स्वतंत्र विचार केला पाहिजे व तसा केला म्हणजे शाबिती कांहीं एक नाहीं-

**आम्**— हें म्हणणें बरोबर नाहीं. आपणांपुढें ही चौकशी सरकारानें नेमिली आहे, याचा अर्थच हा आहे कीं, आपण सगळे खटले एके ठिकाणीं घेऊन व बडेसाहेबांच्या ह्मणण्याच्या खरेखोटेपणाचा विचार करून मग न्याय केला पाहिजे. सगळ्या खटल्यांतील पुराव्यांचा एकंदर विचार करणें हेंच न्यायाचें होणार आहे. नाहीं तर असें होऊं लागेल कीं, एका दाण्यानें माणसाचें पोट भरत नाहीं ह्मणून दोनतीन दाण्यांनींही भरणार नाहीं ह्मणून एक शेर दाण्यानेंही त्याचें पोट भरणार नाहीं, तो बिचारा उपाशीच मरेल ,

**सन्**—अप्पाच्या मार्फत बडेसाहेब कर्ज काढीत होते, त्याच्याशीं त्यांचा स्नेह होता, त्याणें कामगार मंडळीजवळून पैसे घेतले, हें जरी खरें धरलें तरी बडेसाहेबांसारख्या हुषार, वाकबगार. ज्यांणीं इतकीं वर्षे चाकरी शहाणपणानें केली त्यांच्यापर्यंत हे पैसे पोहोंचत होते, हें ह्मणणें न्यायाचें होणार नाहीं.

**आम्**—आपणांपुढें बड्यासाहेबांच्या मागल्या शहाणपणाच्या, हुषारीच्या, वाकबगारीच्या नोकरीचा पुरावा कोठें आहे? आपणांपुढें पुरावा आहे तेवढ्यावरच आपण न्याय केला पाहिजे. आपणापुढें साक्षीदार सांगत आहेत त्याच गोष्टी आपण लक्षांत घेतल्या पाहिजेत.

**सन्**—पण साक्षीदार अकांप्लिस् आहेत, ते माफीचे आहेत, त्यांच्या ह्मणण्याला प्रत्यंतरीं पुरावा असल्याखेरीज त्यांच्या ह्मणण्यावर विश्वास ठेवितां येत नाहीं.

**आम्**—माझें ह्मणणें आहे कीं, या चौकशींतील साक्षीदार तसे नाहींत. त्यांना माफ्या दिल्या, पण त्यांना खरें सांगण्याबद्दल माफ्या आहेत. असल्या खटल्यांत असा कांहीं प्रकार केल्याखेरीज खऱ्या गोष्टी पुढें येतच नाहींत. सरकारच्या इमानीपणाबद्दल आपणांला संशय घेण्याचें कारण नाहीं. पुराव्याचा कायदा देखील असें ह्मणत आहे कीं, अकांप्लिस साक्षीदारांच्या देखील गोष्टींवर भरंवसा ठेवून गुन्हा शाबीत धरावा. न्यायाच्या मार्गानें पाहतां पाहिजे तितक्या गोष्टी या चौकशींत आपणांला प्रत्यंतर पाहण्याला भरपूर आहेत. खेरीज या चौकशींतील साक्षीदार आपण गुन्हेगार नसून बडेसाहेब मात्र गुन्हेगार आहेत असें मुळींच ह्मणत नाहींत. ते विचारे आपण स्वतः गुन्हेगार आहोंत असें कबूल करून आपल्या सगळ्या जन्माचें मातेरें करून घेण्याची स्थिति असतां खऱ्या खऱ्या गोष्टी पुढें येऊन सांगत आहेत. बडेसाहेबांनीं बापूपासून कर्जाऊ रुपये घेतले हें पूर्ण शाबीत आहेत, व विसाजीपासूनही घेतले हेंही शाबीत आहे. विसाजीनें हजार रुपये सावकाराचे काढून आणून दिले, व पांचशें रुपये आपल्या बायकोच्या नांवावर होते ते दिले हें त्याणें ब्यांकबूक हजर केलें आहे त्यावरून शाबीत आहे.

**सन्**—ब्यांकेंतून रुपये काढले खरें; पण ते बडेसाहेबांना दिले याबद्दल काय पुरावा? बडेसाहेब नाकबूल करितात.

**आम्**—विसाजीला खोटें सांगण्याचें कारण नाहीं. बडेसाहेबांजवळ हिशेब नाहींत व त्यांचें ह्मणणें आहे कीं, मला मिळेल तेथून—मग गरज असो किंवा नसो—मी कर्ज काढीत असें. साहेबांनीं आपला पगार मागील कर्जाकरितां लावून दिला होता. त्यांच्या हातीं दरमहा सहासातशें रुपये येत असत, त्यांचा दरमहा खर्च नऊशें हजार रुपयांचा, शिवाय सालीना दोनतीन हजार रुपये पालि-

त्यांना भरायचे. गेल्या दोनतीन-वर्षांत वेळोंवेळीं रुपये साहेबांनीं हजारों घरीं पाठविले, कर्जदारांचे दिले, आपल्या खात्यावर व पेढी-वर हजारों रुपये जमा केले, शिवाय ते आपल्या पेटींत रुपये ठेवीतच होते, हिशेब नाहींत, खतेपत्रें नाहींत, चेकबुकें जाळून टाकण्याची साहेबांची वहिवाट, शिवाय येथून प्रयाण करण्यापूर्वीं पुष्कळ कागद, चेकबुकें आपण जाळलीं अशी साहेबांची कबुली. वा:! किती नीचपणाची ही स्थिति! यावरून भरपूर अनुमान काय निघतें? हे साहेबांचे हातांत इतके पैसे खेळत असत हे कोठले? अलबत् कामगार मंडळीकडून आलेले!

**सन्**—पण साहेब कर्जेही काढीत असत या मुदतींत.

**आम्**—त्याबद्दल खात्रीलायक पुरावा मुद्दल नाहीं. जर या कर्जांच्या संबंधानें एकंदरीच्या मानानें पुराव्याचा विचार करावासा आपणांला वाटत असेल तर इतर सर्व पुराव्यांचाही विचार एकंदरीच्या मानानें आपणांला केलाच पाहिजे. दुसरा मार्ग नाहीं. याखेरीज वडेसाहेबांचें येथून वेषांतर करून प्रयाण मोठें महत्वाचें आहे. साहेब सस्पिंड झाल्याबरोबर त्यांणीं आपल्या टेबलावर आपण आत्मघात केला अशी चिठ्ठी लिहिली, पण आपलें सगळं चंबूगबाळें आटोपून स्टेशनची वाट धरली, वेषांतर केलें, दाढी लाविली, नांव बदललें, नेहमीं फर्स्टक्लासांत जायचें तें तिसऱ्या क्लासाचें टिकिट काढून त्या गाडींत बसले, समुद्रकांठीं गेल्यावर आगबोटीचे टिकीट काढण्याकरितां माणूस पाठविला. त्यांना पकडणाऱ्या कामगारांजवळ त्यांणीं वारंट मागितलें:—

**सन्**—यांत काय मोठेसें आहे? वडेसाहेबांसारख्या वड्या कामगारांना एकदम सस्पिंड केलें तेव्हां त्यांना मानसिक दु:ख होणें साहजिक आहे. त्यांचें देहभान नाहींसें होऊन त्यांणीं हे सर्व प्रकार केले असतील.

**आम्**—आपण या गोष्टीचा पोक्त विचार करावा म्हणजे आपली खात्री होईल कीं हें वडेसाहेबांचें कृत्य समजून-उमजून त्यांणीं केलें आहे. आपण मोठे अपराध केले हें त्यांच्या

मनाला खात होतें ह्मणून त्यांणीं पलायनाचा मार्ग स्वीकारला. निरपराधी जर ते असते तर आपल्या कामीं अन्याय झाला आहे, आपणांवर दुष्कीर्तीचा कलंक लागूं पहात आहे तरी पलायनाचा मार्ग न स्वीकारतां येथेंच राहून तो घालवून टाकण्याचा उद्योग त्यांणीं केला असता. या एकंदर सर्व गोष्टींचा विचार केला असतां बेडसाहेब पूर्ण अपराधी आहेत अशी आपली खात्री झालीच पाहिजे. ( बसतो. )

( कमिशन बरखास्त होतें. )

---

## अंक ५ वा.

## प्रवेश २ रा.

( स्थल—तुरुंग. )

( कैद्याचा पोषाख केलेला अप्पासाहेब आपल्या कोठडींत सचिंत बसला आहे. )

**अप्पा**—( आपल्याशींच ) काय ही माझी अवस्था! हतभाग्य मी! एखादा मनुष्य मोठ्या झपाट्यानें पर्वताच्या अति उंच शिखरावर जाण्यास निघतो, त्याची मजल त्या शिखरापर्यंत पोहोंचते न पोहोंचते इतक्यांत एक मोठा कडा तुटून तो धडपडत खालीं तळाशीं येऊन पोहोंचतो, त्याप्रमाणें माझा कडेलोट झाला आहे! असा हा प्रसंग मजवर येईल हें माझ्या मनीं, मानसीं, स्वप्नीं देखील नव्हतें. माणसाचें वैभव किती हें क्षणभंगुर आहे! मनुष्याचें मन हाच एक आम्रवृक्ष, आज त्याला आशारूपी कोंवळी कोंवळी पालवी फुटते, उद्यां लागलींच त्याला सुवासिक मोहोर येतो, परवां त्याला असंख्य आम्रफलें धरूं लागतात, व हीं आम्रफलें आतां लौकर गोड रुचिकर होऊन आपल्या हातीं लागतील अशी तो आशा बाळगून असतो इतक्यांत एकाएकीं आकाश ढगांनीं व्याप्त होतें, मोठा सोसाट्याचा वारा सुटतो, व तीं सगळीं आम्रफलें पटापट गळून पडतात. याप्रमाणें माझी स्थिति झाली आहे. मी अगदीं हां हां ह्मणतां जमीनदोस्त होऊन गेलों आहें! उनाड पोरें असतात, त्यांना

मोठ्या सपाट्यानें वहात जाणाऱ्या एखाद्या नदीमधून आपण पैलतीराला पोहोंचूं न पोहोंचूं हा मुळींच अजमास नसतो; पण तीं आपल्या तारुण्याच्या व उनाडपणाच्या जोमांत सारासार विचार एकीकडे ठेवून एका कडू भोपळ्यावर अवलंबून राहतात, अन् परिणामाचा विचार न करितां पटापट त्या नदींत उड्या टाकतात, अन् शेवटीं बिचारे रसातळाला पोहोंचतात. याचप्रमाणें माझी गोष्ट झाली आहे. अरे, मी होतों कोणच्या स्थितींत, अन् आलों आहे कोणच्या स्थितींत ! जरी मी गर्भश्रीमंत नव्हतों तरी माझ्या वाडवडिलांनीं मला आणखी माझ्या मुलांबाळांना मुबलक होईं इतकें उत्पन्न आमच्याकरितां करून ठेविलें होतें. त्यांणीं माझें काय बरें वाईट केलें होतें? मला बेताबाताचें विद्यादान दिलें, सुनीतीकडे माझें मन वळावें या हेतूनें त्यांणीं मला वारंवार उपदेश केले. पण आह्मी हतभाग्य, कपाळकरंटे पडलो नां ! आमच्या कपाळीं ही स्थिति यायची होती, ती चुकते कशानें ! त्यांणीं आमचें लग्न करून दिलें पण आह्मी कशाला राहतों आहोंत गांवीं वर्षानुवर्ष ! आह्मी कशाला ठेवतों आहोंत संसारसुखाची काळजी ! आह्माला त्या मैनाजी अन् सुंद्राजी यांच्याखेरीज करमायचेंच नाहीं ! आतां त्या मैनाजीच्या परि मैनाजी चैन मारीत असतील, सुंद्राजी आपल्या ऐषआरामांत असतील; पण माझी ती सहधर्मचारिणी भार्या मात्र माझ्याकरितां रात्रंदिवस शोक करीत बसली असेल ! दुःखांत सुख इतकेंच कीं, माझे बाबा मात्र माझी ही दुःखद व नीच स्थिति पाहण्यास राहिले नाहींत ! माणसाची आशा मोठी कठीण आहे ! किती त्याला पैशाची अन् अधिकाराची हावहाव ! आतां माझीच गोष्ट घ्याना. मला मोठी नोकरी मिळावी, दोन पैसे संपादन करावे ह्मणून मी किती अचाट आणखी अनन्वित उद्योग केले, पण शेवटीं लाभलें काय? ही असली अधोगति ! शिवशिव ! माझा पैशापरी पैसा गेला, अब्रू परी अब्रू गेली. मी त्या मोठ्या चाकरीची आशा बाळगून आपल्याला ही स्थिति आणून

घेतली तर घेतली; पण माझ्या अनेक स्वज्ञातीयांच्या अब्रूला, त्यांच्या नांवालौकिकाला काळोखी आणण्याला मीच कारणीभूत झालों. कित्येकांच्या घरीं धरणीं धरून बसलों, कित्येकांना मोठ्या आशा दाखविल्या, कित्येकांची न्यायपथापासून मनें वळविलीं, कित्येकांना मार तंव्याही दिल्या ! बहुतेकांनीं अनीतीच्या मार्गाकडे न वळण्याबद्दल आपणांकडून होईल तितकी शिकस्त केली, पण करतात काय बिचारे ! या बहाद्दराच्या रामरगाड्यापुढें त्यांचें काय चालणार होतें ! धिःकार असो अभाग्या तुला अन् तुझ्या या अनन्वित कृत्यांना ! प्रसंग आला ह्मणजे कोणी कोणाच्या उपयोगी पडत नाहीं. गरीबांनीं मोठ्यांच्या आसऱ्यावर अवलंबून राहणें हें अत्यंत मूर्खपणाचें काम आहे. किती मी बडेसाहेबांच्या आर्जवानें राहिलों, पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. या असल्या अनन्वित खटपटींत मी पडलों नसतों तर कशाला आला असता माझ्या कपाळीं हा कैद्याचा पोषाख, हें पाणी पिण्याला जस्ताचें टंबरेल, हें मातीचें खापर, हें मडकें, हा परळ आणखी ही एकांतवासाची कोठडी ! इतर सर्व आपआपल्या ठिकाणीं सुखांत आरामांत आहेत, अन् अभाग्या अप्या, तुझ्या कपाळीं कारे या कारागृहांत रात्रीच्या रात्री रडून काढण्याचें यावें. या सगळ्या ऐहिक यातना मी सोसल्या असत्या, पण माझ्याच्यानें आतां मानसिक यातना मात्र सोसवेनाशा झाल्या आहेत ! माझें कान्‌शन्स रात्रंदिवस मला टोंचून घेतें आहें. माझ्या सर्व शरीराला हजार सर्प चावताहेत असें मला वाटतें! चोंहीकडे आगीचा भडका होऊन गेला आहे असा भास होतो आहे ! प्रभो, सोडीव मला या यातनांमधून ! ( त्याचा डोळा लागतो व झोपेमध्येंच बोलतो. ) मी त्याच वेळीं आपल्या कृतकर्माचा झाडा दिला असता तर मला कशाला या शारीरिक आणखी मानसिक यातना भोगाव्या लागत्या! परंतु माझ्या कृतकर्मांबद्दल मला शिक्षा भोगायची होतीना ! शास्त्रवचन " अत्युत्कटैःपुण्यपापैरिहैव फलमश्नुते " पापाचें कि-

वा पुण्याचें फल याच जन्मीं मिळतें, हें कसें खोटें ठरेल. त्या वेळीं जर मी उमजलों असतों तर अनेक अनर्थ टळले असते, न्यायाला मदत होती, माझ्या ज्ञातिबांधवांचें होऊं पाहतें आहे, इतकें नुकसान कदाचित् झालें नसतें; पण मला दुष्टाला त्या वेळीं सारासार विचार सुचायचा कोठला ? आतां या सर्व गोष्टींचा मला पश्चात्ताप होतो आहे. पण उपयोग काय ? ( स्वप्नांत त्याचा बाप त्याला दिसतो. ) अं, कोण, बाबा ! मला क्षमा करा, या दुष्टाची, या अभाग्याची अशी ही स्थिति पाहण्याचें तुमच्या कपाळीं यावेंना! मी अपराधी आहें, मला या स्थितींतून बाहेर पडण्याचा कांहीं तरी उपाय सांगा. काय, काय ह्मणतां ? तुला खरोखरीच जर केल्या कर्मांचा पश्चात्ताप झाला असला तर योग्य अधिकाऱ्यांपुढें घडलेली खरी खरी हकीगत कळीव ह्मणजे प्रभु तुजवर कृपादृष्टि ठेवील, अन् ह्या हालअपेष्टांमधून सोडवील? फार चांगलें, खचीत वागतों आपल्या सल्ल्याप्रमाणें. ( जागा होतो ) अं! आतां बाबा नाहींत अन् कोणी एक नाहीं! आज बोवा मोठा चमत्कार झाला ह्मणायचा! माझे बाबा जाऊन इतकीं वर्षें झालीं पण कधींही त्यांणीं मला स्वप्नांत दर्शन दिलें नाही. बाबा, खाचित वागेन आपल्या उपदेशाप्रमाणें. अरे, हें अगदीं फटफटीत उजाडलें. हे वार्डर इकडे तिकडे फिरूं लागले हे. ( दुरून मामा येत आहे असें पाहून ) हा मामा आज इकडे कोणीकडे ? याला या कारागृहांत कसा येऊं दिला असेल बरें ? माझ्या भेटीला परवानगी घेऊन आला असेल. ( उठून बसतो. )

( मामा येतो. )

**मामा**—( कोठडीजवळ येतो व खालीं पहात, ) अप्पासाहेब, मी आहें तो मामा.

**अप्पा**—कशाला या अभाग्याचें तोंड पहायला सकाळींच आलांत मामा ! बसा. बरे खुशाल ?

**मामा**—आहांत असे हे खुशाल आहोंत. तुम्हाला तोंड दाखवायची मोठी शरम वाटते आहे आह्मांला!

**अप्पा**—अरे त्यांत काय ? तुह्मी काय केलेंत?

**मामा**—करायचें काय? आपल्या पंक्तीला यथास्थित जेवणें झोडलीं, आपल्या जिवावर चैनी भोगल्या पण शेवटीं आपल्या कांहीं एक उपयोगीं पडलों नाहीं.

**अप्पा**—तुह्मी काय बिचाऱ्यांनीं आह्मला मदती करायच्या होत्या ! त्या गेल्या गतल्या गोष्टींचा आतां विचार नको. माझी मित्रमंडळी सगळी खुशाल ? बापूसाहेब आतांशीं कोठें आहेत ?

**मामा**—त्यांच्यावरही मोठा प्रसंग गुदरला. त्यानां शिक्षा परवांच झाली असें ऐकतों.

**अप्पा**—अं, त्यांणीं काय केलें ? छेः, गोष्ट फार वाईट झाली !

**मामा**—त्यांच्यावर पांच दहा तोहोमती होत्या. एकदोहों-तून सुटले पण एका क्षुल्लक तोहोमतीबद्दल झाली त्यांना शिक्षा.

**अप्पा**—कळलें, आलें लक्षांत. त्यांच्या घरीं हाहाकार उडून गेला असेल ! शिवशिव !

**मामा**—अपील करणार आहेत त्यांच्या घरची मंडळी, मग पहावें काय होतें तें. सुटो बिचारा !

**अप्पा**—पुढें कांहींही होवो. जगाला मुकला गरीब बिचारा !

**मामा**—बडेसाहेब गेले या देशाला रामराम करून. ते झाले चाकरीवरून डिसमिस्.

**अप्पा**—हं ! जें झालें तें बरेंच झालें आहे ! त्यांची तरी त्यांच्या परि अब्रू ही गेलीच कीं नाहीं ? ते करतील पुढें उद्योग. सोडायचे नाहींत. पेनशन पटकावितील.

**मामा**—आपल्याशीं दोन शब्द महत्वाचे बोलावयाचे आहेत. आपण योग्य अधिकाऱ्यांकडे आपल्या मुक्ततेबद्दल अर्ज करावा व प्रसंग आल्यास खरी खरी हकीगत सागण्याला मागें पुढें पाहूं नये. बडेसाहेबांनीं आतां कांहीं जरी केलें तरी त्यांच्याविषयीं झालेला ठराव कधींही फिरायचा नाहीं.

**अप्पा**—मी तें आधींच केलें आहे. प्रसंग आल्यास आपण देणार कृतकर्माचा झाडा !

**मामा**—लौकर येईल प्रसंग असें वाटतें. आपला हा निश्चय पाहून मला फार संतोष झाला आहे. कांहीं निरोप घरच्या माणसांना?

**अप्पा**—कळवा खुशाल आहोंत ह्मणून. कृतकर्मांचीं फळें भोगतों आहोंत!

**मामा**—बरें आहे, मी घेतों रजा.

( जातात. )

---

## अंक ५ वा.

## प्रवेश ३ रा.

स्थल—प्रतिनिधि साहेबांच्या बंगल्याभोंवतालचा बाग.

( अण्णासाहेब, रावसाहेब, मोठाभाई, तात्यासाहेब, दाजीसाहेब व इतर मंडळी. )

**अण्णासाहेब**—( रावसाहेबांशीं शेकह्यांड करून. ) रावसाहेब, आह्मी सगळेजण तुम्हांला कान्ग्राच्युलेट् करितों.

**तात्यासाहेब**—आतां त्यांना "दप्तरदार साहेब" असें ह्मणून कान्ग्राच्युलेट् केलें पाहिजे.

**मोठाभाई**—दप्तरदारसाहेब, तुमचें निर्मळ वर्तन पाहून प्रतिनिधिसाहेबांनीं तुम्हांलाही मोठी हुद्द्याची जागा दिली आहे. या हुद्द्याचें काम तुह्मी मोठ्या नेकीनें व हुशारीनें बजावाल ही आह्मांला मोठी उमेद आहे.

**अण्णासाहेब**—तुम्हांवर अनेक बिकट प्रसंग आले असतां न डगतां ते तुह्मी सहन केले, न्यायपथापासून भ्रष्ट झालां नाहीं, आपल्या विद्वत्तेला कोणच्याही प्रकारचा डाग लागूं दिला नाहीं, निर्मळ वर्तन ठेविलेंत, या सर्वांचें फल परमेश्वरानें तुह्मांला दिलें आहे, हें यथायोग्य झालें आहे. आपलें वर्तन इतरांनीं कित्ता घेण्याजोगतें दाखविलेंत यांत संशय नाहीं.

**रावसाहेब**—प्रतिनिधिसाहेबांचा अन् आपणांसर्वांचा मी

फार अभारी आहें. अण्णासाहेब, आपणांसारख्यांच्या हाताखालीं काम करण्याचें देवानें घडवून आणिलें आहे, ही मजवर त्यानें मोठी कृपा केली आहे असें मी समजतों. आतां आपण सर्व माझी स्तुति करितां त्या स्तुतीला मी पात्र आहें असें मला वाटत नाहीं. माझें कर्तव्य तें मीं केलें आहे.

**दाजीसाहेब**—अहो, या सर्व प्रसंगांत तुह्मीं जें अमानुष धैर्य दाखविलेंत तसें फार थोड्यांच्या अंगीं वसत असेल. त्या अप्पाच्या व इतर मंडळीच्या आमिषाला न भुलणारे असे तुमच्यासारखे फारच थोडे सांपडतील. मला त्या बापूची फार कींव येते हो, पण असेंही वाटतें कीं, त्याच्या कामीं न्याय यथायोग्य झाला. चाकरीवरून बर्तर्फी हेंच त्याला योग्य शासन झालें असें कोण ह्मणणार नाहीं ? फार फार त्याची अप्रतिष्ठा झाली.

**तात्यासाहेब**—त्याचा कारागृहवास लौकर सुटला हें तरी एक बरेंच झालें. अहो, मेलेल्याला आणखी काय मारायचा?

**रावसाहेब**—बडेसाहेब गेले ह्मणतात या देशांतून.

**मोठाभाई**—डोकीवर केंस न उरे इतकें कर्ज झालें, सर्व लोकांत अप्रतिष्ठा झाली, तेव्हां त्यांणीं केलें तें शहाणपणाचेंच काम केलें.

**तात्यासाहेब**—ते गेले ह्मणतात पुढें दाद मागायला.

**अण्णासाहेब**—मागूं द्या त्यांना आतां हवी तितकी दाद, कांहीं एक होणें नाहीं.

**दाजीसाहेब**—एकंदरीनें विचार करितां या बड्या चौकशींत बडेसाहेबांच्या संबंधानें योग्य न्याय झाला यांत संशय नाहीं.

**मोठाभाई**—अहो, एम् नाहीं एम्. हा सगळा खटाटोप या हल्लींच्या मन्वंतरांत फार अद्वितीय झाला. तिघा न्यायाधिशांची खातरी झाली नाहीं तरी प्रतिनिधींनीं, त्यांच्या सल्लागार मंडळींनीं व कामगार लोकांनीं आपणांकडून शर्थ केली. आपलें कर्तव्य-

कर्म उत्तम प्रकारें बजाविलें. या सर्व प्रकरणांत त्या दिवशींचा तो देशांतर करण्याचा बडेसाहेबांचा डाव फसला, ही एक मोठी बहार झाली. या सर्व गोष्टींच्या संबंधानें ह्यूमेनसाहेबांची जेवढी तारीफ करावी तेवढी थोडी.

**तात्यासाहेब**—यांत काय संशय ? वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर केलेला तो जंगी ठराव वाचतांना बडेसाहेबांच्या डोळ्यांतून ठिणग्याच पडल्या असतील. असा विलक्षण विद्वत्तेचा सरळ लेख आपल्या पाहण्यांत कधींच आला नाहीं. हा लेख हुजुरास गेला नसता तर कदाचित् मोठी पंचाईत झाली असती.

**दाजीसाहेब**—त्या लेखाबरहुकूम सर्व व्यवस्था लागल्यास प्रतिनिधि साहेबांची कीर्ति अजरामर होईल.

**तात्यासाहेब**—सर्व कांहीं कालेंकरून यथास्थित होईल. आपणांला तर बोवा मोठी उमेद आहे.

( प्रतिनिधिसाहेब, ह्यूमेनसाहेब व इतर अधिकारी मंडळी बागेंत येते. सर्व उभे राहून सलाम करितात.)

**ह्यूमेनसाहेब**—( रावसाहेबांना पुढें करून ) हे रावसाहेब हल्लीं यांना दप्तरदारीची जागा मिळाली आहे. फार चांगले गृहस्थ आहेत. यांच्याकडून आम्हाला फार मदत झाली आहे.

**प्रतिनिधि**—रावसाहेब, तुमची सर्व हकीगत आम्हीं ऐकली आहे. तुमच्या सारख्या गृहस्थांनीं आपलीं कर्तव्यकर्मे योग्य प्रकारें बजाविलीं असें आमच्या कानीं वारंवार येईल तर आम्हाला बहुत संतोष होणार आहे. ( त्यांच्याशीं शेकह्यांड करितात. )

**ह्यूमेनसाहेब**—( अण्णासाहेबांच्या व मोठाभाईच्या समोर जाऊन ) हे अण्णासाहेब, हे मोठाभाई. या उभयतांनीं केलेलें सहाय प्रतिनिधिसाहेब जाणतच आहेत.

**प्रतिनिधि**—मोठाभाई, अण्णासाब. ( त्यांच्याशीं शेकह्यांड करितात. ) आह्मी आपले फार अभारी आहोंत. या सर्व गोष्टी बाहेर येण्याच्या कामीं आपण उत्तम प्रकारची मदत केलीत, हें आह्मी कधीं विसरणार नाहीं.

**मोठाभाई**—आह्मि सर्वांनीं या कामीं प्रतिनिधिसाहेबांचेच उपकार मानिले पाहिजेत.

**ब्रूमेनसाहेब**—हें मंडळीचें डेप्युटेशन आलें आहे. न्यायविजयिनी सभेचे हे सभासद आहेत.

( प्रतिनिधि सर्वांना सलाम कारितात. )

**हाजीसाहेब**—( पुढें होऊन ) न्यायविजयिनी सभेच्या तर्फे दोन शब्द सेवेशी सादर करण्याची परवानगी मी अति नम्रपणें मागत आहें. थोड्या दिवसांपूर्वी जी या प्रांतीं बडी चौकशी झाली ती आतां जगजाहिर झाली आहे. अशा प्रकारची ही चैकशी या प्रांतांत पहिलीच आहे हें निर्विवाद आहे. मानवी देहाचे सर्व अवयव योग्य प्रकारें आपलीं कामें बजावीत असतां त्या अवयवांतील एक महत्वाचा भाग दुर्दैवानें रोगग्रस्त होऊन दूषित झाला असतां त्या भागाची कींव करून सर्व देह दूषित करण्यापेक्षां तो तेवढाच दूषित झालेला भाग छाटून टाकून इतर सर्व अवयवांच्या कामांला व्यत्यय न येऊं देणें हेंच दूरदर्शित्वाचें काम आहे; व हें काम आपण निर्भयपणें बजावलें, याबद्दल आम्ही आपले फार आभारी आहोंत. या महत्वाच्या चौकशीच्या संबंधानें आपण, आपल्या सल्लागार मंडळींनीं व कामगार मंडळींनीं जें धैर्य, न्यायप्रियता व पक्षपातपराङ्मुखता दाखविली यामुळें या प्रातांतील आपली सर्व राजनिष्ठ प्रजा आपणां सर्वांस फार दुवा देत आहे. बडेसाहेबांसारखा विद्वान्, बुद्धिमान् व कलमबहादर कामगार फार विरळा. अशा प्रकारच्या कामगाराला विपरीत बुद्धि व्हावी ही मोठि दुर्दैवाची गोष्ट आहे. त्यांच्या या विपरीत बुद्धीचा न्यायदेवतेला जेव्हां मोठा ताप होऊं लागला तेव्हा तिण अखेरीस एकंदरींत यथायोग्य शासन बडेसाहेबांना केलें; व हें योग्य शासन होण्याच्या कामीं आपण व आपल्या सल्लागार मंडळींनीं मोठ्या धैर्यानें न्यायदेवतेला उत्तम प्रकारची मदत केली, यामुळें आपणां सर्वांची कीर्ति अजरामर राहणार आहे. या प्रांतांतील सर्व लहान मोठ्या लोकांवरचें आपणां सर्वांचें प्रेम वृद्धिगत होईल, रा-

ज्यकर्त्यांकडून त्यांना सर्व बाबतींत योग्य न्याय मिळेल, व आपणांसारख्या न्यायप्रिय व दयाळू प्रतिनिधींचा लाभ या प्रांताला वारंवार होईल ही आम्हां सर्वांना मोठी उमेद आहे, व या गोष्टी घडून येण्याबद्दल आम्ही देवाची वारंवार प्रार्थनाही करीत आहोंत.

**प्रतिनिधि**--राजीसाहेब व सर्व गृहस्थहो, आपलें भाषण ऐकून आह्माला फार संतोष झाला आहे. या बऱ्या चौकशीच्या संबंधानें आह्मीं आपलें कर्तव्य कर्म केलें; याखेरीज कांहीं एक जास्त केलें नाहीं. न्यायदेवतेच्या अतितीक्ष्ण नजरेपुढें राजा पासून रंकापर्यंत सर्वसारखे आहेत. आमचा बडेसाहेबांच्या संबंधाचा निकाल तुह्मा सर्वांना रुचला हें ऐकून आह्मांला फार आनंद झाला आहे. या संबंधानें तुमचें ह्मणणें अगदीं यथार्थ आहे. या आमच्या राज्यरूपी देहाचा एखादा क्षुल्लक अवयव जरी दूषित झाला तरी तो नाहींसा करून टाकण्यास आह्मी कधींही मागेंपुढें पाहणार नाहीं. राजकारण मोठें कठीण असतें, त्यांत दूरदर्शित्वाची हरहम्मेष गरज लागत असते. सारासार विचार मनांत आणून सर्व प्रकार करावे लागतात, त्याशिवाय दुसरा इलाज नसतो. आपणां सर्वांस योग्य न्याय देण्याचे कामीं आह्मांकडून होईल तितकी तजवीज करण्यास आह्मी कधींही मागें सरणार नाहीं. आपण जे आह्मां सर्वांविषयीं विचार दर्शविले त्यांबद्दल आपणांसर्वांचे आह्मी आभार मानतों.

(सर्व सलाम करून जातात.)

समाप्त.

# नाटकांतील पात्रें.

भाऊसाहेब......................एक गृहस्थ..
बापूसाहेब......................भाऊसाहेबांचा जांवई व एक सुभेदार.
रावसाहेब......................एक सुभेदार. (नायक)
मार्तंडराव......................रावसाहेबांच्या कचेरींतील कारकून.
अप्पासाहेब ......................एक बडेसाहेबांच्या प्रेमांतला गृहस्थ.
मामा......................अप्पासाहेबांचा स्नेही.
भिसाजीपंत......................एक सुभेदार.
महादेवभट......................बापूसाहेबांचे वडिल.
कृष्णराव......................एक कारकून.
बडेसाहेब......................एक मोठे कामदार.
अण्णासाहेब......................बडेसाहेबांच्या हाताखालचे कामगार.
तात्यासाहेब......................एक कामगार.
मोठाभाई......................एक कामगार.
सनूसाहेब, वेटूसाहेब, इनूसाहेब......................न्यायाधीश.
आमसाहेब, इटीसाहेब......................बालिष्टर.
दाजीसाहेब......................एक सभ्य गृहस्थ.
प्रतिनिधिसाहेब......................प्रांताचे प्रतिनिधि.
ह्यूमेनसाहेब......................एक कामगार.
ठकूबाई......................बापूसाहेबांची बायको.
यमुनाबाई......................रावसाहेबांची बायको.
वाराणशी......................महादेवभटाची बायको.

फुन्नाजी मारवाडी, पारशी, पट्टेवाले, विठ्या, पोष्टमास्तर, शाळामास्तर, फारेष्टर, डाक्टर, मैनाजी, सुंद्राजी, मडम वगैरे.